रविवार, १८ जून २०२३

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी • दैनिक

वर्ष - ०२ • अंक -२७६

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६



# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक


• MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • SUNDAY 18 JUNE 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | • YEAR-02 • ISSUE-276 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-16 • PRICE-5








विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

मधु मागसी माझ्या सख्या परी, मधुघटचि रिकामे पडती घरी. ते म्हणतात, ' अरे रसिका, मी थकलो आहे. आता माझ्याकडून अधिक मधुघटाची अपेक्षा करू नकोस. म्हणजेच काव्यरूपी मधु ( मकरंद ) मागू नकोस. ते याच कवितेत पुढे म्हणतात ढळला रे ढळला दिन सखया, संध्याछाया भिवविती हृदया अता मधुचे नाव कासया, लागले नेत्र रे पैलतीरी. ' ते म्हणतात,' आता माझ्या आयुष्याची संध्याकाळ झाली आहे. दिवस मावळत आला आहे. संध्या छाया मला जणू मृत्यूची भीती दाखवत आहेत आणि अशावेळी तू कवितारुपी मधूची मागणी माझ्याकडे कसली करतोस ? या ओळी आपले काळीज हेलावून टाकतात. अशा संध्याकाळच्या विचारात असताना अशीच एकदा एक संध्याकाळ मला भेटली. ती नेहमीसारखी सुंदरच होती. पण काहीतरी चुकल्यासारखे वाटत होते. नेहमीची प्रसन्नता तिच्या चेहऱ्यावर दिसत नव्हती. मी तिला विचारलं, ' कशी आहेस ? मजेत आहेस ना ? '

मला म्हणाली, ' हो रे, तशी तर मी ठीक आहे. पण खरं सांगू का ? पूर्वीसारखं प्रसन्न, आनंदी नाही वाटत. काहीतरी हरवलं आहे. जीवनातला आनंद कमी कमी होत चालला आहे. मला हे ऐकून धक्काच बसला.

' काय सांगतेस ? असं काय झालंय ? जरा मलाही सांग ना...' मी म्हणालो. अरे, काय सांगू बाबा तुला ? सांगितलं तेव्हढं कमी म्हणायचं. पूर्वी माझ्या स्वागताला कसे सगळे तयार असायचे ! घराघरातून देवापुढे समयी, निरांजने लावली जायची. तुळशीजवळ दिवा असायचा. घराघरातून बालगोपाळांचे ' शुभं करोति कल्याणम ' चे सूर ऐकू यायचे. देवाला, घरातल्या वडीलधाऱ्या मंडळींना नमस्कार केला जायचा. कामावरून आलेली मंडळी, शेतावरून आलेली माणसं हातपाय धुवून घरातल्या मोठया माणसांजवळ बसायची. त्यांची आस्थेनं चौकशी करायची. माणसामाणसात संवाद होता. आज तेच सगळं हरवलंय. टीव्ही, मोबाईल यांच्या नादात घरातल्या जिवंत आणि जवळ असलेल्या व्यक्तींशी संवाद कमी झाला आणि लांबच्या व्यक्तींशी संवाद वाढला. तो इतका वाढला की त्या नादात माणूस स्वतःलाही हरवून बसलाय. स्वतःशी बोलायलाही त्याला वेळ नाही. तुला काय, कसं आणि किती सांगू ? '

मी म्हंटलं, ' होय, तू म्हणतेस ते खरंच आहे. पण आता घड्याळाचे काटे उलट तर नाही ना फिरवता येणार. पण माणसामाणसातला संवाद मात्र नक्कीच वाढवता येईल. टीव्ही, मोबाईल कमी करून एकमेकांच्या अधिक जवळ जाता येईल. पण तुझा निरोप मात्र मी सर्वांपर्यंत पोहचवतो. ' आता संध्येचा चेहरा पुन्हा पूर्ववत आनंदी दिसू लागला. ती पाठमोरी झाली आणि मला रात्रीची चाहूल लागली.






## आनंदी पहाट

## नैतिकतेने वागण्याची वृत्ती असावी

आधुनिक केसरी

प्रार्थना, मंत्र आणि ध्यान यांसारखे आध्यात्मिक आरोग्य लागू करण्याचे अनेक मार्ग आहेत. आध्यात्मिक विकास हा अंशतः एखाद्याचा अंतर्बाह्य गतिमान प्रवास परस्पर प्रक्रिया आहे. या क्रमिक वाढीमध्ये सामान्यतः विकासाच्या तीन टप्प्यांचा समावेश होतो; शुद्धीकरण अवस्था, प्रकाशमय अवस्था आणि एकात्मक अवस्था ह्या होत. आपल्या मानवी विकासाच्या टप्प्यांचे ते प्रतिबिंब दाखवतात जसे, बालपण, किशोरावस्था आणि प्रौढत्व ही होय. आपल्या अध्यात्मिकतेत आपण स्वतः आपल्या सर्वात सुंदर आणि शक्तिशाली स्वरूपात जीवनाचा प्रवास करत असतो. अध्यात्म आपल्याला शांतता, जीवनाचा उद्देश आणि क्षमा या भावना देऊन तणावाचा सामना करण्यास मदत करू शकते. भावनिक ताणतणावाच्या वेळी किंवा आजारपणाच्या वेळी ते अधिक महत्त्वाचे बनते. अर्थाच्या निर्मितीमध्ये अध्यात्मिक मूल्यांमध्ये ऊर्जा, विकास आणि आशा यांचा स्त्रोत निर्माण करणे समाविष्ट आहे. आध्यात्मिक वास्तवाला अस्तित्वात असलेल्या सर्व गोष्टींसाठी अंतिम अर्थ-निर्माता मानले जाऊ शकते. अध्यात्मिक वास्तवाची मानवी भावना सर्व ज्ञात संस्कृतींमध्ये आहे. नैतिक आरोग्य म्हणजे एखाद्या व्यक्तीची योग्य आणि चुकीची जाणीव, नैतिक पद्धतीने वागण्याची त्यांची क्षमता प्रतीत करत असते. अध्यात्मिक वाढ जीवनातील चढ-उतारांना सामोरे जाण्याची आणि त्या कठीण अनुभवातून परत येण्याची आपली क्षमता वाढवते. अध्यात्मिक विकासामध्ये मुलांना करुणा, औदार्य आणि त्याग यांसारख्या गुणांची कदर करण्यास शिकवणे समाविष्ट आहे. जेव्हा पालक आणि इतर प्रौढ किंवा काळजीवाहक प्रामाणिकपणा, विश्वासार्हता आणि दयाळूपणाचे मार्गदर्शक ठरतात, त्यामुळेच मुले देखील लहानपणापासून दयाळू बनतात. आपण प्रत्येकाने

आपल्या अध्यात्मिक गरजा समजून घेतल्या पाहिजेत. अध्यात्म हा मानसिक आणि शारीरिक उपचारांचा अविभाज्य घटक आहे. अध्यात्म संकट समयी अंतर्गत शक्तीचा स्त्रोत असल्याचे आपण जाणून घेतले पाहिजे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

## वादळ....

आधुनिक केसरी

निसर्गात होणाऱ्या वादळामुळे मानवाचे प्रचंड नुकसान होते. कधीकधी वादळाची तीव्रता इतकी भयानक असते की जीवितहानी व वित्तहानी खूप प्रमाणात होते. वित्तहानी भरून येते पण जीवित हानी ????

कधीही भरून न येणारे नुकसान होतं. तसंच मनातील वादळाचे आहे. मनातील वादळाची तीव्रता कमी असेल तर काही प्रमाणात माणूस सावरतो. त्या वादळापासून वाचतो. पण त्याची तीव्रता भयंकर असेल तर अक्षरशः मेंदूच्या शिरा फाटतात व माणूस गमावण्याची भीती असते. म्हणून आपण सर्वांनी आपल्या मनाची खूप काळजी घ्यावी .वादळा साठी पूरक परिस्थितीच निर्माण होऊ देऊ नये. खूप गोष्टी मनाला लावून घेऊ नये. मन अथांग आहे. त्याचा पत्ता लागत नाही. पण म्हणून काही प्रत्येक गोष्टीचं जाळं मनात तयार होऊ द्यायचं का ??? वेळच्या वेळी काही गोष्टी डिलीट कराव्यात .चांगल्या गोष्टी तेवढ्या ठेवाव्यात. ज्या मनाला पोषक असतील आणि ज्यामुळे मनात कोणतेच वादळ नको. कोणतेही प्रश्न ,अवघड काम, कठीण गोष्टी सोडून दिल्याने सुटतात . भावना, प्रेम, राग, द्वेष, मत्सर, हेवा वादळासाठी या पोषक गोष्टी आहेत. भावना प्रेम मर्यादेतच असावं. त्याचाही अतिरेक नको. पण षड्रिपूचा मात्र नाश व्हावा. जेणेकरून आपल्या मनात कधीच वादळ निर्माण होणार नाही. मन नेहमी शांत व प्रसन्न असावे .वादळाची भीती मनाला नको तर मनाची भीती वादळाला हवी. खूप जोराचे वादळ असेल तर मोठ-मोठी झाडे सुद्धा उन्हाळून पडतात. शेतकऱ्यांच्या पिकांचं नुकसान होतं .पीक आडवे-तीडवे जमिनीवर पडते. त्या पिकांचा नाश होतो. पीक खराब होते. प्रचंड आर्थिक नुकसान होते. झाडावर जर फळे लागलेली असतील तर ती फळे खाली पडतात. आणि खराब होतात. अशा या प्रचंड मोठ्या प्रमाणात आलेल्या वादळामुळे सगळ्यांचे खूप नुकसान होत असते. पण हे दिसणारे नुकसान असते. मनात आलेले वादळ शरीराचे किती नुकसान होते हे कोणालाही दिसत नाही. जेव्हा एखादा रोग शरीरात प्रवेश करतो. त्याचवेळी कळतं की हे वादळ किती भयानक होतं. कोणत्याही विघातक गोष्टींचा परकाया प्रवेश होता कामा नये. मनाची काळजी घ्या. मग बघा पेल्यातच काय कपात सुद्धा वादळ होणार नाही......

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-3

## तीन गाढवांचा भार

आधुनिक केसरी

बादशहा अकबर व त्याची दोन मुले आंघोळ करण्यासाठी नेहमी नदीवर जात असे. बऱ्याच वेळा बिरबलही या राजघराण्यातील कुटुंबाबरोबर सोबतीला जात असे. एकदा नेहमीप्रमाणे ते यमुना नदीवर आंघोळीसाठी बिरबलला सोबत घेऊन गेले. अकबर व त्याची दोन्ही मुले नदीच्या पाण्यात उतरली. बिरबल नदीच्या काठावर त्यांचे कपडे घेऊन उभा होता. बिरबल शांतपणे नदीच्या काठावर उभा होता व बाकीचे सर्वजण नदीच्या पाण्यात आंघोळीचा आनंद घेत होते. अकबर नेहमीच बिरबलला सतावण्याची संधी शोधत असे. तो शांतपणे त्याच्या मुलांना म्हणाला, ‘ आपण बिरबलची मजा घेऊ या.’ मग तो बिरबलला बोलला, ‘बिरबल तू धोबीच्या कपडयांचा भार उचललेल्या गाढवासारखा दिसत आहे.’ बिरबलने तात्काळ उत्तर दिले, ‘महाराज! धोबीच्या गाढवाजवळ फक्त एकाच गाढवाचा भार असतो, परंतु माझ्याकडे तीन - तीन गाढवांच्या कपडयांचा भार आहे.’ बिरबलचे उत्तर ऐकून अकबर निरूत्तर झाला.



## निरुपण

आधुनिक केसरी

**तुष्टिं पुष्टिं च शान्तिं चमहामायां च कालिकाम्| तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम्|| २३ ||**

**तुष्टी, पुष्टी, शांती, महामाया, कालिका अशा तुला दुर्गा देवीला तीनही तापांच्या शांतीसाठी मी नमन करतो.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**मन माया की चाल को,**
**जानत सन्त सुजान ।**
**याते गति लागत नहीं, मन माया पछितान**
**।।१४।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल दशम अध्याय) ०४/१०/१४**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

मन-मायेचा डाव ( चलाखी ) संतजन जाणतात. त्यांच्यावर तिची चलाखी चालत नाही. मन- माया पराभूत होऊन पश्चात्ताप करत मागे फिरते.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## चिरंतन स्फूर्तिस्थान

आधुनिक केसरी

पंढरपुरातील विठ्ठल मंदिर हे वारकऱ्यांचे तीर्थक्षेत्र म्हणून प्रख्यात आहे. या मंदिराला आठ प्रवेशद्वारे आहेत. त्यातील पूर्वेकडील प्रवेशद्वाराला नामदेवांचे नाव देण्यात आले आहे. दरवर्षी आषाढी एकादशीच्या सुमारास अनेक भाविक येथे वारी करण्यासाठी व विठ्ठल-रखुमाईचे दर्शन घेण्यासाठी पायी चालत येतात. क्षेत्रमाहात्म्यामुळे पंढरपुराला दक्षिण काशी व तसेच विठ्ठलाला महाराष्ट्राचे कुलदैवत म्हणतात. हे विठ्ठलमंदिर अवघ्या महाराष्ट्राचे एक चिरंतन स्फूर्तिस्थान आहे. गोरगरिबांचा देव म्हणून श्री विठ्ठलाची ओळख आहे.पंढरपूरच्या उत्तर दिशेला कैकाडी महाराज यांचा मठ आहे तिथे गुंफेत सर्व साधु संतांच्या मूर्ती आहेत याचं पार्श्वभूमीवर पंढरपूरमध्ये वर्षातून चार एकादश्यांना चार यात्रा भरतात - चैत्री, आषाढी, माघी व कार्तिकी. त्यातील आषाढी एकादशीला भरणाऱ्या यात्रेत 10-15 लाख भाविक सहभागी होतात. पंढरपुराला मराठी संस्कृती घडविणाऱ्या थोर भागवतधर्मीय संतांनी नावारूपास आणलेले महाराष्ट्राचे आद्य व पवित्र तीर्थक्षेत्र मानतात. पंढरपूरला मोठ्या प्रमाणात आषाढी वारीसाठी भाविक येतात. त्यामुळे या ठिकाणी स्वच्छता महत्त्वाची असते. त्याचं अनुषंगाने स्थानिक प्रशासन नेहमीच प्रयत्न करीत असते मात्र भक्तांची संख्या मोठी असल्याने स्वच्छतेवर काबू मिळवणे कठीण होऊन बसते. त्यामुळे प्रत्येक भाविकांनी स्वतःपासूनच स्वच्छतेला महत्त्व देऊन कोणत्याही प्रकारची घाणीचे साम्राज्य होणार नाही याची प्रत्येकाने काळजी घेवून तशी कृती करणे गरजेचे आहे आणि स्वच्छतेमध्येच भगवंत असतो असे अनेक महात्म्यानी सांगितले आहे. त्यामुळे स्वच्छतेतून समृद्धीकडे जाणे कधीही हिताचे ठरणारं आहे !


राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव



## हीन देह आणि ताठा । अप्रमाण आणि फाटा ॥

आधुनिक केसरी

असा हा ताठा अहंकाराच्या पुढची एक पायरी आहे. एक तर आयत्या संपन्नतेने हा ताठा येतो किंवा काहीच नसले तरी येतो. धुण्याची काठी जशी सरळ आणि ताठ असते. तिचे काम फक्त धुणे वाळत घालणे किंवा इतरांना मारणे. तसेच ताठा असलेली व्यक्ती इतरांना तुच्छ समजून वागत असते. शाब्दिक बाण विनाकारण चालवत असते. एखादा शिकलेला माणूस स्वत:विषयी व शिक्षणाविषयी इतका भ्रम बाळगून असतो की अमुक इतकाच पगार मिळाला तर मी नोकरी करीन. अन्यथा नाही आणि या आडमुठे पणामुळे दुसऱ्याच्या जीवावर आयुष्यभर बसून खावे लागते. तसेच एखादा गरीब आई बापाचा मुलगा थोडासा शिकला तर हलकी कामे, मजुरीची कामे करायला तयार होत नाही. जुने मालगुजार किंवा जमीनदार यांची मुले संपत्ती संपेपर्यंत बसून खातील पण कामे करणार नाहीत. हा ताठा आहे. आपल्या रोजच्या आयुष्यात हा ताठा अनुभवायला मिळतो स्वतःच्या गाडीने मुलाला शाळेत सोडल्यावर रस्ता क्रॉस करून मग गाडी लॉक करणे हा ताठा. जिथे गाडी पार्क केली तिथेच लॉक केली असती तर काही बिघडले नसते. पण पलीकडे पर्समधून किल्ली काढून लॉक केली तर लोक पाहतात. हा दिखाऊपणा म्हणजे ताठा. एखाद्या मोठ्या फंक्शनमध्ये एखादी स्त्री स्वतःच्या वेशभूषेने इतरांचे लक्ष वेधून घेते. माझ्या परिचयातील एक स्त्री मला सांगत होती. यूएस मध्ये ना जीन्सच घालावी लागते. खूप थंडीअसते. ( माझ्या मोठ्या जाऊ बाई कायम साडीतच अमेरिकेत वावरल्या. ) आणि घरी आजकाल मी ड्रेसच घालते बाई. साडी फक्त समारंभातच नेसते आणि नल्ली किंवा कलानिकेतन मधूनच घेते. जसे इतरांना या दुकानांमध्ये भारी साड्या असतात हे माहीतच नाही. अशावेळी वेड पांघरून पेडगावला जावे. एखाद्यावेळेस कुठे गेले तर आमची मुलं ब्रँडेड कपडेच घालतात. पंचतारांकित हॉटेलमध्येच जातात, फ्लाईट शिवाय प्रवासच करत नाहीत हे ऐकावे लागते. दुसऱ्याला तुच्छ समजण्यात या लोकांना आनंद मिळतो. आम्ही कसे वेगळे हे दाखवायचे असते. आपल्यापैकी प्रत्येकाला कधी ना कधी असा अनुभव आला असेलच. आमच्या घरी हे चालत नाही ते चालत नाही असे दाखवणे म्हणजेही ताठाच. हा नव श्रीमंतीतून आलेला ताठा आहे गर्भश्रीमंत, सुशिक्षित, सुसंस्कृत माणूस नेहमी साधा सरळ वागतो. रतन टाटा, सुधा मूर्ती यांची उदाहरणे डोळ्यासमोर आणावी. विद्या विनयाने आणि संपन्नता दानाने सिद्ध होते. संपत्तीचा दिखावा सुख देणार नाही.सगळे नावे ठेवतील. संपन्नते बरोबर आपली बौद्धिक व वैचारिक पातळी वाढवावी. हा असण्याचा किंवा नसण्याचा गर्व, अहंकार सद्गुरुचरणी सोपवावा.जै काही आपल्याला या जन्मात मिळते आहे ते आपल्या पूर्वजन्मीचे संचित आहे. या जन्मी सद्गुरंवर विश्वास ठेवून आपली वर्तणूक सरळ साधी असावी.योग्यता नसतानासुद्धा पुष्कळ वेळा संपन्नता असते हे लक्षात ठेवून विनयशीलता, श्रद्धा आणि भक्ती, दानधर्म वाढवायचा प्रयत्न करावा.



## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

न द्विषन्ति न याचन्ते परनिन्दां न कुर्वते ।
अनाहूता न चायान्ति तेनाश्मानोऽपि देवताः ॥

सरलार्थ - जे कोणाचा द्वेष करीत नाहीत, दुसऱ्याची निंदा करीत नाहीत आणि न बोलावता येत नाहीत, अशा या त्यांच्या गुणांमुळे दगडही देव बनतात.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

रविवार, १८ जून २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२७६
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●SUNDAY 18 JUNE 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-276 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-5



वैष्णवांचा मेळा मल्हारी द्वारी विसावला... जेजुरीत माऊलींच्या पालखीचे आगमन होताच येळकोट येळकोट जयमाल्हार गर्जना करीत भक्तांनी एकच कल्लोळ केला. पालखी विसवल्याचे विहंगम दृश्य. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

# तर फाळणी झाली नसती

## अजित डोवाल : दिल्लीत नेताजी सुभाषचंद्र बोस मेमोरियल लेक्चर

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : भारताचे नेतृत्व सुभाषचंद्र बोस यांच्या हाती असते तर भारताची फाळणी कधीच झाली नसती असे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल म्हणाले. पाकिस्तानचे निर्माता मोहम्मद अली जिना यांनीही सुभाषचंद्र बोस या एकमेव व्यक्तीलाच आपण नेता म्हणून स्वीकारू शकतो असे वक्तव्य केल्याचेही अजित डोवाल यांनी सांगितले. नवी दिल्लीतील नेताजी सुभाषचंद्र बोस मेमोरियल लेक्चर या कार्यक्रमात अजित डोवाल यांनी हे वक्तव्य केले आहे.**

नेताजी सुभाषचंद्र बोस हे अत्यंत धार्मिक व्यक्तिमत्व होते, ते एकमेव नेते होते ज्यांच्यात महात्मा गांधींना आव्हान देण्याची क्षमता होती, तसेच त्यांनी स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांसमोर कधीही भीक मागितली नसल्याचे अजित डोवाल म्हणाले.

अजित डोवाल म्हणाले की, सुभाषचंद्र बोस यांच्यावर इतिहासाने अन्याय केला आहे. सध्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्या इतिहासाचे पुनर्लेखनाला पाठिंबा दिल्याने आपण आनंदी आहोत. 1962 साली आपल्या देशाची युद्धाची कोणतीही तयारी नव्हती, त्यामुळे आपल्याला पराभव पत्करावा लागला. जपानने नेताजींना पाठिंबा दिला. अजित डोवाल म्हणाले की, नेताजी एकटे होते, त्यांना पाठिंबा देणारा




जपानशिवाय दुसरा देश नव्हता. नेताजी म्हणाले होते की, मी पूर्ण स्वातंत्र्यापेक्षा कमी कशावरही तोडगा काढणार नाही. त्यांना या देशाला केवळ राजकीय गुलामीतून मुक्त करायचे नव्हते, तर लोकांची राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक मानसिकता बदलायची होती. नागरिकांना मुक्त जीवन जगता येईल यासाठी ते प्रयत्नशील होते.

नेताजी सुभाषचंद्र बोस म्हणाले की, नेताजींच्या मनात विचार आला की मी इंग्रजांशी लढेन, मी स्वातंत्र्याची भीक मागणार नाही. हा माझा हक्क आहे आणि तो मला मिळालाच पाहिजे. सुभाषचंद्र बोस असते तर भारताची फाळणी झाली नसती. पाकिस्तानचे निर्माते जिना एकदा म्हणाले होते की ते केवळ नेताजी सुभाषचंद्र बोस यांनाच नेता म्हणून स्वीकारू शकतील. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल म्हणाले की, नेताजींच्या महान प्रयत्नांवर कोणीही शंका घेऊ शकत नाही. महात्मा गांधीही त्यांचे प्रशंसक होते. परंतु लोक अनेकदा तुमच्या अंतिम परिमामावरून तुमचा न्याय करतात. त्यामुळे सुभाषचंद्र बोस यांचे संपूर्ण प्रयत्न व्यर्थ गेले असे काही लोकांची मानसिकता आहे. इतिहास नेताजींबद्दल निर्दयी राहिला आहे. आता मला खूप आनंद आहे की, पंतप्रधान मोदी त्याचे पुनरुज्जीवन करण्यास उत्सुक आहेत.




# NEET-2023 मधील गुणवंत आयआयबीएन्सचा आज होणार गौरव

## नवीन 'विद्यासागर कॅम्पस'चा उद्घाटन सोहळाही थाटात पडणार पार



आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** नुकत्याच जाहीर झालेल्या NEET-2023 परीक्षेच्या निकालात उत्तुंग यशाची झेप घेत नीट मध्ये उत्तुंग यश प्राप्त करणाऱ्या आयआयबी इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांचा रविवार, दि. 18 जून रोजी भव्यदिव्य, ऐतिहासिक गौरव सोहळ्यात सत्कार करण्यात येणार आहे. तत्पूर्वी आजच आयआयबी इन्स्टिट्यूटच्या नूतन विद्यासागर कॅम्पसचे उदघाटन आयआयबी टीम आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती आयआयबीचे डायरेक्टर प्रा. चिराग सेनमा यांनी दिली त्याच बरोबर या दोन्हीही कार्यक्रमास , विद्यार्थी , पालक वर्ग, मित्रपरिवार , शैक्षणिक क्षेत्रातील सगळ्या संबंधित मान्यवरांनी उपस्थिती राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे विनंती केली. मागील तब्बल 24 वर्षांपासून डॉक्टर आणि इंजिनिअर घडविणारी फॅक्टरी आणि महाराष्ट्राचा महाब्रॅण्ड म्हणून नावलौकिक असलेल्या आयआयबी इन्स्टिट्यूटने NEET-2023 मध्येही दमदार निकाल दिला आहे. वैद्यकीय शिक्षणासाठी अनिवार्य असलेल्या नीट परीक्षेत उत्तुंग यश संपादन करून आपल्या डॉक्टर होण्याकडे एक पाऊल पुढे टाकलेल्या विद्यार्थ्यांचा यथोचित सत्कार व्हावा यासाठी आयआयबी इन्स्टिट्यूटच्या वतीने शहरातील मधुमीरा फंक्शन हॉल येथे सायंकाळी 4 वाजता गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी घेतलेले अभ्यासरुपी परिश्रमाचा तसेच या यशस्वी विद्यार्थ्यांनी घेतलेले परिश्रम हे आगामी काळात डॉक्टर होण्याचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरावे हा या गौरव सोहळा आयोजनामागचा उद्देश आहे. दरम्यान, याआधी आजच दुपारी 12 वाजता आयआयबी इन्स्टिट्यूटच्या नूतन विद्यासागर कॅम्पसचे उदघाटन होणार आहे. हा कॅम्पस अत्याधुनिक सेवा सुविधांनी युक्त आहे. संपूर्ण वातानुकूलित परिसर, सर्वत्र सीसीटीव्हीची निगराणी, प्रत्येक विद्यार्थी आणि पालकांच्या कोणत्याही अडचणी सोडवण्यासाठी दररोज विद्यार्थी चर्चा दरबार यामध्ये प्रत्येक जण डायरेक्टर यांच्याशी संवाद साधू शकतो. विशेष म्हणजे या कॅम्पसमध्ये स्मार्ट फोन, डिजिटल वॉचच्या वापरावर निर्बंध घालण्यात आले आहेत. येथील क्लासरूम या हायटेक डिजिटल आहेत. सकाळी 6 ते 8 वाजेपर्यंत खास करून"AIIMS" बॅचच्या मुलांसाठी सुसज्ज असा स्टडी हॉल आहे. दरम्यान, आयआयबी इन्स्टिट्यूटच्या नूतन विद्यासागर कॅम्पसचे उदघाटन आयआयबी ची संपूर्ण टीम आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती आयआयबीचे डायरेक्टर प्रा. चिराग सेनमा यांनी दिली.



# सामाजिक नीती आणि राष्ट्रवाद



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**राष्ट्र उभारणीसाठी ज्या अनेक गोष्टींची आवश्यकता असते त्यात त्या राष्ट्रांतर्गत सामाजिक नीती कशी आहे, यावर बरीचशी मदार अवलंबून असते. सामाजिक नीती आणि कायदा ह्या परस्पर भिन्न बाबी आहेत. दोन्हींचेही पर्यवसान अंतिमतः समाजाची विवेकपूर्ण आणि सलोखायुक्त उभारणी यात होत असली तरी दोहोंच्याही कार्यप्रणालीत भिन्नता आहे. एक व्यक्तीच्या सर्वांगीण व्यक्तित्व विकासातून धुमारे फुटल्यागत आतून बाहेर प्रस्फूटीत होणारीतर दुसरी वरून लादलेली. या दोहोंच्या संमिलनातून जी तयार होते ती मनुष्यता. हीच मनुष्यता समाज, राष्ट्र, विश्व विवेकी बनविण्यासाठी उपयुक्त ठरणारी असते.**



## क्षितिजापल्याड

सामाजिक नीती तयार होण्याच्या प्रक्रियेत अनेक घटकांचे योगदान असते. आपल्या प्रथा, परंपरा, धारणा, रूढी, इतिहास, विधी निषेध, लोकाचार, शिक्षण आणि परस्पर संबंध यातून त्या त्या प्रदेशातील सामाजिक नीती ठरत असते. आपली सामाजिक नीती वर्णाश्रमावर आधारित असली तरी प्रत्यक्षात जात हा घटक कार्यरत असल्याने प्राचीन काळापासून एक जात गट दुसऱ्या जातगटापेक्षा वेगळा करण्यावर आपला भर राहिला आहे. त्या त्या वर्णातील सर्व जाती एकसमान असल्याचे कोणी कितीही कंठरवाने सांगितले तरी प्रत्यक्षात दिसते ती जातीय उच्च निचता. मग आमची सामाजिक नीती देखील या सर्व बाबी लक्षात घेऊन निर्धारित होतात. जात हा घटक आमच्या अबोध मनात एवढ्या खोलवर जाऊन रुतून बसला आहे की कितीही समुपदेशन करा, तो निघायला तयार नाही. सामाजिक नीतीच्या संदर्भात कायद्याला नाही म्हटले तरी काही मर्यादा येतात. उदा. मी सार्वजनिक जीवनात जातीयता पाळणार नाही, परंतु माझ्या वैयक्तिक मानसिक पातळीवर मी जातीय कंपूत वावरणार, माझे सर्व भौतिक व्यवहार देखील जात लक्षात घेऊनच करणार. या ठिकाणी कायद्याला मर्यादा येतात. उदा. मला काही खरेदी करायचे असेल तर अमुक दुकानदार माझ्या जातीचा आहे म्हणून त्याकडूनच खरेदी करायचे. एवढेच नव्हे तर आजारी पडल्यानंतर ज्या डॉक्टरला दाखवायचे तो देखील माझ्या जातीचाच हवा, हा जो अट्टहास असतो त्यातून सामाजिक नीतीची पातळी ठरणारी असते. माझा आणि ज्यांचा अर्थाअर्थी काहीच संबंध नसतो अशा गोष्टी केवळ जातीय दुराभिमान म्हणून आपण बाळगत असतो. उदा. देशात यावर्षी आपल्या जातीचे किती उमेदवार प्रशासकीय सेवेच्या परीक्षा उत्तीर्ण झाले, हे समाज माध्यमातून इकडून तिकडे फिरवणे किंवा त्याविषयी भरभरून बोलणे. तसे पाहिले तर या अत्यंत साध्या साध्या गोष्टी आहेत, पण यातून आपला एक सामाजिक पिंड तयार होत असतो. सर्वांचे कल्याण व्हावे असे आपण केवळ म्हणण्यानुसार होत नसते तर आपली कृती काय दर्शविते यातून समाजाची दिशा आणि दृष्टी तयार होत असते. सरकारी नोकराने आपल्या हक्कासाठी लढणे आपण समजू शकतो, पण त्याच वेळेस समाजातील बेरोजगार, शेतमजूर, शेतकरी किंवा कोणत्याही वंचित घटकाबद्दल अवाक्षर बोलू नये किंवा त्यांचा आणि आपला संबंध काय ? अशी भूमिका घेणे याचे आश्चर्य वाटते. कायदेशीर दृष्ट्या हे बरोबर आहे, पण सामाजिक नीतीच्या दृष्टीने हे आपले सामाजिक अधःपतन नाही का ? म्हणूनच सामाजिक नीती आणि कायदा परस्पर विरोधी नसले तरी भिन्न आहेत, असे वर म्हटले आहे. या सर्वच गोष्टी राष्ट्र ही संकल्पना बाधित करत असतात. राष्ट्र म्हणजे केवळ जमिनीचा एक विशिष्ट तुकडा नसतो तर त्यात एक प्रकारचे सेंद्रियत्व अपेक्षित असते. अखिल मानवजातीचा विचार करता आणि संपूर्ण जगाच्या इतिहासाचे अवलोकन केल्यास राष्ट्र ही संकल्पना नवीन असली तरी आजमितीला तरी तिने संपूर्ण जगाला व्यापून टाकले आहे. राष्ट्रवादाचे गुण दोष याविषयी आपली प्रत्येकाची मते वेगळी असू शकतात, पण राष्ट्र या संकल्पनेस आपण आज नाकारू शकत नाही. मग जो भाग वास्तवात आहे आणि आपल्यावर प्रभाव पाडत आहे त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेऊन आपणास आपले राष्ट्र घडवायचे आहे, हे प्रत्येकाने ध्यानात घेतले पाहिजे. आपण केवळ गतवैभवाचे गोडवे गाण्याने किंवा जातीय हितसंबंध जोपासण्याने राष्ट्र घडणार नाही. आजपर्यंत आपल्याकडून जाणते अजाणतेपणी ज्या काही चुका झाल्या त्या जाणीवपूर्वक आपणांस टाळाव्या लागणार आहेत. राष्ट्रांतर्गत प्रत्येक प्रदेशाचा संतुलित विकास, बेरोजगारांच्या हाताला काम आणि विवेकपूर्ण सामाजिक नीतीचा अवलंब करून आपण हे राष्ट्र नव्या दमाने उभारू शकतो, हा आशावाद प्रत्येकाच्या मनात निर्माण केला पाहिजे. केवळ राजकारण्यांना शिव्या शाप देऊन आपण आपल्या कर्तव्यापासून पळ काढू शकणार नाही. आज तुमची प्रत्येक कृती राजकारणकेंद्री झाली असली तरी सामाजिक उत्तरदायित्व नावाची एक गोष्ट निश्चितच असते, त्याकडे भारतीय माणसाला लक्ष देणे गरजेचे आहे. या देशाच्या प्रगतीला सर्वात मोठा अडसर आहे ती आपली जातीय मानसिकता. या कुलूपबंद मानसिकतेतून केवळ कायद्याचा वचक दाखवून आपणास बाहेर काढता येणे शक्य नाही तर वारंवार प्रबोधन करूनच ते शक्य आहे. अमक्यांनी जातीय संघटन केले म्हणून तमक्यानेही तसेच वागणे हे नीतीयुक्त ठरणारे नाही. तर सर्वांनी मिळून पहिल्यालाच जातीय मानसिकता कशी घातक असते हे पटवून देण्याची वेळ येऊन ठेपली आहे. आज कोणी कोणाचे ऐकायला तयार नाहीत, असे मोठ्या प्रमाणावर बोलले जाते, पण हे पूर्ण सत्य नाही. आजही चांगल्या गोष्टी एकणाऱ्यांचे व आत्मसात करणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. त्यात आणखी भर घालावी लागेल इतकेच. आपली सामाजिक नीती माणूसकेंद्री केल्याशिवाय गत्यंतर नाही. आपण ज्या पश्चिमेचे गोडवे गातो, त्यांना अगदी पाचशे वर्षांपूर्वीपर्यंत आहारसंस्कृती आणि वेशभूषा संस्कृती काय असते, याची माहिती नव्हती. पण त्यावर मात करून त्या मंडळींनी आपले राष्ट्र मोठ्या हिंमतीने उभारले. स्वतःत बदल करून घेतल्याशिवाय आपली प्रगती होणे नाही, ही खूणगाठ प्रत्येक भारतीयाने आपल्या मनाशी बांधून ठेवावी व मार्गक्रमण करावे, यातच आपले सौख्य सामावलेले आहे.

**( लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**



# विद्यार्थी संख्येला शासन यंत्रणाच जबाबदार!



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**कुणी विद्यार्थी देता का विद्यार्थी? या शीर्षकाची बातमी आपल्या दैनिक आधुनिक केसरीमध्ये दि.१६ जून रोजी वाचली. प्राथमिक शाळा १५ जूनपासून सुरू झाल्या अन् शिक्षकाची धावपळ विद्यार्थी गोळा करण्यासाठी सुरू झाली. हे खरे भीषण वास्तव आहे. प्राथमिक शाळांच्या बाबतीतच विद्यार्थी पटसंख्येचा प्रश्न निर्माण झाला असे नव्हे तर विद्यापीठांच्या महाविद्यालयामध्येही हीच परिस्थिती विद्यार्थी संख्याबाबत निर्माण झालेली आहे. महाराष्ट्रामधल्या अनेक महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी संख्येचा प्रश्न निर्माण झाला आहे. या विविध महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी गोळा करण्याकरिता आजूबाजूच्या खेडेगावांमध्ये विविध कनिष्ठ महाविद्यालयांना भेटी  देताना दिसतात.**

प्रत्येक विषयाचा प्राध्यापक आपली नोकरी टिकावी म्हणून विद्यार्थ्यांना गोळा करण्याचा प्रयत्न करतो. संस्थाचालकांना व प्राचार्यांनाही विद्यार्थीसंख्येची काळजी वाटायला लागते. विद्यार्थीसंख्या असेल तर कॉलेजमधल्या प्राध्यापकांच्या व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या जागाही भरता येतात. विद्यार्थीसंख्या कमी झाली तर जागाही कमी होतात. अनेक प्राध्यापकही सरप्लस होतात. त्यामुळे त्यांनाही ती काळजी अन् प्राध्यापकांना नोकरी टिकवण्याची काळजी अशा प्रकारची परिस्थिती गेल्या दहा-बारा वर्षांमध्ये पाहायला मिळते. अनेक विद्यार्थी शाळा महाविद्यालयापासून वंचित राहताना दिसतात. त्यांना शिक्षणाविषयी कुठल्याही प्रकारची आस्था,गोडी आहे असे वाटत नाही. अनेक विद्यार्थी तर बारावी दहावी पास झाल्यानंतर टी.सी घरीच ठेवून देतात पण महाविद्यालयाकडे फिरताना किंवा प्रवेश घेताना दिसत नाहीत. त्यांच्यापर्यंत शिक्षक,प्राध्यापक पोहोचले तरी त्यांना शिक्षणाविषयी कुठल्याही प्रकारची आस्था आहे असे त्यांच्या चेहऱ्यावरून दिसत नाही.त्यात महागाईमुळे, गरिबी, दारिद्र्यामुळे फी भरण्या इतपतही पैसा त्यांच्याकडे नाही. म्हणजेच विद्यार्थी,पालक शिक्षणाच्या बाबतीत प्रचंड नाराज आहे. त्याच्या मनात प्रचंड नैराश्य आहे. उदासीनता आहे. त्याच्याच मनात काय पालकांच्या मनातही शिक्षणाविषयीची उदासीनता निर्माण झाली आहे. पूर्वी मात्र प्रत्येक पालक आपल्या विद्यार्थ्याला शिकवून मोठं करण्याचा प्रयत्न करायचा. विद्यार्थ्यांनी आपल्या मुलानी साहेब व्हावं अशी अपेक्षाही पालकाची असायची. घडलेही तसेच. मागच्या पंधरा वर्षांपूर्वीच्या काळामध्ये अनेक विद्यार्थी वेगवेगळ्या नोकरीला लागले. त्यांनी त्यांचे आयुष्य घडवले. जीवनमान उंचावले. बंगले बांधले. चार चाकी गाडीत फिरू लागले. त्यामुळे शिक्षणाविषयीची आस्था विद्यार्थ्यापेक्षा पालकांच्या मनातच जास्त दिसून येत होती. परंतु आज पालक आणि विद्यार्थीही प्रचंड मोठ्या प्रमाणावर उदासीन झाले आहेत. त्याच्या उदासीनतेचे एकमेव आणि महत्त्वाचे कारण म्हणजे शासनयंत्रणा आणि राज्यकर्ते हे होय. आजची शासन यंत्रणा किंवा हे शासन यंत्रणा चालवणारे राज्यकर्ते काय आहेत ? कसे आहेत ?त्यांचे धोरण काय आहे ? याविषयी न बोललेले बरे. त्याच राज्यकर्त्यांना या शिक्षणाविषयीची गोडी दिसत नाही. शिक्षण यंत्रणा सज्ज करावे असेही वाटत नाही. या शिक्षण यंत्रणेतील अधिकारी इतका भ्रष्टाचार करतात तरी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते.कुणावरही कारवाई केली जात नाही.टी.ई.टी. परीक्षा नापासांनाही नोकरी लागते. हे भयानक वास्तव आहे. एम.पी.एस्सी व इतर परीक्षेतही घोळ केले जातात. भ्रष्टाचार केला जातो. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जात नाही. तरीही शासन यंत्रणा मूग गिळून  गपचूपच राहते. खरा अभ्यासू विद्यार्थी बाजूला फेकला जातो. हे वास्तव गावा गावात  विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले जाते. त्याचा परिणामही विद्यार्थ्याच्या शैक्षणिक करिअरवर होताना दिसतो. पर्यायने विद्यार्थी शिक्षणाच्या बाबतीत नाराज होतो म्हणूनच तो महाविद्यालयाकडे किंवा शाळेकडे आकर्षित होताना दिसत नाही. त्याचाच परिणाम विद्यार्थी संख्येवर होताना दिसतो. खरे तर गेल्या पंधरा सोळा वर्षापासून शासन यंत्रणा कुठल्याही प्रकारच्या नोकरीच्या जागा भरत नाही. भरल्या नाहीत. त्यांना त्या भराव्यात असेही वाटत नाही. कुठल्याही प्रकारच्या नोकरीच्या संदर्भातील जाहिराती येत नाहीत. उलट शासन यंत्रणेने नोकरीच्या जागा भरणे बंद केले. खाजगीकरण आणले. कॉन्ट्रॅक्ट बेसेस पद्धत आणली. अग्नीवीरसारख्या अनेक योजना आणल्या. पैसा नाही म्हणून शासन यंत्रणा नोकरीच्या जागा भरताना दिसत नाही. ( दुसरीकडे नको तिथे शासन जाहिरातीवर अफाट खर्च करताना दिसते. अनेक मंत्र्यांचे भ्रष्टाचार आहेत. ) त्यामुळे पालकांच्या, विद्यार्थ्यांच्या आशा आकांक्षा नष्ट होत चालल्या आहेत. शासन यंत्रणा उलट पालकांना आणि विद्यार्थ्यांना भुलवत राहते. फसवत राहते. जाती-धर्माच्या जाळ्यात अडकवून टाकते. आता तर नवीन शैक्षणिक धोरणाच्या जाळ्यात अडकवले जाणार आहे. त्यातही त्यांचे मरणच आहे. आज जिकडे तिकडे सगळ्याच क्षेत्रात नोकरीच्या संध्या उपलब्ध करून दिल्या जात नाहीत. निवडणूक आली की, टी.व्ही.वर व वृत्तपत्रांमध्ये जाहिरातीच्या माध्यमातून वेगवेगळ्या प्रकारच्या आमिषांचा पाऊस पाडला जातो. वस्तुस्थितीमध्ये अनेक शाळा बंद केल्या जातात, नोकर भरतीला परवानगी दिली जात नाही, खाजगीकरण केले जात आहे. त्यामुळे अनेक सुशिक्षित बेरोजगार बेजार आणि हैराण झाले आहेत. कारण त्यांच्यापुढे कुठलेही मोठे असे ध्येय दिसत नाही किंवा चांगले शिक्षण घेऊनही कुठेतरी नोकरी मिळवू असा आशावाद दिसत नाही. खरे तर आजूबाजूचा कुणीतरी नोकरीला लागला, एखाद्या कुठल्यातरी चांगल्या पदावर विराजमान झाला तर त्याच्यापासून इतरांना प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळत असते. पण तशी परिस्थिती ही या देशात राहिलेली दिसत नाही. ही वस्तुस्थिती भयानक आहे. आज महागाई खूप वाढली आहे. सर्वसामान्य माणसांचे जीवन जगणे अवघड झाले आहे. शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही. खाजगीकरणामुळे,कोरोनामुळे अनेकांच्या नोकऱ्या उध्वस्त झाल्या आहेत. पोट भरणे हेही अवघड होऊन बसले आहे. त्यात शासनाचा असा नाकर्तेपणा शिक्षणाच्या बाबतीत दिसून येतो.हे वाईट आहे.आज शिक्षणक्षेत्रात डी.एड.,बी.एड.,नेट.,सेट.,पीएच्.डी.इंजिनिअर व वेगवेगळे डिप्लोमा केलेले अनेकजण पायलीचे पन्नास आहेत. त्यांना शासनाकडून नोक-या दिल्या जात नाहीत.त्यांचा विचार केला जात नाही उलट शिपाई, पोलीस भरतीच्या च्या जागेसाठी नेट,सेट,पीएच्.डी.वाले हजारो उमेदवार अर्ज करताना दिसतात. त्यात पुन्हा मुक्त विद्यापीठाची भर आहे. मुक्त विद्यापीठात केवळ नोकरदार जे आहेत त्यांनाच प्रवेश द्यायला हवा. तिथे परीक्षेतही सारे काही अलबेल असते असे विद्यार्थ्यांना वाटते. म्हणून बारावी पास झालेले विद्यार्थीही मोठ्या संख्येने तिकडे जाताना दिसतात. त्यामुळे गुणवत्तेलाही तडा जातो. हेही कुठेतरी थांबायला हवे. हे शासन यंत्रणेला दिसत नाही का ? हे वास्तव शासन यंत्रणेला, राज्यकर्त्यांना दिसत असूनही मुद्दामहून डोळेझाक केली जात आहे. आत्ता निवडणुका आल्या की जागा भरणार आहोत अशा जाहिराती वृत्तपत्र,टी.व्ही.वर दिल्या जातात.जनतेला तरूणांना आमिष दाखवले जाते आणि भोळी भाबडी जनता, सुशिक्षित बेरोजगार त्याला बळी पडताना दिसतात. निवडून आल्यानंतर शासन यंत्रणेचे व राज्यकर्त्यांचे पुन्हा त्यांचे तेच चालू राहते. सामान्य जनतेकडे आणि शैक्षणिक व्यवस्थेकडे प्रचंड दुर्लक्ष केले जाते. तसे न होता शासन यंत्रणेने व राज्यकर्त्यांनी या देशाचे भवितव्य शिक्षणावर अवलंबून असल्याने त्याकडे दुर्लक्ष करता कामा नये. या जनतेचे कल्याण करणे व भारतीय संविधानानुसार प्रत्येकाला शिक्षण देणे हे त्यांचे कर्तव्य आहे. ते त्यांनी अगदी मनापासून पार पाडून वेगवेगळ्या क्षेत्रातील नोकरी व रोजगार विद्यार्थी सुशिक्षित बेकारांना उपलब्ध करून देणे हेही त्यांचे कर्तव्य आहे. ते त्यांनी कोणतेही जातीय, धर्मीय राजकारण न करता पार पाडावे एवढीच अपेक्षा या निमित्ताने....!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, १८ जून २०२३



# भारतात ईश्वरनिंदा कायद्याची गरज आहे का ?

ईस निंदा म्हणजे धर्म आणि ईश्वरावर टिप्पणी करुन अवमान करण्यास ईश निंदा म्हंटले जाते. देशात ब्रिटीशांनी धार्मिक हिंसा अंकूश लवण्यासाठी १८६० मध्ये ईशा निंदा कायदा आणला होता. देशाच्या विभाजनानंतर पाकने हा कायदा स्विकारलेला आहे. पाकचे सैन्य दलाचे प्रमुख मोहम्मद जिया- उल - हक यांनी या कायद्यात बदल केले. यात १९८२ मध्ये २९५ -बी कलमानुसार इस्लाम धर्माचा पवित्र ग्रंथ कुराण यांचा अवमान केल्याचे दोषी ठरल्यास आजीवन कारावास किंवा फाशीची शिक्षेची तरतूद केली गेली. त्यानंतर १९८६ या कायद्यात २९५- सी कलम जोडण्यात आले, त्यात मोहम्मद पैंगपरांविषयी टिप्पणी व अवमान केल्यास तीच शिक्षा कायम ठेवली. केवळ पाकच नव्हे,जगातील सुमारे २६ राष्ट्रात ईश निंदा संबंधात कठोर कायदे आहेत! यात पाक सऊदी अरब,आणि इराण रा राष्ट्रात या कायद्यानुसार दोषी व्यक्तीला फाशीवर लटकविले जाते! तर कट्टरपंथीया- कडून १९९९ ते २०१४ पर्यंत ७५ जणांना क्रूरपणे ठार मारले. तर न्यायालयाच्या निकालानुसार चाळीस जणांना फाशी दिली. ईशा निंदा कायद्याच्याशिक्षेबाबत बाबत पाक मानवाधिकार आयोगाने चिंता व्यक्ती केली. पण पाक आयोगाच्या आक्षेपाला भीक घालत नाही. ईश निंदाच्या नावावर ज्या क्रूरपणे हत्या होत आहेत! त्यात श्रीलंका येथील उद्योग क्षेत्रातील व्यवस्थापक प्रियंका कुमार याला दि. ४ डिसेंबर २०२१ मध्ये हात- पाय तोडून जीवंत जाळले गेले. २०२० मध्ये अनीका अतिफा या महिलेने तर व्हाटसअॅपवर ईशा निंदा केली,म्हणून तीला न्यायालयाने मरेपर्यत तीची फाशी लटकावे, अशी शिक्षा सुनावली! तसेच २०२२ मध्ये एकाला जमावाने ठेचून ठार मारले. पंजाब प्रांतातील मुनव्वर हुसेन याला एका झाडावर फाशी देऊन जीवे मारले गेले! तसेच पत्रकार असलम बलोच याने भगवान हनुमानाचा अवमानकारक व्हिडीओ शेअर केला म्हणून त्याला अटक करण्यात आली. २०२१ प्रमाणे आठ वर्षाच्या मुलीवर ईशनिंदाचा गुन्हा नोंदविला गेला.पाकिस्तानमध्ये दोन महिलांना याच कायद्याखाली फाशी शिक्षा सुनावली गेली होती. यात एका महिला वरिष्ठ न्यायालयाने सोडले. तर एप्रिल२०२३ मध्ये बांधावर काम करणारा चीन अभियंता तियान याने कामावरील कामगार नमाज नमाज पढत असताना टिप्पणी केली म्हणून त्याला तुरूंगात डांबले. तेंव्हा चीनच्या विदेशी मंत्रालयाच्या प्रवक्ता वांग बेनबिन यांनी त्या कर्मचाऱ्याला चीन राष्ट्र सर्वतोपरी मदत करेन असे सांगितले. या घटनेवरून तर चीन -पाक मैत्रीसबंधावर परिणाम होऊ शकेल, असा इशारा दिला गेला. चीनच्या धमकीमुळे पाक राष्ट्र घाबरले. नंतर चीन अभियंता सोडून दिल्याची माहिती आहे. पाकमध्ये ईश निंदाच्या सुमारे ७ हजार घटनांची नोंद आहे. इस्लाम राष्ट्रात गेल्या वीस वर्षात ईश निंदाच्या आरोपाखाली सुमारे बारा हजाराच्या लोकांची हत्या करण्यात आली, असे एका अहवालात नमूद केले आहे,तर अनेक जण तुरुंगात डांबले गेले. इतकेच नव्हे,भारतात भाजपाच्या नेत्या नपूर शर्मा यांनी टिप्पणी केली म्हणून इस्लाम राष्ट्र संघटीत झाले, त्यांनी निषेध केला. काँग्रेसने थाटलेल्या प्रेमाच्या दुकानात, राजस्थानमधील उदयपूर येथील कन्हैयालाल साहू या टेलरची गळा कापून हत्या गेली.याच कायद्याचा आधार घेवून इस्लाम राष्ट्र व विशेषतः पाक मध्ये अल्पसंख्याक समुहाला लक्ष्य केले जात आहेत. तो सुरक्षित नाही, असा डेकेन रिलीजियनचा अहवाल आहे. इस्लाम राष्ट्रात मर्जीनुसार धर्मत्याग करण्यास प्रतिबंध आहे. जर धर्मत्याग केल्याचे आढळल्यास 'मौत की सजा'आहे. आज इस्लाम राष्ट्रात अल्पसंख्याक समाजाच्या धार्मिकस्थळावर हल्ले,आणि महिलावर अत्याचार, सक्तीने धर्मांतर करण्याच्या घटना वाढत चालल्या आहेत. यात पाकिस्तानच्या पंजाब प्रांतमधील ससंद तारिक मासिह गील यांनी संसदेत आवाज उठविलेला आरे. त्यांनी पाकमध्ये १२ वर्षाचा मुलीला इस्लाम धर्म स्विकारण्यास भाग पाडले जात आहे असे स्पष्टपणे सांगितले. तेथे एका बारा वर्षाच्या मुलीचे धर्मांतर केले. तेंव्हा आपण पोलिस स्टेशनला गेलो,तेंव्हा पोलिस अधिकाऱ्याने त्या मुलीने स्वतः इस्लाम धर्म कबूल केला असे सांगितले. ज्या मुलीला कुरणमधील कलमा, हादिस आदीची माहिती नाही,ती दोन दिवसात इस्लाम कबूल कसे करेल ? !तेंव्हा अन्याय करू नका, दया करा, अशी त्यांनी विनंती संसदेत केली.तर एका ६५ वर्षाचे नेत्याने १४ वर्षाच्या मुलीशी निकाह (विवाह) केला आहे. सक्तीच्या धर्मांतरामुळे इस्लाम राष्ट्रातील अल्पसंख्याक हिंदू, शीख, बौध्द, खिश्चन लोकसंख्या दिवसें- दिवस घटत चालली आहे. यामुळे तेथील धार्मिकपिडीत कुंटुब भारतात पलायन करत आहेत! या कुटुंबाना भारतीय नागरिकत्व देण्या- संबंधात राष्ट्रीय नागरिकत्व कायद्यात सुधारणा ( CAA ) केला गेला. काँग्रेसने हा कायदा भारतीय मुस्लिमाच्या विरोधात आहे, असा अप्रचार केला.पण तरी हा कायदा संसदेत संमत झालेला आहे. काँग्रेसची सत्ता गेल्यानंतर त्यांनी मुस्लिम मतासाठी भावना भडकविणे व आपसातील वादातून झालेल्या घटनांना धार्मिक झुंडशाहीचे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. भारतात धर्माच्या आधारावर कायदे जात नाहीत! घटनेनुसार कायदे केले जातात! देशात धार्मिक अथवा देव- देवतांचा अवमान केल्याबद्दल फाशी देण्याचा कायदाही नाही! ईश निंदा सारखा कायदा नाही.पण भारतीय दंड विधान संहितानुसार धार्मिक समुदायाचा अवमान तसेच सामाजिक तणाव निर्माण करणे व हिंसेला आळा घालण्यासाठी कलम १५४, २९५, २९५(ए) २९६,२९७,२९८ नुसार दोषी ठरल्यास एक ते तीन वर्षाची शिक्षेची तरतूद आहे. भारतात धर्मांतरांच्या रोज पुढे येत आहेत. दिल्लीत साक्षीची निर्घृणपणे हत्या मध्यप्रदेशातील गंगा-जमूना इंग्रजी शाळेत धर्मातर करणे, मुलींना नमाज व इस्लामचे धार्मिक शिक्षण दिले जात असल्याचा गंभीर प्रकार उजेडात आला. देशातील धर्मांतराच्या गंभीर घटनेवर गांधी परिवार व्टिट का करत नाहीत ? कर्नाटकमधील काँग्रेस सरकारने धर्मातर विरोधी कायदा मागे घेतला आहे. मुस्लिम ब्रदरहूड संघटना इस्लाम राष्ट्र निर्माण करणे, हा उद्देश आहे. संघटनेवर अतिरेकी कारवाया करत असल्याचा आरोप आहे. भारतात हिंदू संघटना, पक्ष आहे, पण त्या कधी धार्मिक कट्टरतेला, हिंसेला उत्तेजन देत नाहीत. तर इस्लाम धर्माचे विचारवंत जाकीर नाईक यांनी तर' काफीर दिसला की त्याची हत्या करा' असे म्हणत यासाठी कुराणचा हवाला देत आहेत. त्यात हिंदूच्या जगात शाखा अतिरेकी संघटना नाहीत. तसेच हिंदू धर्मात धार्मिक हिंसक हल्ले, बहिष्कार टाकण्याचे फतवे काढले नाहीत. तर काँग्रेस सरकारने तर टाडा ( १९८५ ) पोटा ( २००२ ) मीसा (१९७१ ) असे कायदे आणले गेले. हे सर्व कायदे दहशदवाद आणि फुटीरवादच्या विरोधात आणले होते. पण हे कायदे मुस्लिम समाजाच्या विरोधात असे म्हणून मागे घेतले. आता युएपीए (UAPA) कायदा १९६५ आणला गेला. त्यात २०१९ मध्ये सुधारणा करण्यात आली. तोही कायदा रद्द करावा, अशी मागणी औवेसी करीत आहेत. भाजपा व मोदी सरकारने मुस्लिम विरोधी नवीन कोणतेही कायदे आणले नाहीत! पण काँग्रेस पक्षाने मात्र तुष्टीकरणाच्या राजकारणातून भारतातील हिंदू व मुस्लिम एकतेला तडे देत आहे. यातून मताची पोळी भाजून घेतली जात आहे. देशात मुस्लिम हिताचे कायदे तर हिंदूंची मुस्कटदाबी करून कायदे केले गेले. काँग्रेसला देशाचे विभाजन करणारी मातृ संघटना व जीना विचाराची मुस्लिम लिग एम.एम आय.चालतात! हे मात्र धर्मनिरपेक्ष. यांना केवळ हिंदूसंघटनेचा विटाळ आहे का ? हिंदू समर्थक संघाचा, पक्षाचा व्देष करणे राष्ट्रद्रोही ठरविणे, ही काँग्रेसची विचारसरणी आहे. कर्नाटक सरकारने स्वातंत्र्य वीर सावकरकर व संघ संस्थापक हेडगेवार यांचे धडे वगळले गेले. हे नीच राजकारण नाही काय ? जीना, औरगंजेब, टीपू सूलतान चालतो. विरोधी पक्ष नथुरामाच्या नावाचा रोज जप करत असतो. त्यांचे जीभेवर अब्दुल रशीद, याकूब मेनन, बुऱ्याणवाणी, अफझलगुरू यांचे नाव येऊ द्या! काँग्रेस पक्ष सुंष्टात येईल. देश आता हिंदू अथवा इस्लाम राष्ट्र होणे, हे अशक्य आहे! यावर "समान नागरी कायदा' हाच रामबाण उपाय आहे.



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

काँग्रेसचे नेते राहुल गांधी ए.आय.एम.आय.एम.चे असोउद्दीन औवेसी हे एका नाण्याच्या दोन बाजू आहेत! हे दोघांनीही विदेशात जाऊन भारताची बदनामी करणारे वक्तव्य केले आहे. भारतात मुस्लिम समाजाची स्थिती चिंताजनक असल्याचे म्हटले आहे. यामागे हिंदू समाजाला लक्ष्य करणे हाच राजकीय हेतू आहे. गांधी तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजपाची तुलना मुस्लिम ब्रदरहुडशी केली. पण त्यांना हे माहित आहे ? इस्लाम राष्ट्रात ईशनिंदा केली तर त्या व्यक्तीला फाशावर चढविले जाते! भारतात हिंदू धर्माचा व देव- देवतांचा अवमान केला तरी ईश निंदा सारखा शिक्षा देणारा कठोर कायदा नाही. त्यामुळे फावते आहे. हे दोघे हिंदू व मुस्लिम विभाजनाचा डाव खेळत आहेत! या नेत्यांचे राजकारण देशाच्या राष्ट्रीय एकातत्मेच्यादृष्टीने घातक आहे. जगातील असंख्य राष्ट्रात कायदे इस्लाम धर्माव आधारित आहेत. या राष्ट्रात अल्पसंख्याक धर्मावर अत्याचार, अन्याय, धर्मातरांची सक्ती केली जाते. परवा बड्या वृत्तपत्रातील चार ओळीचे दिलेले वृत्त वाचले. यात पाकमध्ये एका खिश्चन तरूणाला ईस निंदा केल्याच्या आरोपाखाली न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली आहे. या बातमीची वृत्तपत्र व वृत्तवाहिन्यांनी चर्चा नाही, सर्वांनी याकडे काणाडोळा केला.






# तुका म्हणे जें दर्पणीं बिंबलें । तें तया बाणलें निश्चयेसीं ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**माणसाचे मनच माणसाच्या क्रिया-प्रतिक्रियांचा आरसा आहे. दररोज सकाळी झोपेतून डोळे उघडल्याबरोबर आपल्या मनःपटलावर काय विचार येतात? आपण काय चिंतन करतो? त्यावरच आपल्या संपूर्ण दिवस-कार्याची बांधणी अवलंबून असते. तद्वतच आपण दररोज रात्री झोपतांना काय काय विचार घेऊन झोपतो? त्यावरच आपली शांत-निवांत-प्रगाढ निद्रावस्था अवलंबून असते. प्रेम, जिव्हाळा, आनंद, सुख, शांती, समाधान, यश, कीर्ती, मान, सन्मान आदि सर्वच बाबी आपल्या मनःपटलावरील उठलेल्या तरंगांचे फलित आहे. त्यासाठी अनेकांनी अनेकवेळा माणसाच्या सर्वांगीण उत्कर्ष-अपकर्षाचे मुख्य माध्यम हे पूर्णतः मनच असून मन हेच संपूर्ण शरीराला नियंत्रित करणारे प्रधान इंद्रिय आहे याचे प्रतिपादन केलेले आढळून येते आणि तसे सातत्याने करत रहावे लागणार आहे!**

**त्याच अनुषंगाने आज चिंतनासाठीचा देव होसी जरी आणिकांते करिसी ।संदेह येविशीं करणें न लगे ॥१ ॥ दुष्ट होती तरी अणिकांतें करिसी ।संदेह येविशीं करणें न लगे ॥२ ॥तुका म्हणे जें दर्पणीं बिंबलें ।तें तया बाणलें निश्चयेसीं ॥३ ॥ (११२८)**

हा जगद्‌गुरू तुकोबांचा अभंग अत्यंत मोलाचा आहे! आपण कोण आहोत आणि काय करणार आहोत ? हा मूलगामी प्रश्न आपण आपल्यालाच विचारायला हवा. त्याच धर्तीवर तुकोबाराय तमाम मानवांना प्रश्न विचारून अंतर्मुख करतात. माणसाला देव व्हायचे की राक्षस हे त्याचाच हाती आहे. याच अनुषंगाने जर माणसाला देव व्हायचे असेल तर त्याने आपला भोवताल सुद्धा देव करावा ही माफक अपेक्षा तुकोबा आपल्याकडून करतांना दिसतात. देव म्हणजे काय हो ? तसे पहिले तर देवाची निश्चित अशी व्याख्या करता येणार नाही. ज्याचा त्याचा देव वेगळाला आहे. देव या शब्दाचा शब्दकोषात अर्थ पहिला असता दिव्यता, पूज्य, तेजोमय, जेष्ठ व्यक्ती, राजा, पाऊस, ज्ञानेंद्रिये, मित्र, लहान बालक आणि स्वर्गात वास्तव्य करणारा अमर प्राणी इत्यादी अर्थ सापडतात. या सर्वच शब्दांचे सूक्ष्मपणे सिंहावलोकन केले असता तोच देव ज्याच्यामध्ये दिव्यता असून जो कोणातही भेदभाव करत नाही. त्याला सर्वच सृष्टी समसमान वाटतात. असा आचार-विचार करणारा असामान्य माणूस म्हणजेच देव होय! दयार्द्र भाव, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, मैत्र्य, अभेद इत्यादी वैश्विक भाव ज्या ज्या अंतःकरणातून सदैव पाझरतात ते ते अंतःकरण म्हणजे देव! आता हे ज्याचे त्याने तपासायचे आहे. असे होणे म्हणजेच देव होणे होय. याच अनुषंगाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज देव कोण आणि कसा असू शकतो ? याचे उत्तर देतांना एका अभंगात देव म्हणजेच माणसाची

**आपणचि मंदीर, मूर्ती, पुजारी।आपणचि पुष्प होऊनी पूजा करी।आपणचि देवरूपे अंतरी।पावे भक्तां।**

अशी भावविभोर अवस्था होणे म्हणजे देव! मंदिर, फूल, पुजारी, मंत्र हे सर्वच ज्याच्यात व्यापून असते तो देव! हाच भाव तूकोबांनी आजच्या अभंगात व्यक्त करतांना स्वतःसह आपला संपूर्ण परिसर दिव्यत्वाने व्यापून टाकायला हवा अशी तुम्हा-आम्हाकडून अपेक्षा केली आहे. 'देव पहावया गेलो, देवच होऊनी ठेलो' अशी अलौकिक अनुभूती व्यक्त होतांना तुकोबांचा देव दृगोचर झाल्याशिवाय रहात



नाही. इंग्रजीत सर्वोच्च, शेवटचे सत्य म्हणजे देव! देव म्हणजे सामर्थ्य, शहाणपणा आणि चांगुलपणाने पूर्णत्व असणे होय! असे गुण ज्यांच्याकडे असतात त्यालाच लोकांनी ईश्वर-अल्लाह-येशू वैगैरे म्हणून संबोधले! माणसाने आपल्या सर्वोच्च कर्तृत्वाने देव होणे तुकोबांना अपेक्षित आहे. पूजा, कर्मकांड इत्यादी थोतांड पसारा जमा करणारा देव तुकोबांचा देव होऊ शकत नाही कारण 'आपणांसारिखे करिती तात्काळ' म्हणजेच देवाच्या दिव्यत्वाचा प्रत्येक जीवाला परीसस्पर्श होऊन प्रत्येकजण देव व्हावा! आणि असा प्रत्येकाचा देव होतांना 'संदेहाची तुटली गाठी' असे होणे म्हणजे इथला माणूस माणूस देव होणे होय! त्याला लागुनच देवाच्या विरोधी लक्षणांचा म्हणजेच दुष्ट विचारांचा मागोवा तुकोबाराय घेतांना दिसतात. दुष्ट वागण्याने आपला भोवतालही दुष्टच होतो. तुम्ही चलत चलत सहज सुगंधी फुलांच्या किंवा अत्तराच्या दुकानातून गेलात तर अनायासे तुम्ही सुगंध घेऊनच बाहेर पडता आणि दुर्दैवाने रस्त्याने जातांना एखाद्या कोळशाच्या दुकानातून जायची वेळ आली तर तुमचे पांढरे शुभ्र असलेले कपडे, चेहरा, हात-पाय काळे झाल्याशिवाय राहणार नाहीत! यासाठीच माणसे फुले किंवा अत्तराच्या दुकानातून जातांना चेहरा, हात-पाय झाकत नाहीत, दुसरीकडे कोळशाच्या दुकानातून आपण पूर्णतः बंदिस्त होऊन जात असतो. तेंव्हा जायचे कुठून आणि काय वाटायचे सुगंध की काळेपणा ? हे ज्याचे त्याने ठरवावे, परंतु माणूस या नात्याने कुणीही कोळसा म्हणजेच दुष्टपणा प्रसारित करू नये! हीच अवस्था इथे प्रत्येकाची व्हायला हवी अशी माफक अपेक्षा महाराज सर्वांकडून करतात. या न्यायाने तुकोबाराय शेवटी दर्पणाचा दाखला देतात. आरशासारखा प्रांजळ-सच्चा मित्र जगात सापडणार नाही! आपण हसलो, खुश असलो की तो ही खुश आणि आपण नाराज, रडके असलो की तो हो नाराज, रडकाच! अगदी हाच न्याय माणसाच्या मनाचा देखील आहे! जे दर्पणी दिसते तोच आपण आणि आपला निश्चय! दर्पणाचा हा लोकन्याय माणसाच्या दिव्यत्व होण्याच्या अवस्थेसाठी महत्वपूर्ण असून तोच न्याय माणसाने आपल्या मनाच्या दर्पणाला लागू करून त्याला नित्यनेमाने देवतत्वाकडे घेऊन जाण्याची माफक अपेक्षा तुकोबाराय करताहेत! याशिवाय दर्पणाचा गुणधर्म मोठा विलक्षण आहे. तो जरी माणसाचा सर्वात जवळचा मित्र असला तरी स्वतः बाजूला झालो की तो त्याच्या समोर जाईल तसा होतो. त्यासाठी संत तुलसीदास

**दुर्जन दर्पण सम सदा, करि देखौ हिय गौर।**
**संमुख की गति और है, विमुख भए पर और॥**

दर्पणाची दुर्जनासोबत तुलना करतात. त्यासाठी इथे प्रत्येकाने आपला आरसा आणि मन दुष्ठ, दुर्जन न होऊ देता त्याला दिव्यत्वाची प्रतीती आणून द्यावी. साने गुरुजींच्या 'शामची आई' कादंबरीमध्ये अंघोळीवरून परतणाऱ्या शामला "अरे शाम, ज्याप्रमाणे तळपायाला माती लागू नये म्हणून जपतोस ना, अगदी तसाच मनाला मळ लागणार नाही यासाठी जप हं!" असा आई उपदेश करते. त्यासाठी तुकोबाराय सातत्याने मानवी मन, संकल्प यासंदर्भाने अनेकवेळा लिहून जातात. हेच देव होण्याचे महतत्व संत ज्ञानेश्वर आपल्या हरिपाठात "मनोमार्गे गेला तो इथे मुकला। ठायीच मुराला अनुभव॥" असे सांगतात. वर्तमान मोठ्या खडतर आव्हानांनी ओतप्रोत आहे. सगळीकडे गडबड-घाई सुरु आहे. ज्याला त्याला पटकन अगदी स्विच दाबल्याबरोबर श्रीमंत, आनंदी, सुखी, समाधानी व्हायचं आहे! इथे प्रत्येकाला आपल्या कार्याचा ठसा उमटवायचा आहे. प्रत्येकाला काही तरी करून दाखवायचे आहे. असे असतांना जो तो आपापले मार्ग निवडत आहे. त्यासाठी कुणाला तरी भेटून, कुठेतरी लांब जाऊन अथवा कुठतरी बसून तात्काळ आनंद-सुख-शांती-समाधान हवे आहे. माणसांकडे सगळं काही आहे मात्र याच गोष्टी दुर्मिळ झाल्या आहेत. त्यासाठी तो अहोरात्र मृगजळामागे धावतोय! धडपडतोय! परंतु ही धावपळ-धडपड योग्य मार्गाने आहे का ? याचा खोलवर जाऊन विचार करायला हवा! आज माणूस आनंद-सुख-शांती-समाधान या अलौकिक बाबी बाहेर शोधण्याचा आटोकाट प्रयत्न करतांना कस्तुरी मृगाप्रमाणे कस्तुरी नाभीत असतांना तो रानोमाळ भटकतोय! याच न्यायाने या सर्वच बाबी आपल्या अंतर्मनाच्या दर्पणात असून तिथेच त्याची जपवणूक-रुजवणूक व्हायला हवी! त्यासाठी तूकोबांनी अक्षरशः पांडुरंगाची शपथ घेऊन शहाण्या लोकांना सोप्यात सोपा न लगती सायास जावे वनांतरा । सुखे येतो घरा नारायण ॥ ठायीच बैसोनि करा एकचित्त । आवडी अनंत आळवावा ॥ प्रत्येक घरात, चराचरांत देव नांदण्यासाठी हा सोपा-सुलभ मार्ग सांगितला आहे. त्यासाठी प्रिय सज्जनहो, आपण सगळेच जन तुकाराम नीतीच्या माध्यमातून तुकोबांच्या सर्वांगीण विचारांचे वर्तमानासी संबंध जोडून आपले दैनंदिन जीवन आणि कार्य नित्य नित्य प्रज्वलित करूयात! शांत, संयम, सुगंध, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, निरपेक्षता, मर्यादित गरजा इत्यादी बाबतीत आपण सर्वांनीच नित्य अंतर्मुख व्हावे लागेल. संसारात सुख बाहेर कुठेच नसून ते आपल्याला आपल्या मनानेच शोधावे लागेल! सुख मानावे लागेल तरच ते आपल्याला भेटेल अन्यथा सुखाच्या शोधासाठी नानाप्रकारच्या खटपटी करून ते पुढेच धावत राहील! यासाठी प्रत्येकाने नित्य नित्य सजग राहून आपले मन विचलित होणार नाही याकडे आवर्जून लक्ष द्यावे लागेल. आनंदाकडून पैशाकडे असा उलटा सुरु असलेला आपला प्रवास सुलट करावा लागेल! जीवनात पैसा महत्वपूर्ण असला तरी पैसा सर्वस्व नाही याची जाण आणि भान आपल्याला झाले की प्रत्यके घर आणि प्रत्येक संसार सुखी-समाधानी झाल्याशिवाय राहणार नाही! तेंव्हा चला, तुकोबांच्या अभंगांचे सारतत्व आपल्या जीवनी उतरवून जीवन आनंदी-सुखी-समाधानी करूयात! असे होणे म्हणजेच तुकाराम बावांनी लिहिलेल्या गाथ्याचे आणि त्यावरील 'तुकाराम नीती'चे सार्थक झाले म्हणून समजा! जय तुकोबाराय!

**तुकारामनीती**
**भाग -58**

# थांबला तो संपला...!

आधुनिक केसरी



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

**थांबला तो संपला ही एक प्रचलित म्हण आहे आणि ही म्हण अनेकदा चांगली विचारसरणी असलेल्या व्यक्तीमत्वाकडूनच ऐकायला मिळत असते. एका अर्थाने बघितले तर ह्या म्हणीत सत्यता आहे. म्हणूनच याच समाजातील काही लोक गोग्य वाटेने जात असतात, ते चांगले काही तरी करण्याचा प्रयत्न करतात, वेळ आल्यावर आपल्या चांगल्या कर्माने यशस्वी सुद्धा होतात पण, हेच तर काही . लोकांना अजिबात बघवत नसल्यामुळे त्यांना थांबविण्यासाठी आपली संपूर्ण ताकद लावत असतात व एक दिवस त्यांचे काम सुध्दा पूर्ण होऊन जात असते.**

अनेकांची त्या कामासाठी साथ सुद्धा मिळत असते ऐन त्याच वेळी त्यांच्या चेहऱ्यावर आनंद व गालात हसू मात्र वेगळे असते कदाचित असे राजकारण बघून निसर्गाच्या डोळ्यात अश्रू असावेत असे कारनामे व राजकारण कोणापासूनही लपलेले नाही. असे अनेक अनुभव अनेकांना आजपर्यंत कदाचित आले असतील यात काही शंका नाही. या मधील एक छोटीशी गोष्ट आपल्याला माहीत असेल ती गोष्ट म्हणजेच कासव आणि ससा या दोघांची एकदा दोघांमध्ये पैज लागली होती की, समोर दिसणाऱ्या झाडा पर्यंत आधी कोण पोहोचतो काही क्षणातच ससा उड्या मारत समोर,समोर गेला व जास्त उड्या मारल्यामुळे तो थकून गेला तिथेच त्याला झोप लागली. इकडे बिचारा कासव मात्र हळूहळू चालत,चालत त्या झाडाजवळ पोहचला नंतर काही वेळांनी सशाला जाग आली आणि बघतोय तर..काय कासव त्या झाडाजवळ आधीच पोहचला होता.हे सर्व बघून सशाला योग्य वाटले नाही. ही नुसती एक कथा नसून प्रत्येक माणसाला काहीतरी यातून शिकण्यारखे आहे जर...कासव तिथेच थांबला असता तर कदाचित ही कथा वाचण्यात आली नसती म्हणुन याच समाजात राहणाऱ्या कोणत्याही माणसांनी चालत रहावे व त्या स्वाभिमानी कासव इकडून शिकून घ्यावे. चालत रहाणाऱ्याच वाटेत काटे,कंकर टाकले जातात, फासे टाकले जातात एवढेच नाही तर.इकडे आड, तिकडे विहीर खोदलेली असते त्यातून जाण्यासाठी सर्वात प्रथम आपल्या मनाशी एकरूप होऊन जावे,हिंमत हारू नये,स्वतःवर पूर्ण विश्वास ठेवावे संकटाच्या वेळी योग्य व्यक्तीचा सल्ला घ्यावे किंवा एखादी पुस्तक वाचून पुढचा मार्ग शोधण्यासाठी प्रयत्न करावे कारण ,चांगल्या व्यक्तीमत्वाकडून मिळालेला सल्ला व पुस्तकातून मिळालेलं ज्ञान हे कधीच व्यर्थ जात नाही तर...पुढचा मार्ग गाठण्यासाठी सदैव आधार होत असतात व आपले गुरू बनून मार्गदर्शन करत असतात.

जर आपल्याला थांबायचचं असेल तर एखाद्या व्यक्तीला मदतीची गरज किंवा कोणी बिमार असेल तर..माणुसकीच्या नात्याने त्यांची मदत करून माणुसकी धर्म निभावून दाखवावे पण,कोणी चालत असेल तर..त्याच्या वाटेत संकट बनून आपल्यातील माणुसकी विसरू नये, बरेचदा काही लोकांची सवय असते स्वतः कडे तर पूर्ण लक्ष देत नाही, स्वतः मध्ये शोधण्याचा कधीच प्रयत्न करत नाही, स्वतः धुतल्या तांदळासारखे नसतात किंवा दुधाने धुतले नसतात जरी अनेक गुण त्यांच्यात असतील तरी एक तरी अवगुण असतोच हे मात्र सत्य आहे या सर्व गोष्टीची जाणीव असताना सुद्धा चालणाऱ्याला थांबवणे खरंच विचार करायला लावणारी बाब आहे. एवढीच जर..दुसऱ्यांना थांबवण्याची आवड असेल तर..जी कोणी व्यक्ती आपली शेवटची घडी मोजत असेल किंवा मरणाच्या दारात उभी असेल तर..तिला एकदाचे थांबवून बघावे. जर...ताकत असेल तर... ? पण,असे कधीच होऊ शकत नाही कारण, मृत्यू हे अंतिम सत्य आहे तिला कोणीही थांबवू शकत नाही.

तसंच सत्याच्या वाटेवर चालण्याऱ्या माणसाचे जीवन सुध्दा तसेच आहे. तो ,सत्याचा स्वीकार करून, एकरूप होऊन जेव्हा चालत असतो तेव्हा मात्र त्याच्या जीवनात संकटाची रांग लागलेली असते ते,संकट कोणते वादळ, वारे,पाऊस नाही तर...याच समाजातील काही बोलते चालते, निंदक,हिंसक, रिकामटेकडे, पैशाचा माज,गर्व,अभिमान, नको त्या लोकांची संगत ज्यांना कोणतेही काम धंदे नसतात असेच लोक वेळातील वेळ काढून एखाद्याच्या वाटेत संकटे बनून त्याला थांबविण्यासाठी कटकारस्थान रचत असतात अशा प्रकारची विचारसरणी असलेल्या लोकांकडून अपेक्षा तरी कोणती ठेवायची. .. ? जे,स्वतःच भटकलेले आहेत व वणवण फिरून थकले असतात .

म्हणुन कोणत्याही माणसांनी हिंमत न हारता व कशालाही न घाबरता, कोण काय म्हणते याकडे लक्ष न देता जी योग्य आपण निवडले आहात त्या वाटेवरून चालत रहावे. कधीही चालणे थांबवू नये व कोणाचीही वाट बघू नये कारण या घोर कलियुग आहे या कलियुगात समोर नेणारा कोणीही भेटणार नाही त्या ऐवजी स्वतः च्या स्वार्थासाठी थांबवणारे लाखो भेटतील जीवन तर.. आपल्यालाच जगायचं आहे मग कशाप्रकारचे जगायचं आहे ते आपणच ठरवावे "थांबला तो संपला" हे कधीही विसरू नये पण,एक गोष्ट अवश्य लक्षात असू द्यावे आपण चालत रहावे पण कोणाचीही वाट अडवू नये किंवा चालणाऱ्याला कधीही थांबवू नये होऊ शकेल तर..सत्याच्या वाटेवर चालण्यासाठी त्यांना मार्ग दाखवावे हीच खरी माणसातील माणुसकी आहे आपल्याला कायम ठेवायची आहे.

# 'हसरी मुलं'



अक्षय थाटकर,
संपर्क क्र. : ९६५७१२७०३४


आधुनिक केसरी

**... प्रसिध्द लेखक उमेश मोहिते यांचा ' हसरी मुलं ' हा एकूण तेरा बालकथांचा संग्रह नुकताच कोल्हापूरच्या अभिनंदन प्रकाशन यांच्याकडून प्रकाशित झाला असून या बालकथांमधून मुलांचे संवेदनशील भावविश्व अगदी नेमकेपणाने साकार झाले आहे.**

सई आणि रजनी या दोघी मैत्रिणींमध्ये असलेल्या अतूट भावबंधाची गोष्ट ' मैत्रीण ' या कथेत असून ही कथा खरी मैत्री काय असते,याचे दर्शन घडवणारी आहे. तर स्वभावाने अगदीच हट्टी आणि टीव्हीचं प्रचंड व्यसन असलेल्या राजूमध्ये त्याची आई स्वतःच्या अंगभूत हुशारीने बदल कसा घडवून आणते,ते ' धडा ' कथेत रंगवले आहे.अभ्यासाचा नेहमीच कंटाळा करणाऱ्या बाळूला त्याची आई अभ्यासाचे महत्त्व कसे पटवून देते,ते ' आईचा प्रयोग ' या कथेत मांडले असून ही मनोरंजक कथा वैज्ञानिक माहितीही मुलांना देते,तर खेळाची भारी आवड असल्याने अभ्यासाचा सदैव कंटाळा करणाऱ्या मन्याला त्याचे सारे मित्र आपल्या कृतीतून कसा धडा शिकवतात आणि त्याला अभ्यास करण्यासाठी प्रवृत्त करतात,याचे चित्र 'आणि चूक उमजली ' या कथेत रंगवले आहे.' मैत्री ' ही कथा मुलांचे निरागस,निष्पाप नि संवेदनशील भावविश्व टिपत मुलांचे खेळकर भावविश्व नोंदवणारी आहे,तर ' स्वप्न ' ही कथा बाल कुमारांना त्यांच्या अपेक्षित उद्दिष्टापर्यंत नेण्यासाठी सदैव कार्यरत राहण्याचा बोध अगदी सहजतेने देते. श्रावणातल्या ऊन नि पावसासारख्या मित्रांतील रुसव्यांची ' खेळ ' ही कथा मुलांच्या भावविश्वात घेऊन जाते, तर ' परीराणीची गोष्ट ' कथेत लेखकाने अगदी कल्पकतेने मुलांच्या मनोराज्यातील परी विश्वाची सफर घडवली आहे,तर गरीब घरच्या नि वडील नसलेल्या सुरेशचा वाढदिवस त्याचे वर्गमित्र कसा अगदी अनोख्या आणि अभिनव रीतिने साजरा करतात आणि त्याच्या आनंदात सहभागी होतात,याचे देखणे चित्रण ' अनोखा वाढदिवस ' कथेत आहे.झोपडपट्टीत राहणाऱ्या आडदांड रम्याला त्याचे वर्ग शिक्षक माने गुरुजी स्वतःच्या कल्पक कृतीतून शाळेचा कसा लळा लावतात,हे ओघवत्या शैलीत ' रम्याची गोष्ट ' कथेत उमटले आहे,तर सतत शाळा बुडवणाऱ्या पम्या नि गण्याच्या आयुष्यातील केवळ एक प्रसंग त्या दोघांच्या मनात शाळेविषयी कसा लळा उत्पन्न करतो,याची गोष्ट ' जाणीव ' कथेत रेखाटली आहे,तर ' पॅडी ' या कथेत मित्रही दुसऱ्या मित्रावर कसे संस्कार करु शकतो,याचे नेटके दर्शन आहे.' चॉकलेट ' ही दोन अभ्यासू नि हुशार मित्रांची कथा मुलांच्या मनात अभ्यासाविषयी गोडी निर्माण करणारी आहे. .

.. थोडक्यात उमेश मोहिते यांचा ' हसरी मुलं ' हा बालकथा संग्रह बाल-कुमार वाचकांना त्यांच्या हसऱ्या,निरागस आणि संवेदनशील भावविश्वाचा पुनःप्रत्यय अगदी सहजतेने देऊन त्यांना निखळ आनंद देणारा आहे.मुलांना परिचित असलेल्या साध्या,सोप्या भाषेतल्या या कथा मुलांच्या संवेदनशील मनावर उत्तम संस्कारांचे आणि शिकवणूकीचे बीजारोपण करून त्यांचे रंजनही करतात आणि सहज सुंदरतेने त्यांच्या मनावर शिक्षणाचे महत्त्वही अधोरेखित करतात.त्यामुळे ' हसरी मुलं ' हा बालकथासंग्रह बालकुमार वाचकांना नक्कीच आवडणारा आहे. लेखकास पुढील लेखनास हार्दिक शुभेच्छा !

**हसरी मुलं - ( बालकथा )**
**लेखक - उमेश मोहिते**
**प्रकाशक - अभिनंदन प्रकाशन,**
**कोल्हापूर ( मो.७६६६१८६९२८ )**
**पृष्ठे - ५८**
**मूल्य - ११० रु.**



Rajasthan Kota's Pioneer Brand
# BANSAL CLASSES
PRIVATE LIMITED
Ideal for Scholars

LATE SHRI V.K. BANSAL SIR
Founder - Bansal Classes Pvt. Ltd.

SAMEER BANSAL
M.D.- Bansal Classes Pvt. Ltd.

CHANDULAL BIYANI
Chief Promoter - Bansal Classes, Maharashtra

AIR-1 5 TIMES | AIR-2 6 TIMES | AIR-3 6 TIMES | TOP 10 AIR 39 STUDENTS | TOP 100 AIR 300+ STUDENTS

## NEET परीक्षेत बंसल क्लासेसचाच महाराष्ट्रात डंका!

NEET (UG) 2023 RESULT

705 / 720

PALAK JAJU

मराठवाड्यातून प्रथम
महाराष्ट्रातून द्वितीय



पलक जाजू या गुणवंत विद्यार्थिनीचा सत्कार करताना बंसल क्लासेस महाराष्ट्राचे मुख्य प्रवर्तक श्री.चंदुलाल बियाणी सर,उपाध्यक्ष डॉ.रामेश्वर बांगड सर, स्टेट हेड प्रा.विष्णू घुगे सर, नांदेड बंसल क्लासेस संचालक श्री.धीरज तोष्णीवाल सर व फ्रेंचायजी हेड प्रा.बी.पी.सिंग सर

## पारदर्शक निकालाची यशस्वी परंपरा कायम...

SARAH ZAFAR 693/720
NEHARKAR PRADHUMN 683/720
PARTH KARAD 680/720
PATEL NIDA 677/720
DNYANESHWAR KATARE 670/720 (BIOLOGY 360/360)
SHIVAM SHELKE 670/720
MOHD SABOOR 663/720
SAMARTH AMBORE 660/720
TANUJ SHARMA 656/720
RAMEEZ AHMAD 652/720
PALAK GUPTA 651/720
GOVIND MUNDE 650/720
VAISHNAVI EKSHINGE 649/720
ABHISHEK LADDA 649/720
PRATHMESH KOTE 645/720
HARSHITA SAIN 641/720
SOHAM SOLANKE 640/720
SHRINATH SHINDE 640/720
SHRADHA DESHMUKH 640/720
SHREYASH BHOSLE 637/720
BASIM ALI KHAN 637/720
SAYYED ROOMI 635/720
POOJA MANKARI 634/720
TAHAA NAAWAB 631/720
THAWARE SUHAS 630/720
SHIVRATAN JADHAV 630/720
ABHIJIT JADHAV 620/720
NIRAJ TIMEWAR 619/720
ZOHA HAIDER 617/720
PRINCY GUPTA 613/720
MANE ROHAN 604/720
APURVA 604/720
SUKNE VISHAL 598/720
BIRAJDAR GURUPRASAD 591/720
PARIKSHIT WALGE 585/720
SAKSHI KADAM 579/720

5 दिवस फ्री डेमो क्लास

ADMISSIONS OPEN
NEET — PHYSICS | CHEMISTRY | BIOLOGY
IIT-JEE — PHYSICS | CHEMISTRY | MATH
MHT-CET — PHYSICS | CHEMISTRY | MATH | BIOLOGY

NEET/JEE-2024 REPEATER

PRE- FOUNDATION
5th 6th 7th 8th 9th 10th
• MTSE • SCHOLARSHIP • DR.HOMIBHABHA
• ANCQ • NSO • IEO • IMO • UIEO

रिजनल ऑफिस,महाराष्ट्र
91728 85008, 96573 57152

अधिक माहितीसाठी आपल्या नजीकच्या बंसल क्लासेस शाखेला भेट द्या

छत्रपती संभाजीनगर : 8412988988, अहमदनगर 1 : 9607834747, अहमदनगर 2 : 9607924747, अकोला : 9421894380, सोलापूर 1: 8983738205, सोलापूर 2 : 7030699099, लातूर : 9607314747 जालना : 9607424747, नाशिक : 9272099999, नांदेड 1 : 9607319797, नांदेड 2 : 9607059797 , परभणी : 9607114747, बीड : 8308646450, अंबाजोगाई : 7767090988, परळी वै. : 9028604555, माजलगाव : 8149118418, केज : 8605285003, पंढरपूर : 8530019006, उदगीर : 7218954747, गंगाखेड : 7887090101, गेवराई : 7757958216, उमरगा : 7517553601, बजाजनगर : 7887888147, अहमदपूर : 9175582947, पुणे 1 . : 7066082123, पुणे 2 : 9511276618, धाराशिव : 8669192909, पुसद : 9699260251, सिरसाळा : 8433576111, हिंगोली : 9921200988, संगमनेर : 8983341161, सिन्नर : 9370799062, वैजापूर : 9579286230, कळंब : 8317245003, बार्शी : 7066399099, वाशिम : 9588603575 देगलूर : 7720877070, 7720878080 नायगाव : 7720821919, 7720831919

# स्नेहबंध



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**अंकुर तो कोवळा कोवळा मातीत जणू त्या लेकुरवाळा मनी दाटला उमाळा, नयन सागरी त्या सोहळा.जशी माऊली बाळा... माझी शाळा काल सहज उन्हे उतरायला लागल्यावर घराच्या पाठीमागच्या बाल्कनीत उभी होते. इतक्यात घराच्या पाठीमागे असणाऱ्या त्या दहा बारा निलगिरीच्या झाडाच्या सळसळीने लक्ष वेधून घेतले. त्यातल्या त्या एका झाडाच्या त्या हलणाऱ्या पानावर मन विसावलं, अन्... विचाराधीन मन... बारावीच्या वर्गात असताना बोर्ड परीक्षेच्या अगोदर तानाजी बंडू ढाणे. ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट पाडळी निनाम. कॉलेजच्या त्या शेवटी शेवटीच्या त्या काही दिवसांवर शाळेच्या प्रांगणातली ती निलगिरीची झाडे..**

जानेवारीतला महिन्यातला तो बहुदा सरता आठवडा, तशा तर प्रत्येकाच्या काही खास आठवणी असतातच.पण का कोण जाणे ती झाडे म्हणजे आयुष्याचा एक भाग होती.म्हणजे निसर्ग रमनियतेमुळे असेल कदाचित पण त्यांचे ते सळसळ ने त्यांच्या त्या दूरवर विसावलेल्या त्या सावल्या त्यांचे जग .. कधी कधी कसं होत ना! एखादी गोष्ट जिव्हारी भिडते . म्हणजे त्या दिवशी तो क्षण संपूच नये असे वाटत होते. शाळा सोडून जाणे मनाला खूप वेदनादायी बनवत होते. अगदी खूप काही चांगले अनुभव ही नाही. पण म्हणून वाईटही नाही. एक सामान्य विद्यार्थीनीच पण का कोण जाणे! त्या दिवशी खूप काही हातून निसटून जात असल्याची ती भावना हृदयापर्यंत भिडली अन् डोळ्यातून ओघळून जमिनीवर विसावली.


असाच तो भूतकाळ एका क्षणात डोळ्यासमोर तरळून गेला.काही केल्या तो क्षण घट्ट पकडून ही थांबवू शकत नव्हते. एकमेकापासून वेगळे होण्याचा तो क्षण आजही नकळत डोळा ओलावतो. काय करणार शेवटी परिवर्तन हाच तर निसर्गाचा नियम... मन कधी कधी खूप हळवे होऊन जाते.अन् हरवलेल्या स्मृतींत हरवून जाते.तसेच काही विद्दुलतेच्या वेगाने धावणारे मन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निनाम' वर अन् निसटलेल्या भूतकाळात विसावले. काळाच्या ओघात माणूस किती पुढे निघून जातो ना! काही दिवसांपूर्वी मोठ्या शाळेत जाण्याचा योग आला. दारातून आत पाय ठेवला नि नजरेसमोर ... 'मोठ्या शाळेत' असताना वर्गाच्या समोर ध्वजारोहन आणि ध्वजवंदनासाठी असलेला तो स्टीलचा खांब त्याला असणारी सिमेंटची ती तीन वर्तुळ कट्टे, आणि त्याच वर्तुळ कट्ट्यावर बसून पाचवी च्या वर्गात असताना आलेला तो ताप आणि तापाने फणफणले ली ' ती ' उन्हात बसण्याच्या इच्छेने त्या स्टीलच्या खांबाला घट्ट पकडून तिने मारलेली ती घट्ट मिठी आणि त्यातली ती माझ्यासमोर होती. जणू आईलाच बिलगुन बसलेली होती. अन् क्षणार्धात अर्थात दुपारनंतर घरी वळलेली ती पाऊले समोरुन च चालत गेटच्या बाहेर पडली. एवढ्यात सहावीत असताना बरसलेल्या त्या श्रावण सरी अन् 'ओले हिरवे दिवस' हि कविता शिकताना कोसळलेला तो श्रावनातला पाऊस,
आणि वा.रा. कांत. यांच्या कवितेच्या त्या ओळी

**गिरी शिखरावरूनी सोगे सुटले ढगांचे,**
**ओले हिरवे दिवस येती जाती श्रावनाचे.**

खिडकीबाहेर कोसळणाऱ्या पावसाच्या सरींचा सुर ताल आणि वर्गात गुरुजींनी कवितेला लावलेली चाल अचानक ओठांवर आली. गुणगुणता गुणगुणता १५ ऑगस्ट २६ जानेवारी ला अभिमानाने गायलेले ते ध्वज गीत राष्ट्र गीत ,स्वागतगीत , गाताना अभिमानाने ताठ झालेली मान अचानक डोळ्यासमोर आली. इनिस्पेक्षणला आलेले साहेब आणि त्याच व्हरांड्यात पाटीवर लिहलेला teacher हा शब्द..! मराठी माध्यमातून शिकताना म्हणा की नुकतेच ABCD लिहायला शिकलेल्या एखाद्या विद्यार्थ्याला स्पेलिंग लिहायला येणे.याचा आनंद आजही स्मरणात राहतो.याच्यापेक्षा वेगळे उदाहरण आणखी काय असावे. बक्षिस घेण्यासाठी येताना वळलेल्या त्या नजरा मनाच्या हळव्या कोपऱ्यात अन् तिथल्या भिंती भिंतीत जाणवल्या. कधीतरी प्रार्थनेला झालेला उशीर अन् शाळेच्या गेटच्या बाहेर उंच भिंतीच्या आड लपताना, डोळे मिटून दूध पिणाऱ्या मांजराच्या फाजितीपेक्षा आणखी काय बोलावे. पण आईने लेकराला रागापासून वाचवण्याचा पदराआड लपवण्या चा तो अनुभव.. ही नावाप्रमाणे मोठ्या शाळेतच मिळाला. प्रत्येक दिवसाच्या अशा कितीतरी आठवणी आहेत. मोठी शाळा म्हणजे पाचवी अ, ब सहावी अ, ब नि सातवी अ, ब चे वर्ग म्हणजे आमची मोठी शाळा.मोठ्या शाळेची एक विशिष्ठ विशेष अशी जागा मनात होती. आणि आजही आहे. मोठे भाऊ बहिण तिला मोठी शाळा म्हणायचे.कधी कधी प्रश्न पडायचा. मोठी शाळा म्हणजे काय ? पण त्याच्यानंतर काळाच्या ओघात कधी तिला मोठी शाळा म्हणत गेलो,हे आमचे आम्हालाही समजले नाही.शाळेच्या सभोवताली असलेली ती उंच भिंत शाळेच्या समोर गेटच्या दुर्तफा असलेली अशोकाची ती झाडे , पश्चिमेच्या बाजूला असलेल्या पाचवी ब च्या वर्गखोली पुढे असलेले ते एकच नारळाचे झाड आणि त्याच्याभोवतालचा तो ओटा तसेच पाण्याच्या टाकीजवळ असलेल सागवानाचे झाड आणि टाकी कडे नजर वळली. एवढ्यात कानी चिवचिवाट घुमला. आणि का कुणास ठाऊक त्या वीस बावीस वर्षापूर्वीच्या त्या अशोकाच्या झाडांमध्ये एका बाजूच्या झाडावर काडी काडी जमवून घरटे बनवणाऱ्या त्या चिमण्या आणि पलिकडच्या झाडावर येणारे रावे ( पोपट ) आणि चिमण्यांचा तो चिवचिवाट म्हणजे त्यांचेही ते नाते कितीतरी विलक्षण ... आज ... कुठे ..कशी..
जणू अशी पाखरे येती.. अशीच एक अवस्था..

झाडांच्या बुंध्यात लावलेला तो चिनीगुलाब आणि वीटांच्या वरुन बाहेर आलेली त्या चिनीगुलाबाची ती वेल प्रसन्नतेने हसली.प्रत्येक वर्गखोली आणि वर्गासमोरच प्रांगण आणि त्याच्याही समोर असलेली बाग अगदी बागेतल्या त्या मातीत कधीकाळी ती माती आणि मातीशी असलेलं ते आपलेपणाचं नात ते म्हणतात, लाविते लळा, जशी माऊली बाळा. तिथल्या मातीत सहज हात घातला नि शाळेची ती घंटी टन..टन.. नि ... खूप दिवसानी म्हणण्यापेक्षा तब्बल २०, २२ वर्षापूर्वीची ती रांगोळी तीच दंगामस्ती डोळ्यामध्ये तरळली. अद्वैतातली भेट जणू, अश्रूंमध्ये सामावली. समोरच्या फळ्यावरचा तो सुविचार त्याखाली असलेल्या ठळक बातम्या, आज कोणत्या इंग्रजीतील प्यारे ग्रापचा मराठीतील सारांश, विद्या विनयेन शोभते. आई वडील व गुरुजी यांची आज्ञा पाळा. सुंदर अक्षर हाच खरा दागिना आहे . कोशिश करनेवालों की कभी हार नही होती। Try Try but dont cry. एक चलचित्र डोळ्यासमोर तरळून गेले. फळ्याजवळ गेले , थोडासा परकेपणा जाणवला. पण माऊलीच ती... हात फिरवताच थकल्या भागल्या संध्याकाळी एखाद्या लेकरान यावं अन् मायच्या कुशीत पहुडाव. मायच्या आणि लेकराच्या मायेचा तो अभुतपूर्व आनंदानुभव जाणवला. पण जिथून सुरुवात केली, तिला ...आपण...तिच्या प्रति आपलेही काही कर्तव्य आहे कि नाही.

आज इथल्या च मातीत रुजून एक जागृती, विद्या, अस्मिता, अशा उमलणाऱ्या त्या कितीतरी कलिका सुंदर फुलात उमलून स्वत्वाचा आनंद घेत दरवळापरी दरवळत आहेत. एखादा अमोल, प्रकाश, वैभव राहुल अंधाराच्या त्या कोपऱ्यापर्यंत एक किरण बनून पोहचला आहे. जाधव, महाडिक, पवार, माने, ढाणे, शेलार, देशमुख, शिंदे, पांढरपट्टे, देसाई, यादव अशी कित्येक नावे जी वळण वाटेवर सोबत आली. गाईड बनून मनाच्या मनात विसावली. आदरयुक्त भीती, शिक्षण ,आत्मियता, संस्कार, नम्रता, लीनता, याच्याबद्दल काय अन् किती बोलणार बोलण्यापेक्षा त्या पवित्र चरणाना चरणस्पर्श करुन एवढेच म्हणेन कि पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा. त्यांच्या ऋणात राहण्याची मनिषा... नवोदय स्कॉलरशीप आणि इतर अनेक स्पर्धातून तिच्या मुलांच्या विजयाची विजयगाथा ऐकते. आणि फक्त ऐकते. तेव्हा.. एक प्रश्न मनाला पडतो. तिच्या कुशीत अशा किती विजय गाथेच्या कथा लिहल्या गेल्या. जिथे अनेक असे हात मिळाले, ते कधी खांद्यावर तर कधी पापण्यांच्या कडाजवळ पोहचले. जिच्या अंगाखांद्यावर खेळून मोठे झालो. ती न थकता अजूनही विजयाच्या कथा लिहित आहे. नकळत काहीतरी जाणवले. आसक्त रुपी डोळ्यातले ते पाखरू तिच्या डोळ्यात ..दूर.. दूर... उडताना दिसले. पण त्या पुढे जाणाऱ्या पावलांना माहीतच नव्हते, आपल्याकडे पाहणारे ते डोळे... आणि आसुसलेल्या त्या डोळ्यात त्या कुशीत ...मी काय केले ? सोयीस्कर रित्या पुढे... पायरीवरचा तो पहिला दगड डोळ्यासमोर येऊ लागला..



पायरीचा पहिला दगड कळसाची विजयगाथा सांगतो. असं वाचनात आलं होत. मनाच्या त्या निर्धाराला मनात ठेवून...! छोट्याशा भेटीनंतर परतीच्या वाटेवर मागे वळून पाहताना मन ओलेचिंब झाले. don't say good bye बोलता बोलता सूर्योदयाच्या चाहुलीत सूर्यास्ताच्या लालीत बुडाले.

# उजेड पेरणाऱ्या काळोखाच्या कविता

आधुनिक केसरी

**'काळोखाच्या कविता' हा कवी नामदेव कोळी यांचा वर्णमुद्रा प्रकाशन,शेगाव यांनी प्रकाशित केलेला कवितासंग्रह असून,मुखपृष्ठ राजू बाविस्कर यांचे तर आतील बोलकी रेखाटने जितेंद्र साळुंखे यांचे आहेत.डॉ.भरतसिंग पाटील यांच्या प्रदीर्घ प्रस्ताविकेतून कवितासंग्रहाचा परिचय होतो. साधूचे कूळ आणि नदीचे मूळ पुसू नये असे म्हणतात त्याप्रमाणे कवी त्यापुढे जाऊन काळोखाचे गूढ पुसू नये असे म्हणतो.हा दुःखाचा वेदनेचा काळोख सर्वांच्याच वाटेला आलेला असतो. दुःखाच्या काळोखाची सल मनात असते म्हणूनच कवितेचा अर्थात 'काळोखाच्या कवितेचा' जन्म होतो.आणि या कवितेच्या माध्यमातून कवी उजेडाची तिरीप होऊन जातो.**

पखांचे मुंगळे दिसले की माय सुखावते कारण मायीला माहित आहे. पखांचे मुंगळे निघाले म्हणजे आता लवकरच पाऊस पडणार आणि सगळीकडे समृद्धी येणार म्हणून आनंदून जाणारी माय अन् शेतात गायी वासरांच उड्या मारणं, चिमण्यांची धुळांघोळ,मोरांचा नाच पाहून बापही आनंदी होतो.दुस-याच्या आनंदात आनंद पाहिला की घरही आनंदून जाते. थकलेल्या मायबापाची कविता मध्ये बाप सकाळ पासून फाटक्या कपड्यानिशी ढोरं घेऊन रानात जातो आणि माय अनवाणी पावलांनी दूरवरच्या रानात जाते दोघंही कष्ट करतात,बाप सांधेदुखी घेऊन तर माय पायांत कुरपं घेऊन परतते अन् कवी शहरातल्या मुलांना थकलेल्या माय बापाची कविता शिकवून परततो.या कवीते मधून कवीची आपल्या माय-बापाला म्हातारपणी कष्ट करावे लागतात या बद्दल अपराधीपणाची भावना दिसून येते.माय बापाला शेतात मदत करावी की शहरात काम कराव ह्या प्रश्नांच मोहळ सारखं कवीच्या डोक्यात असतं. प्रगती करायची तर गाव सोडावं लागत,शहरात जावं लागत,तिथेही प्रयत्न करत राहून मेहनत करावी लागते,पण पैसा,प्रगती,प्रतिष्ठा यासाठी हे सगळं करावच लागत.

**"माय माती माणसं ओढून नेतात गावात**
**पैसा प्रगती प्रतिष्ठा झुलवत ठेवते शहरात"**

**(प्रश्नांच मोहळ पृ.१५)** 'ही कुठली दहशत ?' या कवितेतून शेतमजूरांना उन्हातान्हात कष्ट करून कामाचे दाम मागायला शेत मालकाला घाबरत घाबरत पैसे मागावे लागतात. शेतमजूरांच्या मनातली शेतमालका बद्दल ची दहशत या कवितेतून दिसून येते.बाप जेव्हा पोरग शिकावं म्हणून पाटलाची खंडीभर ढोरं फुकट सांभाळतो. मास्तरान पोराला चांगलं शिकवावं म्हणून माय मास्तराला दाळदाना देते अन् शेवटी पोरग शिकून पाटलाचा आणि मास्तराचा त्यांच्याकडे किती पैसा शिल्लक राहिला हा हिशोब माय बापाला सांगतो.तेव्हा आपल शोषण झालं,पण लेकरू शिकल्यामुळे आता त्याचं कोणीही शोषण करू शकणार नाही.याचा आनंद पुढील ओळीत व्यक्त केला आहे.

**"अक्षर शून्य माय**
**बापाला हिशोबातल**
**कवडी इतकंही कळत नाही**
**पण पोराला हिशोब येतो**
**याचा आनंद आभाळात**
**मावत नाही"**

(हिशोब पृ.४५) ज्या विळ्याच्या जोरावर बापाने ह्या काळोखाला चिरलं त्या विळ्याशी जन्मभराच नातं आहे.कारण विळ्याच्याच मदतीने मायने लेकरांच्या नाळी कापल्या,आपल्या गुरांसाठी चारा कापला,जनावरांची शिंग साळली प्रत्येक ठिकाणी मदतीला येणाऱ्या विळ्याला बापानं धार लावली अनेक काम घेऊन हातावेगळी केली.जगण्याची लढाई लढली परंतु आता विळ्यासह घराला धार लावणारे आणि काळोखाला चिरणारे बाबा नसल्याने मायीचेही हात बोथट झाले आहेत.अशाप्रकारे थकलेल्या माय बापाची कविता,ही कुठली दहशत,हिशोब,विळा, समुद्र न पाहिलेला माणूस,सलाईन, ससा रे ससा,गणगोत या कवितांमधून माय बापाचे दर्शन होते .




शेतमजूर या कवितेतून शेतमजूरांचे हाल मांडतानाच तत्रैव ही कविता शेतमजुरांचे मन पिळवटून टाकणारे प्रश्न आपल्या समोर अधोरेखित करते. घरोबा,मजबूरी,शेतमजुराच्या पोरी या कवितांमधून शेतमजुरांचे शोषण त्यांची होणारी कुचंबना दिसून येते. त्यांच्या वाट्याला आलेले हे परंपरेने आले आहे. म्हणून ते त्याच मार्गाने चालत राहतात त्यामुळे शेतमजुरांच शोषण होतच राहते त्यांना सर्वकाही सहन करावं लागतं. परिस्थितीमुळे ते स्वीकारावं लागतं.हे पुढील ओळीत मांडलेले आहे

**"शेतमजुराच्या पोरी गरीब गायी**
**बिनबोभाट आपलासा करतात अनोळखी**
**खुंटा स्विकारतात आपल्या वाटेचा भोगवटा**
**रात्रीचा दिवस करत भोगतात आपली जन्मठेप"**
**(शेतमजुराच्या पोरी पृ.५१)**

शेतकरी शेतमजुरांचं हे अख्ख गावच सरकारी दवाखान्यात वेगवेगळ्या समस्यांनी भरती झाला आहे.गावातल्या प्रत्येकालाच कुठलं तरी दुखन झालेलं आहे. "गरिबाला आजाराला नापिकीला कंटाळून मरून पडलंय अवघं गाव शवागारात शहरातल्या सरकारी दवाखान्यात" (सरकारी दवाखाना पृ.५६) अशा शब्दात गावाचं दुःख मांडलेल आहे.त्यापेक्षा शहरात जाऊन पोटापाण्याचा प्रश्न मिटवण्यासाठी गाव सोडून लोक चालली आहेत. खेड्यापाड्यात टी.व्ही.,मोबाइल पोहोचला पण भुकेचा प्रश्न सुटला नाही.म्हणून बरेच लोक गाव सोडून निघून चालले आहेत, पण काही अंधश्रद्धाळू लोक गाव ओसाड झालं तर लक्ष्मी कोपेल म्हणून गाव सोडायला तयार नाहीत.जुन्या वाड्याच्या भिंतीवर पिंपळाचे झाड वाढावं तसं मोठ्या उमेदीने शेतात राबून कष्ट करणाऱ्या शेतकरी,शेतमजुरांमुळेच गावाला गावपण टिकून आहे.हे पुढील ओळीतून स्पष्ट होते. "कित्येक पिढ्यांपासून गावाला चिकटलीयत ही माणसं कराडीवर मुळ्या रोवत उमेदीन वाढणाऱ्या माडांसारखी (भंगतीचा पाय पृ.६८) एकंदरीतच काळोखाच्या कविता मधून माय,बाप,माय-बाप,शेतकरी शेतमजूर,गाव,गावकरी अन् शहरातील कष्टप्रद जगण्यातूनही जगण्याकडे सकारात्मकपणे पहायला मिळते. **कवितासंग्रह - काळोखाच्या कविता**
**कवी-नामदेव कोळी प्रकाशन- वर्णमुद्रा प्रकाशन, शेगाव. मूल्य -२५०**

**शरद ठाकर, ८२७५३३६६७५, सेलू, जि. परभणी**

# आम्ही पस्तीस टक्केवाले



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**नुकताच दहावी बारावीचा निकाल लागला व गुणवत्ता यादी जाहीर झाली. त्या यादीनुसार गुणवत्ता यादीत मुलांची नावं झळकली. ही गुणवत्ता यादी जशी स्टेट बोर्डातील झळकली, तशीच ती सी बी एस सी चीही झळकली. त्यातच ही गुणवत्ता यादी काही विद्यालय महाविद्यालयांनी तर झळकवलीच. व्यतिरीक्त ही गुणवत्ता यादी काही मातब्बर शिकवणी वर्गानंही झळकवली. त्यावरुन ती यादी पाहिली असता विचार आला आणि प्रश्न पडला की कोण होते या गुणवत्ता यादीत? या गुणवत्ता यादीत होते अगदी श्रीमंतांची मुलं. जी कितीतरी प्रमाणात गुणवत्ता यादीत आपल्या मुलाला आणण्यासाठी पैसा खर्च करीत असतात. लाखो रुपयाच्या शिकवण्या लावून देतात. कितीतरी पैसा त्या मुलांच्या शिकविण्यावर खर्च करतात.**

पुरेपूर साधनं उपलब्ध करुन देतात आपल्या मुलांना. घरीही त्या मुलांचा अभ्यास घेत असतात. ही गुणवत्ता यादी. या गुणवत्ता यादीत गरीबांची मुलं शक्यतोवर दिसत नाहीत. कारण त्यांच्याजवळ अशा शिकवण्या लावायला पैसाच नसतो. त्यांना शाळेतही बरोबर फिडबॅक मिळत नाही. कारण शाळेतील शिक्षक शिकविण्या शिकविण्यात लिप्त असतात. आजच्या काळातील या शिक्षकांना माहीत असते की आजची मुलं शिकवणी लावतातच. शिवाय नसेल लावली तर लावावी. म्हणूनच ते वर्गात शिकविण्यावर जास्त भर देत नाहीत. कारण समजा एखादा मुलगा वा दोनचार मुलं जर नापास झालीही, तरीही त्यांचं काय जातं? त्यांना बरोबर बढती आणि इतर भत्ते ठरलेलेच असतात. त्यांचे वेतनही निकाल हा निष्कर्ष गृहीत धरुन कापले जात नाहीत आणि त्यांचे वेतन आणि भत्तेही कमी होत नाही. कारण बरेचसे शिक्षक आज अशा नोकरीवर नातेवाईक असतात.

आजच्या काळात शिकवणी वर्गाचं शाळेशी संधान असतं. कोणाला मेरीट आणायचं. कोणाला नाही हेही ठरलेलं असतं. ते सर्वच मुलांना गुणवत्ता यादीत आणत नाही. तसा संशय निर्माण होवू शकतो. तशीच जेवढी मुलं त्या शिकवणी वर्गाची गुणवत्ता यादीत येईल. तेवढी त्यांच्या शिकवणी वर्गाची फी वाढत असते. म्हणून शिकवणी वर्गाचे अशा मुलांना गुणवत्ता यादीत आणण्याचे प्रयत्न. कारण त्या गुणवत्ता यादीनुसार त्या शिकवणी वर्गाचं महत्व वाढतं ना.

मागे अशाच एका प्रसिद्ध शिकवणी वर्गाचं बिंग फुटलं. तो शिकवणी वर्ग सर्रासपणे तसं सेटींगच करीत होतं गुणवत्ता यादीत आणण्यासाठी. परंतू वाईट ते वाईटच. खोटेपणा कधी ना कधी बाहेर येणारच. तसं ते बिंग फुटलं. आज त्या शिकवणी वर्गाचं नावच कुठं दिसत नाही. परंतू आज असे बरेचसे शिकवणी वर्ग आहेत की ज्या शिकवणी वर्गातील मुलांना शाळेत जावेच लागत नाही. फक्त शिकवणी वर्गाला जावे लागते. पैसे ठरलेले असतात. आता कोणी म्हणतील की मुलं जर गुणवत्ता यादीत पैशानं येतात तर त्यांना शिकवणी वर्गात जाण्याची काय गरज आहे? याबद्दल सांगायचं झाल्यास गरज आहे असं म्हणता येईल. कारण पुर्णच मुलांचे पेपर शिकवणी वर्ग आपल्या हातानं सोडवून देणार नाहीत. तसंच शिकवणी वर्ग काही स्वतः पेपर सोडविण्याच्या सेंटरवर जाणार नाहीत. पेपरमध्ये काही ना काही तर विद्यार्थ्यांना सोडवावेच लागेल ना. त्यामुळंच त्या




मुलांना पेपर सोडवावा लागत असल्यानं ते विद्यार्थी शिकवणी वर्गाला जात असतात. आज अशीच सारी व्यवस्था. गुणवत्तेसाठी रस्सीखेच. आज विद्यार्थ्यांना शाळेत वा महाविद्यालयात जाण्याची गरज नाही. सारं साच्यात टाकल्यासारखं. शिक्षणासाठी पै पै पैसा खर्च केला जातो आणि अशांचीच मुलं पुढे जावून डॉक्टर, इंजिनीअर बनतात किंवा मोठ्या हुद्द्यावर जात असतात. अशा मुलांचा सत्कार होतो. ती गुणवत्ता यादीत येतात तेव्हाही आणि ती मोठ्या हुद्द्यावर पोहोचतात तेव्हाही. त्यांच्या मुलांना पुरस्काराच्या नावावर मोठमोठे बक्षीस मिळत असतात. काही बक्षीस हे पैशाच्या स्वरुपाचे असतात.

याचाच अर्थ असा की पैशाच्या जागी पैसा जातो. ज्या पैशाची निकड गरीब मुलांना असते. गरीबांची मुलं. ती मागेच पडतात. कारण त्यांच्याजवळ पुरेशी शिकवणी लावायला पैसा नसतो. शाळेतही ढंगाचं शिकायला मिळत नाही. एवढंच नाही तर ती मुलं जेव्हा शिकत असतात. तेव्हाही त्यांना पोट भरायला जवळ पैसा नसल्यानं ती मुलं कामाला जात असतात. पोटाची गरज म्हणून पोट भागविण्यासाठी काम करुन पैसाही कमवीत असतात आणि शिकतही असतात. अशावेळेस अशा परिस्थितीत अशा मुलांना किमान जर पस्तीस प्रतिशत गुण मिळालेच तर ते गुण वाखाणण्याजोगे असतात. खरं तर त्यांचा सत्कार व्हायला हवा. परंतू तसा सत्कार त्यांचा कोणीच करीत नाहीत. कारण आजचा काळ हा पैशाचा आहे. दिखावूपणाचा आहे व भ्रष्टाचाराचा आहे. आजच्या काळात गरीबांना वाव नाही. तसंच गरीबांच्या लेकरांच्या गुणवत्तेलाही वाव नाही. महत्वाचं म्हणजे अशा पस्तीस टक्के गुण मिळविणा-या मुलांचाही सत्कार व्हावा. त्यांना दुषणं देवू नये. कारण ते पास होतात काबाडकष्ट करुन. त्यांच्या घामातून ते गुण पडत असतात. याची जाणीव आपल्याला असायला हवी. हे तेवढंच खरं आहे.

# कृ. ब. निकुंब यांच्या कवितेतील माहेरचे वर्णन



प्रा.सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**मराठी साहित्य सृष्टीतील चिंतनशील भावकवी म्हणून ओळखले जाणारे कृ.ब. निकुंब यांचे पूर्ण नाव कृष्ण बळवंत निकुंब असे असून त्यांचा जन्म ९ ऑगस्ट १९२० रोजी झाला. त्यांचे शालेय शिक्षण सरकारी हायस्कूल व महाविद्यालयीन शिक्षण हंसराज प्रागजी ठाकरशी महाविद्यालय नाशिक येथेच झाले . एम. ए. मराठी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या निकुंब यांनी कर्नाटक महाविद्यालयात प्राध्यापक व लिंगराज महाविद्यालय बेळगाव येथे विभाग प्रमुख म्हणून कार्य केले. त्यांचे उर्मिला,उज्वला, अनुबंध, सायसाखर, अभ्र, इ. काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. जीवनात जे जे उदात्त आणि कोमल आहे.**

त्याचे वर्णन त्यांनी आपल्या काव्यरचनेतून केले आहे. मानवी भावभावनांचा तरल आविष्कार त्यांच्या कवितेतून झालेला दिसतो. विविधांगी काव्यरचना करणाऱ्या निकुंब यांनी "अनुबंध "या काव्यसंग्रहातील काही कवितांमध्ये माहेरचे व "चंदन या कवितेत "आपल्या आई विषयी मुलाला वाटणाऱ्या कृतज्ञतेचे अतिशय भावस्पर्शी असे वर्णन केले आहे. प्रत्येक आई-वडिल आपल्या मुलांसाठी अगदी चंदनाच्या खोडाप्रमाणे झिजतात. व त्यांच्या जीवनाला गारवा देतात. आपल्या आई विषयी वर्णन करताना सुद्धा कवी म्हणतात,

**माझ्या चंदनी खोडाचा**
**मंत्र:' झिजणे झिजणे!'**
**ऊणे लिंपायाला माझे**
**घाली सुगंधाचे लेणें**
**झिज केशरी तयाची**
**तप्त जीवा लावी उटी**
**आंत उमले भावना**
**शांत ,शीतल ,गोरटी!**

कवी आईचे वर्णन करताना तिला चंदनाची उपमा देतात. चंदनाचे खोड स्वतः झिजते व इतरांना शीतलता देते. तसेच आईने सुद्धा सदैव कष्ट करून कवींच्या जीवनात कोणती उणीव राहू नये याची काळजी घेतली. जणू काही त्यांनी कवीच्या उणीपणाचे लिंपण करण्यासाठी स्वतःचा देह झिजवून सुगंध दिला. आईच्या या कष्टांमुळे कवीच्या जीवनातील संकटे दूर होऊन शांत शितल



असा गारवा त्यांना मिळाला. पुढे कवी म्हणतात,

**माझें सुख, माझी तृप्ति**
**हीच देवपूजा त्याची_**
**निष्कामध्ये अपवाद**
**इच्छा एक झिजायाची!**
**झिजते ते _जीव माझा**
**होतो आतं आतं गोळा**
**अडखळे हात आणि**
**पाणी तरारते डोळा_**

कवी म्हणतात, माझ्या आईला माझे सुख व माझी तृप्तता हीच तिची देवपूजा वाटते. बाकी सारे काही तिच्यासाठी व्यर्थ असते. तिचे कष्ट पाहून माझा जीव व्याकूळ होतो. व तिच्यासाठी माझ्या डोळ्यात पाणीही येते. आईच्या कष्टांची जाणीव कवीला आहे. व ती जाणीव ते सदैव ठेवतील असा विश्वासही ते आईची शपथ घेऊन देतात. आई विषयी कवी म्हणतात,

**वृद्ध चंदन ते माझें नित्य जपले- जपेन**
**त्याच्यासाठी_ आण त्याची_**
**जीव ठेवीन गहाण!**

आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव प्रत्येकजन ठेवतोच असे नाही. कवीने मात्र आपल्या वृद्ध आईला आत्तापर्यंत जपले आहे व यापुढेही जमेल असेच ते ठामपणे सांगतात. त्यासाठी स्वतःचा जीव गहाण ठेवण्याची ही त्यांची तयारी आहे. कृ.ब. निकुंब यांच्या" घाल घाल पिंगा वाऱ्या"या प्रसिद्ध रचनेतही त्यांनी माहेराचे भावस्पर्शी वर्णन केले आहे. कमलाकर भागवत यांनी संगीतबद्ध केलेल्या या कवितेला सुमन कल्याणपुर यांनी आपल्या सुमधुर आवाजाने अजरामर केले आहे. प्रत्येक सासुरवाशीनिला माहेराची आठवण देणारी ,ओढ लावणारी अशी ही काव्यरचना आहे. प्रत्येक सासुरवाशीनिचे त्या माहेरावर, माहेरातील नातलगांवर असणारे प्रेम या कवितेच्या शब्दा-शब्दातून कवीने व्यक्त केले आहे. कवी म्हणतात,

**घाल घाल पिंगा वाऱ्या, माझ्या परसात**
**माहेरी जा ,सुवासाची कर बरसात!**
**"सुखी आहे पोर" सांग आईच्या कानात-**
**"आई ,भाऊसाठी परिमन खंतावतं!**

सासरी असणारी सासुरवाशीन वाऱ्याला विनवणी करते आहे. ती वाऱ्याला म्हणते ,"माझ्या परसात पिंगा घालून तू माहेरी जा व माहेरी सुवासाची बरसात कर. आईच्या कानात ,"तुझी लेक सुखी असल्याचे सांग. ही सासुरवाशीन आई व भावाच्या आठवणीने दुःखी झालेली आहे. पुढे कवी तिच्या भावना व्यक्त करताना म्हणतात,

**विसरली का ग ?- भादव्यात वर्स झालं,**
**माहेरीच्या सुखाला ग मन आचवलं.**
**फिरून फिरून सय येई जीव वेडावतो**
**चंद्रकळेचा ग शेव ओलाचिंब होतो!**
**काळ्या कपिलेची नंदा खोडकर फार**
**हुंगनिया करी कशी ग बेजार!**

सासरी रमलेल्या सासुरवाशीनीला संसारातील जबाबदाऱ्यांमुळे सारखे माहेरी जाणे होत नाही. भाद्रपदात वर्ष झालं तरी तिचे माहेरी जाणे झाले नाही. माहेरी जाण्यासाठी मन खूप आसुसले आहे. फिरून फिरून माहेराची आठवण येते व जीव वेडा पिसा होतो. त्या आठवणींमुळे तिच्या अंगावरील चंद्रकळेचा पदरही अश्रुंनी भिजून जातो. या सासूरवाशीनीची माहेरातील कपिला गायीच्या नंदा नावाच्या कालडीवरही खूप माया असते व त्या वासरालाही तिच्या येण्याची ओढ लागते. असे हृदयस्पर्शी वर्णन कवी निकुंब यांनी केले आहे. पुढे कवी म्हणतात,

**परसात पारीजातकाचा सडा पडे**
**कधी फुल वेचायला नेशील तू गडे!**
**कपिलेच्या दुधावर मऊ दाट साय**
**माया माझ्यावर दाट जशी तुझी माय!**

सासुरवाशीन लेकीला माहेरच्या अंगणातील पारिजातकाच्या फुलांच्या सड्याची ही आठवण येते, व ती फुलं वेचण्यासाठी आईने आपल्याला माहेरी न्यावे असे तिला मनोमन वाटू लागते. कपिला गायीच्या दुधावरील दाट सायीसारखी आईची माया असल्याचे तिला वाटते. पुढील शेवटच्या ओळींमध्ये कवी म्हणतात,

**आले भरून डोळे पुन्हा गळा नि दाटला**
**माऊलीच्या भेटीसाठी जीव व्याकुळला!**

लेकीवर दुधावरच्या सायीसारखी दाट माया करणाऱ्या आईच्या भेटीसाठी सासुरवाशीचा गळा दाटून आलेला येतो. डोळे भरून आलेले येतात व जीवही व्याकुळ होतो.

अशा प्रकारचे सुंदर वर्णन कवी कृ.ब. निकुंब यांनी केले आहे. सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ.ज्योत्स्ना कोल्हटकर निकुंब यांच्या कवितेचे वर्णन करताना म्हणतात ,"वैयक्तिक अनुभूतीचे कलात्मक अविष्कारण त्यांनी कवितेतून केले आहे."असे अजरामर काव्य लिहिणाऱ्या कृष्ण बळवंत निकुंब यांनी ३० जून १९९९ रोजी या जगाचा निरोप घेतला. मराठी साहित्यसृष्टीतील त्यांचे योगदान कधीच विसरता येणारे नाही.

## लय भारी सुगरण



सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424

आधुनिक केसरी




**साहित्य :** दीड वाटी स्वीटकॉर्न, 1 वाटी रवा, अर्धी वाटी दही, 1 सिमला मिरची बारीक कट केलेली,1 गाजर किसून, 5..6 लसूण पाकळ्या व अर्धा इंच आले व 3..4 हिरव्या मिरच्या यांची पेस्ट, 1 चमचा जिरे थोडी चिरलेली कोथिंबीर, 1 चमचा इनो पावडर, 1 चमचा मोहरी, 1 चमचा तीळ, मीठ, अर्धा चमचा हळद पावडर, हिंग पावडर, तेल. **कृती :** प्रथम कॉर्न मिक्सरमधून बारीक वाटून घेऊन त्यात आले. लसूण, मिरची पेस्ट घालावी.मग त्यात रवा, दही व अर्धी वाटी पाणी घालून त्यात मीठ घालून हळद, हिंग घालून व्यवस्थीत मिक्स करून 15 मिनिटे झाकून ठेवावे. 15 मिनिटानंतर रवा फुगल्यामुळे पीठ छान तयार झालेले असेल. आता त्यात सिमला मिरची, गाजर, जिरे, कोथिंबीर घालून 2 ..3 चमचे तेल घालून पुन्हा हलवावे. बारीक गॅसवर आप्पेपात्र गरम करण्यास ठेवावे. त्यात थोडे तेल लावून घ्यावे. शेवटी पीठात इनो घालून त्यावर 1 चमचा पाणी घालून फुगून हलके होईपर्यंत फेटावे व आप्पेपात्रातील तेलात आता मोहरी व तीळ घालून त्यावर पीठ घालून झाकून ठेवावे. मंद आचेवरच हे आप्पे करावेत म्हणजे ते आतून छान वाफतात व वरून क्रिस्पी होतात. आप्प्यांचा कच्चेपणा जाऊन त्यांचा रंग बदलला की त्यावर तेल सोडून उलटून दुसऱ्या बाजूनेही सोनेरी रंगावार भाजून तयार करावेत. शेवटी ते सर्व्हिंग डिशमधे काढून हिरव्या चटणी बरोबर किंवा टोमॅटो सॉस बरोबर खायला द्यावेत.

**वैशिष्ट्य :** भाज्यांमुळे हेआप्पे हेल्दी तर होतातच पण जास्त तेल, तूप न वापरता केल्यामुळे हेल्दी व पौष्टिक व पोटभर होते. हे नाविण्यापूर्ण हेल्दी कॉर्न आप्पे सर्वांनाच नक्की आवडतील.

# कृषी विपणन व्यूहरचना (ॲग्रीकल्चरल मार्केटिंग स्ट्रॅटेजी)



डॉ. विलास इप्पर
संपर्क क्र.: 9322185214

आधुनिक केसरी

**बाजार व्यवस्थापन, किंवा विपणन व्यवस्थापन ही अत्यंत महत्त्वाची संकल्पना आहे. उत्पादित माल, वस्तू, सेवा उपभोक्ता किंवा ग्राहकांना त्यांच्या गरजेनुसार आणि मागणीनुसार व्यवस्थापकीय कौशल्याचा, नियोजनबध्द आराखडा करून पुरविणे आणि आपले ग्राहक टिकविणे आदीचा समावेश विपणन व्यूहरचना या संकलपनेत येतो. कृषी क्षेत्रातील मालाला मात्र योग्य बाजारभाव, किंवा वाजवी किंमत मिळत नाही. याची विविध पैलूवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे. प्रचलित असलेली एक अशी म्हण आहे की, "जो पिकवतो त्याला विकता येत नाही" पण "जो विकतो तो चलाख असतो", हेच दुसऱ्या शब्दात सांगायचं झालं तर "बोलणाराच्या अंबाड्या पण विकल्या जातात".**

तथापि कोणताही उत्पादित माल वा वस्तू आणि सेवा बाजारात विकणे ही एक कला आहे. त्याचप्रमाणे कृषीमाल किंवा कृषीमालावर प्रक्रिया केलेल्या वस्तू बाजारात योग्य किंमतीला विकणे ही एक अत्यंत महत्त्वाची कला किंवा बाब आहे. आपण आज या लेखात "विपणन व्यूहरचनेबाबत म्हणजे "मार्केटिंग स्ट्रटेजी" समजून घेणार आहोत. तथापि बाजारात आपल्या उत्पादित वस्तू किंवा मालाची विक्री करण्यासाठी योग्य नियोजन आणि योग्य वितरण प्रणाली द्वारे वस्तू व सेवा ग्राहकांना विकण्यासाठी योग्य विपणन व्युहरचना या संदर्भात या लेखाचा उद्देश आहे. "कृषी विपणन व्यूहरचना" या शीर्षकाखाली कृषीमाल आणि कृषी मालावर प्रक्रिया करून त्या वस्तू वाजवी किंमतीत उपभोक्त्यापर्यंत, उत्कृष्ट दर्जाच्या वस्तू ग्राहकांना विक्री करण्याचे व्यवस्थित नियोजन करणे हे दुसरे मूलभूत उद्दिष्ट समोर ठेवून या संदर्भात मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. बाजारातील वस्तूच्या किंमती त्या वस्तूचे पॅकिंग बॉक्स, पॉकेट, बॉटल, यावर प्रिंट केलेल्या असतात. औषधी, रसायने, खते, तणनाशक व इतर फवारणी औषधी कीटकनाशक यावर किंमती ह्या प्रिंट केलेल्या असतात. तसेच दैनंदिन वापरातील इतर वस्तू जसे की साबण, टूथ पेस्ट, अशा विविध वस्तू उत्पादक कंपनीकडून वस्तूंच्या किंमती लिहिलेला असतात, आणि ज्या किंमती लिहिलेले असतात तेवढीच किंमत उपभोक्ता किंवा ग्राहकाला मोजावी लागते. म्हणजे ग्राहकांना अशा वस्तूच्या किंमती ठरविण्याचा किंवा कोणतीही घासगीस किंवा बार्गेनिंग करण्याचा अधिकार नसतो. थोडक्यात अशा वस्तूंचे मूल्य ठरविण्याचा अधिकार ग्राहकांना नसतो. अशा वस्तू किंवा सेवा उत्पादित करणाऱ्या अनेक कंपन्या बाजारात असतात. विशेष म्हणजे जागतिकीकरणामुळे परदेशी कंपन्या देखील अशा वस्तू निर्माण करून, उत्पादित करून आपल्या देशात किंवा इतर विविध देशात उतरवतात. थोडक्यात अत्यंत तीव्र स्पर्धा आपल्याला बाजारात दिसते, ज्याला आपण गळेकापूस स्पर्धा म्हणतो कट ( थ्रोट कंप्यूटिशन. या स्पर्धेमध्ये त्या कंपन्या आपले अस्तित्व टिकवण्यासाठी वेगवेगळ्या आयडिया करत असतात, कृप्त्या लढवीत असतात, जसे की जाहिरातबाजी. अशा कंपन्या आपला माल विक्री व्हावा म्हणून ज्या पद्धतीने नियोजन करतात त्यामध्ये जाहिरातीला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. या सर्व गोष्टींना मिळून आपण "मार्केटिंग स्टेटेजी" म्हणतो. तथापि वरील उल्लेख केलेल्या कोणत्याही वस्तूंच्या किंमती या निश्चित असतात आणि त्या किंमतीत उत्पादन खर्चाचा व्यवस्थापकीय खर्चाचा, प्रशासकीय खर्चाचा त्याचप्रमाणे ट्रान्सपोर्टेशन वाहतूक खर्च आणि इतर खर्चाचा समावेश केलेला असतो. अशा वस्तूच्या किंमती कधीही कमी होताना दिसत नाहीत, उलट त्या बाजारातील तेजीनुसार वाढत्याच ट्रेण्ड मधे असतात. म्हणजेच ग्राहकांना अशा वस्तू ह्या बाजारातील निश्चित किंमतीला खरेदी कराव्याच लागतात. अशा वस्तूच्या निर्मितीत असलेल्या कंपन्या वेगवेगळ्या आयडिया व्यूहरचना किंवा वास्तू ग्राहकांच्या माथी मारण्यादाठी वस्तु वेगवेगळ्या प्रकारे प्रयत्न करत असतात. इथं नफा कमविणे हे कंपन्याचे उद्दिष्ट असते ते पूर्णत्वाला नेतात. पण कृषी मालाच्या बाबतीत मात्र असे होताना दिसत नाही. शेतकऱ्यांना वर उल्लेख केलेल्या व्यवस्थेतील अनेक वस्तू इनपुट्स किंवा निविष्ठा म्हणून खरेदी कराव्याच लागतात. उदाहरणार्थ बी-बियाणे, खते, रसायने, पेस्टिसाइड्स, अवजारे. तथापि हे आदान किंवा इनपुट्स शेतकऱ्यांना कंपनी ठरवेल त्याच किंमतीला खरेदी कराव्या लागतात. परिणामी कृषी क्षेत्रात कार्यरत असलेल्या लोकांना किंवा शेतकऱ्यांना खूप मोठ्या प्रमाणात जोखीम पत्करावी लागते. कारण वाढत्या किंमती बरोबर उत्पादन खर्च वाढत जातो. अर्थात त्या प्रमानात उत्पादित वस्तूंना बाजारात किंमत येणे पण महत्त्वाचे असते, तरच हा व्यवसाय तग धरून राहील. पण तसे होताना दिसत नाही तर या लेखात हाच प्रश्न काही अंशी सोडविण्यासाठी समजून घेण्यासाठी आपण कृषी विपणन व्युहरचना म्हणजेच एग्रीकल्चरल



मार्केटिंग स्ट्रॅटेजीचा विचार करत आहोत. कृषी विपणन व्यूहरचनाची गरज कृषी माल मग तो कापूस असेल सोयाबीन असेल हळद, तुर मूग, अथवा ज्वारी गहू अथवा इतर कडधान्य यामध्ये प्रामुख्याने समावेश होतो. आपल्या देशात या कृषी मालाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असते. परंतु चुकीच्या बाजार व्यवस्थेमुळे, बाजारातील व्यापाऱ्यांच्या संगनमतामुळे, किंवा शेतकरी हा असंघटित असल्यामुळे अशा वस्तूंना वाजवी किंमत मिळत नाही. किंवा अशा वस्तूंच्या किमती ह्या बाजारातील मागणी पुरवठ्याच्या नियमात येतात. अशा वस्तूचा पुरवठा सीझनमध्ये किंवा विशिष्ट काळामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये होतो, ज्याला आपण "सुगी" म्हणजे माल काढणी सिजन म्हणतो. पण या वस्तूंचा वापर मात्र वर्षभर चालतो. म्हणजे त्या वस्तू वर्षभर वापरण्यात येतात. परिणामी पूर्व एकाच वेळी पुरवठा जास्त आणि मागणी कमी अशा परिस्थितीमुळे वस्तूंच्या किंमती झपाट्याने खाली येतात. कृषी विपणन व्यूहरचना आपण वर उल्लेख केल्याप्रमाणे, बाजाराचा योग्य अभ्यास करून, मागणीपूरवाठ्याचा अभ्यास करून, बाजारातील विविध घटकांचा अभ्यास करून, योग्य नियोजन झाले पाहिजे. असा माल उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांनी म्हणजेच उत्पादकाने आपला माल योग्य त्या किंमतीला विकण्यासाठी, स्वतः कृषी मालावर प्रक्रिया करणारे उद्योग सुरू केले पाहिजे, कृषी अन्नप्रक्रिया उद्योग स्वतःच केल्याने स्वतःच ते कच्च्या मालाचा पुरवठा करणार असल्याने नफा मिळविता येईल. हल्ली असा उद्योग व्यवसाय स्थापन करण्यासाठी सरकार देखील प्रोत्साहन करत आहे. त्याचप्रमाणे माल साठवणीसाठी गाव पातळीवर किंवा मार्केट यार्ड मध्ये स्टोअर करून साठवून ठेवून योग्य त्या वेळेला तो विक्रीसाठी काढता येऊ शकतो. त्याचप्रमाणे बाजाराचा अभ्यास करून बाजारातील आपल्या ग्राहकांची आवड निवड लक्षात घेऊन, गरज लक्षात घेऊन मालाचे योग्य पॅकिंग सुद्धा झाले पाहिजे. आपल्या मालाचे योग्य प्रमाणे प्रमानीकरण आणि प्रतवारी करून योग्य ते बँडिंग पॅकिंग केले पाहिजे. म्हणजे असा माल बदलत्या बाजार परिस्थितीनुसार उपलब्ध करून देता येईल. हल्ली अनेक शहरात मोठे मोठे मॉल्स किंवा बिगबाजार स्थापन होत आहेत. त्या बाजारात आपल्या वस्तू, पॅकिंग झालेल्या वस्तू तेथे उपलब्ध करून देता येऊ शकतात. म्हणजेच शेतकऱ्यांनी आपण स्वतः पॅकिंग अथवा प्रक्रिया करण्यासाठी या कृषी क्षेत्रात उतरले पाहिजे. शेती क्षेत्राला व्यवसायिकतेचे स्वरूप देता आले पाहिजे. यासाठी संशोधन व विकास रिसर्च आणि डेव्हलपमेंट झालं पाहिजे. असं म्हणतात की "गरज ही शोधाची जननी आहे" तर आपल्या वस्तूला योग्य किंमत मिळावी ही आपली गरज आहे, तर शोध आपल्यालाच घ्यावा लागेल. त्यामुळे समूहाने, गटागटाणे, गावातील लोकसहभागाने, व्यवसायिक दृष्टिकोन ठेवून कृषी क्षेत्रात आपल्याला कार्य करावेच लागेल. कृषी क्षेत्रात रोजगाराच्या प्रचंड संधी आहेत. तथापि एकीकडे बेरोजगारी दिसत असली तरी दुसरीकडे कृषी क्षेत्रामध्ये रोजगार किंवा कामगार मिळत नाहीत, सुशिक्षित लोकांनी तरुणांनी आपला व्यवसायिक दृष्टिकोन विकसित करून या क्षेत्राचा विकास करण्याचे उद्दिष्ट ठेवून स्वतःला एक व्यावसायिक म्हणून या व्यवसायात उतरविले पाहिजे. याप्रमाणे आपल्याला कृषी क्षेत्रात विपणन व्यूहरचना लक्षात घेऊन योग्य ते शिक्षण प्रशिक्षण अनुभव घेऊन आपण आपल्या वस्तूंना बाजारामध्ये स्थान आणि योग्य किंमत देण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. थोडक्यात कृषीकडे एक व्यवसाय म्हणून पाहिलं पाहिजे. म्हणजे त्याप्रमाणे नियोजन करून परत परत अभ्यास करून योग्य व्यवस्थापन करून कृषी मालाला योग्य किंमत मिळविता येईल आणि परिणामी आपला आर्थिक विकास होईल.

# मोबाईलमध्ये हरवलेले बालपण

आधुनिक केसरी

**लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा ॥ ऐरावत रत्न थोर ।त्यासी अंकुशाचा मार ॥ संत तुकाराम महाराज यांच्या अभंगातील या प्रसिद्ध ओळी. संत तुकाराम महाराज म्हणतात की लहानशा मुंगीला साखरेचा आणि रव्याचा खाऊ खायला मिळते. मुंगी लहान जीव असूनसुध्दा सुखाने जीवन जगत असते.त्याउलट ऐरावत म्हणजे हत्ती, शरीराने एवढा मोठा राहूनही त्यास माहुताकडून अंकुशाचा मार खावा लागतो. म्हणजेच लहानपणातील जीवन किती सुखी आणि मस्तीचे असते, हे या ओळीतून अधोरेखित होते.**



संत तुकारामांच्या या ओळी आठवल्या की परत आपल्याला एकदा बालपणात जावेसे वाटते. बालपण म्हटले की मजाच मजा. कोणते काम नाही, कोणती जबादारी नाही. हिंडणे, फिरणे, बागडणे, इकडे तिकडे उड्या मारणे, मित्रासोबत मस्त खेळणे एवढेच काम. आमच्या लहानपणी विटी दांडू खेळणे, गोळ्या खेळणे, आंबु- टीम्बु, सई-डाई, लपन छुपण, क्रिकेट, असे कितीतरी खेळ खेळत रहायचे. जोपर्यंत आई किंवा बाबाची हाक कानावर येत नाही किंवा पाठीवर रट्टे पडत नसत तोपर्यंत घरी कोणी जात नसत. एवढे खेळण्यात मग्न असायचे. रविवारी सुट्टीच्या दिवशी नदीवर अंघोळ करायला जाणे, आंब्याच्या आमराईत आंबे पाडायला जाणे तर कधी बंदरांना पिटाळत असायचे. असे कितीतरी खेळ आम्ही लहानपणी खेळायचे. आता काळ बदलला आहे. सारेच जण आपापल्या कामात व्यस्त झाले आहेत. लहान मुले सुद्धा एकमेकास भेटत नाही. सर्व अभ्यासात मग्न झाले आहेत. डोरेमॉनच्या गॅझेट पेक्षा भयंकर गॅझेट मुलांच्या हातात पडले. तेंव्हा पासून मुले घराच्या बाहेर जाऊन मैदानावर खेळण्याचे विसरले आहेत. मुलांचे दूध सुटण्याअगोदर त्याच्या हातात मोबाईल दिले जाते. मोबाईल ते तेव्हापासूनच हाताळायला लागते. मोबाईलमध्ये असलेले व्हिडिओ, व्हिडिओ गेम हेच मुलांचे विश्व बनले आहे. आज मुलांचे बालपण मोबाईल मध्ये हरवले आहे. ना त्यांना घराबाहेर पडायला आवडत, ना मित्रासोबत खेळायला. आपल्याच विश्वात मग्न असल्याने बालमनावर विपरीत परिणाम होत आहे. मुलांमध्ये एकटेपणा वाढला आहे, डोळ्यावर दुष्परिणाम होत आहे . शारीरिक काम नसल्याने स्थूलपणा, लठ्ठपणा वाढत आहे. याला जबाबदार मुलापेक्षा त्यांचे पालक जास्त जबाबदार आहेत. मुलं थोडं रडू लागले की त्यांच्या हातात मोबाईल देतात. मुलं थोडं हट्ट केला तरी मोबाईल देतात. त्यामूळे या सवयीचे व्यसनात रूपांतर झाले आहे. मुलांना मोबाईल मधून बाहेर काढायचे असेल तर प्रथम पालकांना मुलासारखे लहान बनावे लागेल.त्यांच्या सोबत खेळ खेळावे लागतील. तरच मुले पुन्हा एकदा मोबाईल मधून बाहेर पडून खेळायला लागतील.

जितेंद्र रायपुरे , गडचिरोली
8806550920

# पाऊस येतो,वीज जाते ! असे का होते ?



महावितरण

'माहिती, शिक्षण व संवाद'

## इन्सुलेटर म्हणजे काय? पावसाळ्यात ते नादुरूस्त का होतात?



आधुनिक केसरी

विद्युत वाहिनीवर वीज तारा व वीज खांब यात विद्युत रोधक म्हणून चिनी मातीपासून बनविलेल्या साधनांचा वापर केला जातो. ३३ केव्ही/ ११ केव्ही या विद्युतवाहक उच्चदाब व विद्युत वितरण लघुदाब वाहिन्यात वापरल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या विद्युतरोधकांना प्रकारानुसार इंग्रजी भाषेत 'पिन इन्सुलेटर', 'डिस्क इन्सुलेटर', 'सॅकल इन्सुलेटर' असे संबोधले जाते. उन्हामुळे गरम झालेले हे चिनी मातीचे इन्सुलेटर पावसाच्या पाण्यामुळे तडकून फुटतात. ते फुटल्याने वीज पुरवठा बंद पडतो. (विद्युत रोधक फुटल्याने वीज तारा थेट विद्युत खांबाच्या संपर्कात आल्याने विद्युत खांबात वीज प्रवाहीत होऊन अर्थ फॉल्ट होतो. तत्काळ विद्युत यंत्रणेच्या उपकेंद्रातील रिलेकडून सेकंदाच्या आत ब्रेकर्स ट्रीप होऊन विद्युत वाहिनी बंद पडते.) जे विद्युत सुरक्षेच्या दृष्टीने योग्य व हिताचे असते. अन्यथा वीज खांबात विद्युत प्रवाहित होऊन जीवित हानीचा धोका संभवतो. पावसाळ्यात वीज खांबावर वीज कोसळल्याने तीव्र उच्च दाबामुळे इन्सुलेटर्स फुटतात. विद्युत यंत्रणेतील सुरक्षाकवच असणाऱ्या या इन्सुलेटर्सना तडे जातात, ते फुटतात म्हणून पावसाळ्यात वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढते. सुरुवातीला पावसात तर हे सर्रासपणे घडते. तेंव्हा नेमका बिघाड शोधण्यासाठी रात्री-अपरात्री वीज कर्मचाऱ्यांना गस्त घालावी लागते, तपासणी करावी लागते. ती विद्युत वाहिनी कधी रस्त्याकडेने, कधी शेतातून, झाडी-वनातून, तर कधी ओढ्यातून-डोंगरातून गेलेली असते.

- किशोर खोबरे, जनसंपर्क अधिकारी, महावितरण

## विश्वासाचं बियाण

ज्वारीचं गं बियाणं बाई
बियाणं विश्वासाचं पेरते
त्यावर पांघरूण मातीच बाई
पांघरून मायेचं गं घालते

उसाचं गं बेणं बाई
बेणं स्वप्नांचं मी दाबते
त्याला खाद्य खताचं गं बाई
खाद्य नव्या उमेदीचं टाकते

जळालेलं गं पीक बाई
पुन्हा नव्याने गं सांधते
नाही पिक बाई
मन माझ गं टोचते

उन्हा तान्हात गं बाई
रोज शेतातमी राबते
नाही शेतात गं बाई
आईच्या कुशीत मी नांदते

पूजा सांगळे



## ॥दिंडी ॥

आला आषाढाचा मास
चला दिंडी संगे जाऊ !
मनी विठोबाचा ध्यास
भक्त मेळा डोळा पाहू ।धृ।

होऊ भजनात दंग,
मार्ग क्रमु कोस कोस
टाळ चिपळ्या मृदंग
हर्षे करू नाम घोष ।१।


रिंगण भक्तीचे हो घालू
नाही पोटाची ही भ्रांत
मुखें हरी हरी बोलू
विठू करी क्षुधा शांत ।२।
भक्तांच्या हो महापूरी
वारी धावे निरंतरी
वारकरी करी वारी
हरी त्यांचे कष्ट हारी ।३।

रोज रोज पायपीट
तुडवत लांब वाट
कधी सरळ धोपट
कधी अवघड घाट ।४।

वैष्णवांची झाली दाटी,
मुंगी शिराया न वाव,
आस मनी त्याची भेटी,
सारं निभावतो देव ।५।
खेळ मांडू वाळवंटी
स्नान करू चंद्रभागा
भेटी घेऊ पुंडलिका
होई सारे पाप भंगा ।६।

नामयाची ही पायरी
चोखा बैसला शेजारी
आलो आहो महाद्वारी
माथा टेकू क्षणभरी ।७।

लागू दर्शनाच्या रांगी
नको घाई शिस्त पाळा
याची देही याची डोळा
पाहू कानडा सावळा ।८।
- नंदकुमार भणंग
छत्रपती संभाजीनगर



## माझी माय

तुला मोठं करतांना
मी मात्र लहान होते
क्षणभर का होईना
आईच्या गळयात पडून येते

माय माझी गेली दूर
नाही कुठेच दिसत
ओल्या मिटल्या डोळ्यांत
रूप मायेच सजतं

रूपवान माझी माय
अंग भरुन पदर
तिच्या पदराच्या उबेत
माझं विसावत जग

माझी माय शीलवान
जशी अंगणी तुळस
किती सोसला सासुरवास
केला संसारी कळस

माझ्या मायेच्या प्रेमाची
नाही कशालाच सर
तिचा हात पाठीवर
नाही उरत फिकीर

काम करता करता
आठवते मी आईला
सारं शिकवलं तिने
तिच्या लाडक्या जाईला

प्रा.डॉ.संगीता दोंदे
मिलिंद कला
महाविद्यालय,औरंगाबाद

## नेत्रदान

नेत्रदान हे असे दान जे
प्रत्येकाने करून जावे
जेणेकरून मेल्यावरही
या जगाला पाहता यावे

नेत्रदान हे असे दान जे
प्रत्येकाने करून जावे
मेल्यावरही नेत्ररूपाने
या जगात उरुन राहावें

नेत्रदान हे असे दान जे
प्रत्येकाने करून जावे
एकाच्यातरी अंधाराला
नेत्ररूपी दीपक द्यावे

नेत्रदान हे असे दान जे
प्रत्येकाने करून जावे
असो जीवन असेल जसे
मरण मात्र चिरंजीव व्हावे
नेत्रदान हे....

_सौ.शारदा श्रीकृष्ण
वानखेडे-चोपडे, परभणी
९८२३०६६६०६

## काय ठेवले आहे..?

शेवटी या जीवनात काय ठेवले आहे
मोह, माया सारे काही व्यर्थ आहे

माझे, माझे कशाला म्हणता
विनाकारण त्रास कशाला देता

निंदा, चुगली करता कशाला
उगाचच आमंत्रण देता पापाला

शेवटी इथे उरले तरी काय आहे
सारा मोह, मायेचा पसारा आहे

जगून घ्यावे जरा माणसासारखे
मन दुखावू नये हो कोणाचे

आज आहे उद्या नाही, कोणी पाहिले
नियतीचा खेळ कोणी जाणीले

दोन शब्द बोला आपुलकीने
एक दिवस आहे प्रत्येकाला जाणे

कशाला उगाचच भांडण करता
मारामारी करून जगाला दाखवता

जीवन मिळाले मोठ्या भाग्याने
जगा थोडे तरी जगा माणुसकीने

शेवटी या जीवनात काय ठेवले आहे
एक दिवस खाली हातानी जाणेच आहे

सोडून द्यावे व्यर्थ गोष्टींचा नाद
नका घालू हो कोणाशी वाद

सौ. संगीता संतोष ठलाल
मु. कुरखेडा, जि.गडचिरोली
७८२१८१६४८५

## एकांत

हजार काजव्यांनी
पाहिला एकांत माझा।
तिच्याच आठवणींनी,
उजळला एकांत माझा
नको जगा विचारू,
गुपित हासण्याचे।
कित्येक हुंदक्यांनी
कोंडला, एकांत माझा
दुरुन मजला एक, हाक
आली ओळखीची।
चुकून चांदण्यानी,
ऐकला एकांत माझा
वरवरच्या सुखाने, दिसें
जरी आनंद।
मनातल्या दुःखाने,
दाखविला एकांत
माझा
प्रेमात वेडा जरी, रोज
तिच्याच साठी।
पण तिच्याच विरहाने,
दाटला एकांत माझा
उजेडात चालताना जरी
साथ सूर्याची।
पण रातीच्या अंधारात,
कळला एकांत माझा
आपल्यांनीच दिल्या
जरी वेदना मनाला।
त्या वेदनांनी
जाणवला, एकांत
माझा
दाखविले कित्येकानी
जीवनात, विविध रंग।
पण मैत्रीच्या रंगाने,
संपवीला एकांत माझा
कवीराज मनिष आहिरे
सटाणा नाशिक
7588069679



## सुरू झाली शाळा

सुरू झाली शाळा
संपली उन्हाळी सुट्टी
पाटी, पुस्तक, वह्याशी
करूया आता गट्टी

नवीन मित्रासोबत
करूया दोस्ती
मैदाणी खेळ खेळतांना
करूया मस्ती

विद्येचे मंदिर
माझी शाळा
जीवनी फुलविते
ज्ञानाचा मळा

नवा वर्ग, नवे पुस्तके
सारे काही नवे नवे
तरी बाबा विचारतात
आणखी काय हवे ?

रोज शाळेला जाता
भविष्याला मिळेल आकार
शिस्त आणि अभ्यासाने
स्वप्न होईल साकार

-रवींद्र व्ही. चालीकवार
मु. पो. ता. महागाव
जि. यवतमाळ
मो.9011559106



## वादळ-वारा

हवा जेव्हा वाहू लागल्यास
तिचे बदल हे वाऱ्यात होते,
राना-रानातुन,पाना-
पानातून
रानवारा हळूहळू वाहते.

कळेना मध्येच या वाऱ्याला
कसला-कुणाचा राग येतो,
एखादयांच्या झोपडीवरचे
छप्परच दूरवर उडवून नेतो.

हा रानवारा समुद्रावर
उठवितो उंच-उंच लाटा,
समुद्रात गेलेल्या बोटांच्या
तो चुकवून टाकतो वाटा.

कधी रानवारा धारण करतो
भयानक वादळाचे रुप,
समुद्रांच्या किनारी गावांचे
तो नुकसान करतो खूप.

शेवटी रानवारा खिडकीतून
गार झुळूक होऊन येतो,
थकल्या-भागल्या
जीवांच्या
घराघरात गोड गारवा
देतो...!

- अय्युब पठाण
लोहगांवकर,
मो. ९७६४३५०३७४

## पुस्तक घडवेल मस्तक

पुस्तक असतोच मित्र खरा
माणुसकी अन ज्ञानाचा झरा
देतो स्वतः चे सर्व समर्पण
त्याचे चुकणाऱ्याला
मार्गदर्शन.

पुस्तक जमवतो दोस्त
शिकवतो मस्त मस्त
ज्याने केली सोबत त्याची
प्रगती झाली जीवनाची.

पुस्तक म्हणजे गुरुच
ज्याचे शिकवणे सुरूच
अंधारातून प्रकाशाकडे
मार्गक्रमण चोहीकडे.

पुस्तकाची धरावी संगत
वाढेल जगण्याची रंगत
संगीत,शास्त्र, धर्म,कर्म
सांगेल जीवनाचे वर्म.

पुस्तक दाखवतो प्रकाशवाटा
सारतो दूर अज्ञानअंधारलाटा
नका निवडू दुसरा हस्तक
पुस्तकच घडवेल मस्तक.

®रज्जाक शेख, श्रीरामपूर
9665778558

## शोध

निःशब्द स्तब्ध नेत्रांत ,
अश्रू सुखाचे येत नाही .
मन ही कठोर असे ,
अश्रू दुःखात ही ओझरत नाही .

शोध आयुष्याच्या ह्या ,
पानावरती सुरू निरंतर राही.
नेत्र थकले तरीही आता,
मन ही माघार घेत नाही .

कठोर त्या मनाला ,
क्षणिक आधार न मिळे कुठेही.
शोध हा अनंत असा,
एकटय़ाने सदैव सुरू राही .

आयुष्यातील सारथी जसे,
क्षण एक सोबती जगावे .
प्रत्यक्षात त्या स्वप्नंना,
ह्या नेत्रांनी सुखाःत पहावे .

धीर किती ह्या मनास द्यावे ,
अधीर मनास दिसता वाट नव्याने .
शोधअसा निरंतर ज्या यशाचा ,
सुरू सदैव राहील जिद्दीने .
- तुषार राजेश लाखे
-वरोरा, जिल्हा चंद्रपूर.
-8600548913.

## झळा उन्हाच्या अजून

इथं सरल्याच नाही
झळा उन्हाच्या अजून
गेल्या रोहिण्या कोरड्या
जाई मिरुग निघून

रानातील वृक्षवेली
अन गवत वाळले
उन्ह दुष्काळी सोसून
सारे शिवार शिणले

बळी माझा शेतकरी
आस लावूनी बसला
रोज वरती आभाळी
ढग शोधू तो लागला

इथं रोजच दुष्काळी
सालाआड साल कसे ?
बळी कंटाळला आता
नाही कसे कोणा दिसे ?

त्याचा सर्जा आणि राजा

अरे उपाशीच आज
येरे मेघा लवकरी
नाही दुसरा इलाज

ठेवी बळी रे भरोसा
सारा बघ तुझ्यावर
त्याची लेक उपवर
सावकार दारावर

त्याचं गळकचं घर
अन फाटका संसार
तरी पोशितो जगाला
देरे त्याला तू आधार

त्याच्या घामातून मोती
इथं पिकतील रोज
फक्त येरे तू पावसा
आर्त विनवणी तुज

ज्ञानेश्वर गायके कन्नड
मो.९४०३३८४८८९

## भावना

तुझ्या भावना माझ्या
मनाला येऊन का छळल्या
दुरावलेल्या भावना या नव्याने का
उजाळल्या

भावनेने भरुनी आणले हृदयाला
श्वासपण लागला आता थरकाप
करायला

तुझ्या भावना माझ्या मनाला येऊन
का छळल्या
भावनेन या कल्लोळ का माजवला

गच्च गेले भरुनी आभाळ त्यालाही
प्रश्न पडला
खंत का वाटली नाही त्याला पुन्हा
प्रहार करायला

सुरळीत झाल होत सर्व पुन्हा का
आला
ढवळाढवळ करायला

दुरावलेल्या भावना या
नव्याने का उजळावयाला

क्षीण झालेल्या आठवणी त्या
पुन्हा का लावतोय तू वेचायला

तोही बरा आहे तिही बरी आहे
विसवुनी गेलो दोघे तो भुतकाळ
आता

का चालुनी आला पुन्हा
दोघांच्या सुखी जिवनात राडा
घालायला

सावर तू स्वःताला या
मोहमायेपासून
या भावनेच्या भानगडीत घेऊ
नकोस मनाला फसवुन

सावरला गेला यातुन तू समज
मिळवला मोक्ष यातून तू
गेले ते गेले शोक त्याबद्दल पुन्हा
नको

नियतीने तुला नविन प्रेम जे दिले
त्यात नव्याने गुंतुनी जा पुन्हा

त्यागुनी टाक दुरावलेल्या भावना
मोह पुन्हा करु नकोस दुरावलेल्या
स्वप्नाचा

जे जगताय तुझ्यासाठी
खंबीर उभा रहा तू त्यांच्या पाठी

जसाही आहे तू तसा तू त्यांना हवा
आहे..
तुझ्या आपल्यांना तुझी गरज
आहे....

® लक्ष्मण वाल्डे-कन्नड

## तू...

झोपेमध्ये असशी तेव्हा
सुंदर किती दिसशी
स्वप्नामध्ये दंग होऊनी मंद, मंद तू
हसशी

कर्णफुलांनी कान हे
सजले, छान किती दिसती
गाली तुझिया बटा खेळती,
भुरळ मज घालती

चमकदार ही तुझी मोरणी,
मस्त किती दिसते
भाग्य तिचे ते थोर किती,
तव नाकावर वसते

गळयातील हे गंठण तुझिया
अंगावर रुळते

झोपेमध्ये असशी
तेव्हा अतीच चमचमते


हातातील हे सुवर्ण
कंकण शोभून तव दिसती
पायी पैंजण झोपेतही
किणकिण ते करिती

ओवाळुनी मी जीव
टाकितो तुझ्यावरी आता
अंत होईतो साथ देई मज,
समजून घे आता

© उद्धव भयवाळ
१९, शांतीनाथ हाऊसिंग सोसायटी
छत्रपती संभाजीनगर

## मायनगरी

अंगणात माझिया सावळी
सावळी विसावली सांज बाई,
मागलदारी गोठ्यात हंबरते
दिगुसाठी दिगूची कपिलामाई.
तुळशीच्या ओट्यावर मिणमिणते
मंद मंद सांजवात ती सुखदायी,
नभ लाटेवर स्वार नभीचा
चंद्रमा अंगणी डोकावून जाई.
बकुळीच्या झाडावरची स्मित
किलबिल मनाचा ठाव घेई.
मंद दरवळत पानाफुलात
थबथबली रातराणी अन् जाई जुई.
इवली इवली पाऊले प्रेमाचे
चांदणे अंगणभर शिंपीत येई,
दाढी मिशा गोल गप्पे नऊ
वारीतली
ऊब रोज नवे नाते नव्याने जन्म घेई.
मायेची मायानगरी सुखानंदी
विसावली पापणी तला अल्लड
मोती पापणी उगी ओलवली.
दूरची...दूर.. वाट क्षितिजा पल्याड
निशेत त्या विरूनिया जाई.
गिरिराजाची लाली दूर उडालेल्या
पाखराच्या पंखांना त्या बळ देई.
© सौ. वैशाली इंदुमती जाधव-
महाडिक.
सं. क्र. - ९७६७४३७९२३



# जिंतूरात अतिक्रमणावर फिरवला जेसीबी

## रस्ता रुंदीकरणासाठी कारवाई : शहरातील रस्त्याने घेतला मोकळा श्वास

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** शहरातील अण्णाभाऊ साठे चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत रस्त्याचा दोन्ही बाजूने मागील काही दिवसांपासून अनेक छोट्या मोठ्या व्यावसायिकांनी अनधिकृतपणे आपली दुकाने थाटली होती. त्यामुळे रहदरीस मोठा अडथळा निर्माण होऊन वाहतुकीची कोंडी नित्याचीच झाली होती.

याची दखल घेत दि.१६ शुक्रवारी रोजी सा.बां. विभागाने सकाळपासून पोलीस बंदोबस्तात अतिक्रमण हटविण्यास सुरुवात केली. त्यामुळे शहरातील रस्त्याने मोकळा श्वास घेतला असल्याचे पहावयास मिळत आहे. जिंतूर शहरात मुख्य रस्त्यावर वाहनाची मोठी वर्दळ असते परंतु मागील काही दिवसांपासून अण्णा भाऊ साठे चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच येलदरी रस्त्यावर दुतर्फा मोठ्या प्रमाणात छोट्या हॉटेल, पानटपरी, हातगाडे व मालवाहतूक वाहने आदी व्यवसाय करणाऱ्यांनी सा.बां. विभागाच्या रस्त्यावर अतिक्रमण केले होते. यामुळे रस्त्यावर अस्ताव्यस्त वाहने उभी करण्यात येत असल्यामुळे वाहतूक कोंडी नित्याचीच झाली होती शिवाय रस्त्याचे काम चालू असल्याने वाहतूक कोंडी होत होती. दरम्यान नागरिकांचा रोष वाढत चालल्याने सार्वजनीक बांधकाम विभागाने अतिक्रमण धारकांना नोटीस देऊन अतिक्रमण मोकळे करण्याचे आवाहन केले. परंतु अनेक अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण काढली नाही. यामुळे आज प्रत्यक्ष पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या साहाय्याने अतिक्रमण हटवण्यात आले यावेळी बांधकाम विभागाचे कर्मचारी उपस्थित होते तर बंदोबस्तासाठी पोलीस निरीक्षक कुंदनकुमार वाघमारे यांच्यासह पोलिसांचा मोठा फौजफाटा त्याचबरोबर दंगा नियंत्रक पथक देखील तैनात करण्यात आले होते.

तहसील व पंचायतीच्या आवारातील अतिक्रमण वाढले? अण्णा भाऊ साठे चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या रस्त्यावरील दुतर्फा अतिक्रमण हटवले असले तरीही तहसील व पंचायत समितीच्या आवारातील अतिक्रमणात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते त्या अतिक्रमणाकडे तहसीलदार व संबंधित विभागात लक्ष देईल का ?असा प्रश्नही जनतेतून विचारल्या जात आहे.



# कॉँक्रिटीकरण व गटार बांधकामाचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** चाळीसगाव रोड अंजनशा दाता सोसायटी, येथे ८० लक्ष रुपयाचे कॉँक्रीट रस्त्याचे उद्घाटन आमदार फारुक शाह यांच्या हस्ते करण्यात आले. या भागातील नागरिकांची अनेक वर्षापासून मागणी होती त्या अनुषंगाने आ. फारुक शहा यांनी त्या मागणीची तात्काळ दखल घेत नगरोत्थान मध्ये या भागातील रस्ते साठी ८० लक्ष रुपये मंजूर करून घेतले व आज आमदार साहेबांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले या परिसरात अनेक कॉलनी असून अंजनशा दाता सोसायटी चा रस्ता हा मुख्य रस्ता होता चाळीसगाव रोड पासून ते हुडको पर्यंत जोडणारा आहे. तसेच गजानन कॉलनी हुडको व अविष्कार कॉलनी तसेच अनेक कॉलनी जोडणारा हा प्रमुख रस्ता आहे. या भागातील नागरिकांनी अनेक आमदार निवडून दिले परंतु आज पर्यंत कोणीच या भागाचा विकास केलेला नव्हता परंतु आमदार फारुक शाह यांच्या धुळे शहराचा विकासाच्या ध्यास बघता या भागातील नागरिकांनी एका निवेदनाद्वारे आमदार फारुक शहा यांच्याकडे या भागातील समस्या मांडल्या होत्या त्याला तात्काळ प्रतिसाद देत आमदार फारुक शाह यांनी ८० लक्ष रुपयांचा रस्ता मंजूर करून घेतला.

धुळे शहरातील रस्त्यांच्या बाबतीत कोणत्याच आमदारांनी गंभीरपणे विचार केला नव्हता परंतु आमदार फारुक शाह यांनी धुळे शहरातील प्रमुख महामार्गाला लागून असलेल्या रस्ते तसेच शहरातील अंतर्गत रस्त्यांसाठी शेकडो कोटीच्या निधी आज शहरवासीयांना उपलब्ध करून दिलेला आहे. जातीपातीचे राजकारण न करता सर्वांना न्याय देण्याची भूमिका आमदार फारुक शाह यांची राहिलेली आहे, त्यामुळे शहरातील शहरातील सर्व भागातील रस्ते चकाचक होऊन गेलेले आहे धर्मांध शक्तींशी लढताना फक्त विकासाने उत्तर देण्याचे काम आमदार फारुक शाह करीत असून त्याचीच एक फलनिष्पत्ती म्हणजे आजच्या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ .भविष्यात अशा अनेक विकासाचे कामाचे ध्येय आमदार फारुक शहा यांच्या मनात आहे. या कार्यक्रमाला स्थानिक नागरिकांनी आमदार फारूक शाह यांचे आभार मानून सत्कार केला या वेळेस नगरसेवक आमिर पठाण,प्यारेलाल पिंजारी,शोएब मुल्ला,आसिफ पोपट शाह, हालीम शमसुद्दिन ,माजीद पठाण,जमील खाटीक,हाजी मसूद शेख,सलीम शेख, शब्बीर शेख,अजहर सय्यद,फरीद शेख,हसन पठाण, नजर पठाण,दबीर शेख,शौकत पठाण,जहांगीर शेख,अरमान पिंजारी, मुक्तार शाह,मामाजी खत्री, मुस्तकीन शेख,अमीन शेख,सलमान अन्सारी,शाहरुख शाह सुत्रसंचालन इकबाल तेली यांनी केले.



# शिवसेनेच्या कार्यकर्त्याचा आत्महत्येचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी विनय पांडे यांनी शनिवारी दुपारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे येथील निवासस्थान जवळ स्वतःच्या अंगावर रॉकेल ओतून आत्महत्येचा प्रयत्न केला. या घटनेनंतर तेथील पोलिसांनी त्यांना तात्काळ थांबवून त्याची समजूत काढली आहे. एका आंदोलनामध्ये सहभागी झाल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल होता. त्यामुळे त्यांना रिक्षा चालविण्यासाठी बॅच आणि परमिट मिळत नसल्याने त्यांनी हे कृत्य केल्याचे समोर आले आहे.

वागळे इस्टेट येथील इंदिरानगर भागात विनय पांडे हे राहतात. ते शिंदे गटाचे उत्तर भारतीय सेलचे प्रचारक आहेत. शनिवारी दुपारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नितीन कंपनी येथील शुभ दिप या निवासस्थान जवळ ते आले. त्यानंतर त्यांनी त्यांच्या अंगावर रॉकेल ओतून घेतले. दरम्यान प्रवेशद्वारावर असलेल्या पोलिसांनी तात्काळ त्यांना अडविले. त्यानंतर त्यांना वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात आणून त्यांची समजूत काढण्यात आली. विनय पांडे यांच्या विरोधात ठाणे नगर पोलीस ठाण्यात आंदोलन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे.

गेल्या काही दिवसांपासून ते रिक्षाच्या बॅच आणि परमिटसाठी अर्ज करत आहेत. पण त्यांचा अर्ज नामंजूर होत आहे. घरची परिस्थिती हालाखीची असल्याने पांडे यांनी स्वतःच्या अंगावर रॉकेल ओतून घेतल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी विनय पांडे यांची समजूत काढली असून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे.



# योग दिनानिमित्त भाजपातर्फे विशेष कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय योग दिनी राज्यातील सर्व ४८ लोकसभा व २८८ विधानसभा मतदारसंघांमध्ये भाजपातर्फे योग रील स्पर्धेसोबतच अन्य विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती भाजपा महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष आणि या कार्यक्रमाच्या प्रदेश संयोजक चित्रा वाघ यांनी शनिवारी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा वर्षा भोसले व प्रदेश सरचिटणीस रश्मी जाधव यावेळी उपस्थित होत्या. यंदा 'वसुधैव कुटुंबकम' या कल्पनेवर आधारीत आंतरराष्ट्रीय योग दिवस जगभर साजरा होणार आहे. २१ जून रोजी सकाळी ९.०९ मिनिटांनी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त होणा-या विविध कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहनही श्रीमती वाघ यांनी केले.

श्रीमती वाघ म्हणाल्या की, एखाद्या कुटुंब प्रमुखाप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी देशवासियांची काळजी घेत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली भारताचे नवनिर्माण होत आहे आणि देशाची प्रगती वेगाने होत आहे. तणावमुक्त जीवनासाठी आवश्यक योग साधनेचे महत्व पटवून देण्यासाठी हा दिवस जगभर साजरा केला जातो. मोदी सरकारच्या ९ व्या वर्षपूर्तीनिमित्त राबवल्या जाणा-या उपक्रमा अंतर्गत यंदा विविध कार्यक्रम सादर होणार आहेत. एक इन्स्टा रील ची स्पर्धा घेण्यात येणार असून, २१ जूनपर्यंत सर्वांनी @BJP4Maharashtra या इन्स्टाग्राम अकाउंटवर योगसाधना करतानाचे रील पोस्ट करावेत असे आवाहन श्रीमती वाघ यांनी केले.रील चे हॅशटॅग #Yogafor9@9 हे असेल व ज्या रील ला सर्वाधिक लाइक्स व जे रील सर्वाधिक रीट्वीट केले जातील अशा रील्स ना भाजपा लोकप्रतिनिधींमार्फत बक्षीस दिले जाणार आहे. या दिवशी ९ मिनिटांचा पॉवर योगासनांचा कार्यक्रमही सादर आहे. त्याचबरोबर गेट वे ऑफ इंडीया इथे ९.०९ मि. नी ९० महिला नऊवारी नेसून अभिनव पद्धतीने योग प्रात्यक्षिके सादर करणार आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

राज्यात १९ जूनला महाराष्ट्रातील महिलांसाठी सहकारी संस्थांचे एक दिवसीय प्रशिक्षण शिबीर घेण्यात येईल, अशी माहितीही श्रीमती वाघ यांनी दिली. आ. प्रवीण दरेकर यांच्या संकल्पनेतून होणा-या या शिबीरामध्ये भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि महिला व बालविकास मंत्री मंगलप्रभात लोढा उपस्थित राहणार आहेत.




# दरवाजा तोडून पोषण आहार लंपास

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील गोंदेगाव येथे शालेय पोषण आहाराची चोरट्यांनी रुमचा दरवाजा तोडून पोषण आहार लंपास केला होता. याप्रकरणी तशी तक्रार दाखल करण्यात आली होती. मोहीतनगर, गोंदेगाव, ता. सोयगाव येथिल तक्रारदार यांचे तक्रारी जबाबावरुन अज्ञात आरोपीविरुध्द जिल्हा परिषद केंद्रीय प्रशाला, गोंदगाव येथिल शालेय पोषण आहारातील ५० किलो तांदुळे, १ किलो जिरे, अडीच किलो हळद, साडेचार किलो कांदा, लसुन मसाला पुड्या, दीड किलो मोहरी, १६ लीटर गोडतेल व १० स्टीलचे जेवणासाठी वापरण्यात येणारे ताट असे एकुण १२५५०/- रुपये किंमतीचे शालेय पोषण आहार ठेवलेली रुमचा दरवाजा जोराने आत ढकलुन वरील ठेवलेले साहित्य चोरी करुन घेवुन चोरटा पसार झाला होता.याबाबत फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास सपोनि अनमोल केदार यांचेकडे असुन



त्यांनी सदर गुन्ह्यात गुप्तबातमीदार नेमण्यात आले. गुप्तबातमीदारामार्फत गुपनिय माहिती या आधारे सपोनि अनमोल केदार यांना माहिती मिळाली की, सदर शालेय पोषण आहाराचे साहित्य गोंदेगाव येथिल जितेंद्र लक्ष्मण जाधव, वय २१ वर्षे, रा. गणेश मेडीकलचे पाठीमागे, वडार गल्ली, गोंदेगाव याने चोरले बाबत माहिती मिळाली सदर माहिती तांत्रिक विश्लेषण करुन सदरचा गुन्हा हा जितेंद्र लक्ष्मण जाधव, वय २१ वर्षे, रा. गणेश मेडीकलचे पाठीमागे, वडार गल्ली, गोंदेगाव यास चौकशी कामी ताब्यात घेवुन त्यास सदर घटनेबाबत सखोल चौकशी केली असता सुरुवातीला त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली त्यानंतर त्यास अधिक विश्वासात घेतले असता त्याने सदरचा गुन्हा केला असल्याचे कबुल केल्याने त्यास सदर गुन्ह्यात पी. सी. आर. मध्ये घेवुन त्याचेकडुन शालेय पोषण आहाराचे साहित्य किंमत १२०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.सदरची कारवाई मनीष कलवानिया, पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण, सुनिल लांजेवार, अपर पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण व दिनेशकुमार कोल्हे, उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि अनमोल केदार, व पोउपनि एस. व्ही. गिते, पोहेकाँ राजू बर्डे, राजू बरडे, रविंद्र तायडे, श्रीकांत तळेगाव, विकास दुबिले यांनी कारवाई केली असुन गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि अनमोल केदार हे करत आहेत.

# गटशिक्षणाधिकारी कार्यालयात गोंधळ

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** गटशिक्षणाधिकारी कार्यालयात शाळेच्या पहिल्याच दिवशी गटशिक्षणाधिकारी व शिक्षक यांच्यात पुस्तक वाटप व शालेय व्यवस्थापन समितीच्या कारणावरून गोंधळ निर्माण झाला होता यावेळी शिक्षकांनी गटशिक्षणाधिकारी यांनी पैशाची मागणी व अरेरावी केली असल्याचा आरोप करण्यात आला यावेळी काही शिक्षकांनी गटसाधन केंद्र गाठून गटशिक्षणाधिकारी यांनी माफी मागावी, अशी मागणी करत होते परंतु गटशिक्षणाधिकाऱ्यांनी काहीच वाईट बोललो नसल्यामुळे माफीचा प्रश्नच येत नसल्याचे स्पष्ट केले. शहरातील गटसाधन केंद्रात आज दिनांक 15 जून रोजी दुपारच्या सुमारास शाळेच्या पहिल्याच दिवशी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात शिक्षकांचा गोंधळ पाहण्यास मिळाला मागील काही दिवसांपासून गटशिक्षणाधिकारी गणेश गाजरे चर्चेत आले आहेत गटशिक्षणाधिकारी नेहमी शिक्षक व मुख्याध्याक यांच्या सोबत अरेरावी भाषा वापरून अपमानास्पद वागणूक देत असल्याचे सांगण्यात येत आहे असाच प्रकार आज गटशिक्षणाधिकारी कार्यालयात झाला यावेळी म्हाळसा सावंगी येथील शिक्षक चव्हाण हे गटशिक्षणाधिकारी गाजरे यांच्याकडे शालेय व्यवस्थापन समितीच्या स्थापनेसाठी मार्गदर्शन मागण्याचे पत्र घेऊन कार्यालयात आले असता गटशिक्षणाधिकारी गाजरे यांनी तुच्छ वागणुक देत जोराने ओरडत कार्यालयातुन बाहेर व्हा म्हणून अपमानीत केल्याचे आरोप केला दरम्यान गटसाधन केंद्रात गोंधळ निर्माण झाल्यामुळे शिक्षक गट साधन केंद्रात जमा होऊन गटशिक्षणाधिकारी यांनी माफी मागावी म्हणून मागणी जोर लावून धरली होती यामुळे गटशिक्षणाधिकारी कार्यालयात गोंधळामुळे बघ्यांची मोठी गर्दी झाली होती .

संबंधित शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक वेळेवर काम करत नाही मी काही चुकीचे बोलो नाही त्यामुळे मी माफी मागायचा विषयच येत नाही . **गणेश गाजरे, गटशिक्षणाधिकारी, जिंतूर**




# 'शासन आपल्या दारी'चा हजारो नागरिकांना लाभ

आधुनिक केसरी न्यूज

**बी. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** विविध शासकीय विभागाच्या योजना लोकाभिमुख प्रशासनाच्या माध्यमातून लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यात येत असून, आतापर्यंत जिंतूर तालुक्यात १३ हजार ९९३ नागरिकांनी शासन आपल्या दारी उपक्रमातून लाभ घेतला आहे. आज माऊली मंगल कार्यालय, जिंतूर येथे तालुकास्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती गंगाधर बोर्डीकर, उपविभागीय अधिकारी जिवाजी डापकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) डॉ. संदीप घोन्सीकर, तहसीलदार रणजित कोळेकर, नायब तहसीलदार डॉ. परेश चौधरी, तालुका कृषि अधिकारी श्री. कच्छवे, गटविकास अधिकारी सुनिता वानखेडे, तालुका आरोग्य अधिकारी श्री. बोराळकर, जिंतूर ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक डॉ. चांडगे, कार्यालय अधीक्षक नगरपालिका रामराव चव्हाण, एकात्मिक बाल विकास विभागाच्या श्रीमती कोकणे, गटशिक्षणाधिकारी गणेश गांजरे आदी यावेळी उपस्थित होते. सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी सतत चकरा माराव्या लागू नयेत. त्यांना शासकीय योजना सहज आणि एकाच छताखाली उपलब्ध व्हाव्यात यासाठी तहसील प्रशासनाने शासन आपल्या दारी या उपक्रमाचे आज शुक्रवारी जिंतूर येथे आयोजन केले होते. शासकीय योजना लोकाभिमुख करून त्याची अंमलबजावणी गतिमान करण्यासाठी राज्य शासनामार्फत 'शासन आपल्या दारी' हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियाना अंतर्गत जिंतूर तालुक्यात शासकीय योजनांशी निगडीत आतापर्यंत जवळपास १४ हजार लाभार्थ्यांनी लाभ घेतला.

यामध्ये रहिवाशी प्रमाणपत्र १ हजार ४८०, उत्पन्न प्रमाणपत्र ६ हजार ८२७, वय आणि अधिवास प्रमाणपत्र ३९६, अल्पभूधारक १५, ऐपत दाखला २३, शेतकरी दाखला १२, आर्थिक दुर्बल (राज्य व केंद्र) ४४२ आणि १४६, नॉन क्रिमिलेअर ४१३, महिला आरक्षण १५, मतदार ओळखपत्र ३ हजार ६४४, शबरी आवास योजना १२४९, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना २५२, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना १७८, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान ८१, प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना १ हजार ४०३, राष्ट्रीय कृषि विकास योजना १५७, राष्ट्रीय कृषि विकास योजना कांदाचाळ २४, राज्य कृषि यांत्रिकीकरण योजना २०४, उप अभियान कृषि यांत्रिकीकरण योजना १६१, जननी सुरक्षा योजना ६४२, प्रधानमंत्री मातृ वंदन योजना १ हजार ३२३, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना ४ हजार ६७३, निरीक्षण पोषण आहार २८५, आयुष्यमान भारत हेल्थ कार्ड ३ हजार ३९, मानव विकास अंतर्गत बुडीत मजुरी ६३५, दीड ते तीन वर्षे वयोगटातील बालके ३९०, गरोदर व स्तनदा माता यांना पुरक पोषण आहार पुरविणे २ हजार ७४, अडीच वर्षे ते तीन वर्ष वयोगटातील १ हजार २६६ बालकांना गरम व ताजा आहार पुरविणे, दुधाळ जनावरे लाभार्थी संख्या १८, कुक्कुट पक्षी विकास योजनेंतर्गत १०० एकदिवसीय कुक्कुटपक्षी वाटप योजनेत चार लाभार्थी, निर्धूर चुली २ हजार ७००, कुक्कुटपालन, डाळ उद्योग आणि डेअरी संकलन केंद्र, आयसीआयसीआय बँकेतर्फे महिला बचत गटांना ६ कोटी ५६ लाख ७५ हजार रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले.

दीनदयाल अंत्योदय योजनेंतर्गत ३७ लाभार्थी, प्रधानमंत्री स्वनिधी योजना ४१, रमाई आवास योजना ४६, नामांतर ५२, प्रधानमंत्री जनआरोग्या ८७८ गुंठेवारी १०६, जन्ममृत्यू प्रमाणपत्र ३३२, पीटीआर नक्कल २७५, महसूल विभागामार्फत संजय गांधी निराधार योजना ६३९, रेशन कार्ड २८७०, रहिवाशी प्रमाणपत्र १ हजार ४८०, उत्पन्न प्रमाणपत्र ६ हजार ८२७ अशा एकूण १३ हजार ९९३ लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे.

# पोलीसांसमोरच पत्रकाराला मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** पोलीस दूरक्षेत्रात पोलीस कर्मचाऱ्यासामोरच पत्रकाराला मारहाण केल्याप्रकरणी एका व्यक्ती विरोधात पत्रकार सुरक्षा कायदा २०१९ चे कलम ३ व ४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हा प्रकार गुरुवारी (दि.१५) रात्री नउ वाजण्याच्या सुमारास बोधेगाव ता.शेवगाव येथील पोलीस दूरक्षेत्रात घडला. पत्रकार सुरक्षा कायदा अन्वये तालुक्यात प्रथमच असा गुन्हा दाखल झाला आहे.दीपक भीमराव तागडे रा.बोधेगाव यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे .याबाबत पत्रकार बाळासाहेब अंबादास खेडकर यांनी फिर्याद दिली आहे. खेडकर हे रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास बोधेगाव पोलीस दूरक्षेत्रा समोरून जात असताना दूरक्षेत्राच्या आवारात लोकांची गर्दी दिसली म्हणून ही गर्दी कशाची आहे हे पाहण्यासाठी तेथे गेले होते,त्यावेळी त्याठीकाणी एका खाजगी व्यक्तीचा वाढदिवस साजरा करण्याचा कार्यक्रम सुरु होता.तेथे पो.ना.संतोष धोत्रे हे ही उपस्थित होते. पत्रकार खेडकर यांना तेथे पाहताच दीपक भीमराव तागडे याने तू पत्रकार येथे कशाला आलास तू बाहेर हो असे म्हणत त्यांची गचांडी धरून तोंडात मारल्या व परत जर येथे थांबलास तर तुझे हातपाय तोडून जीवे मारून टाकू अशी धमकी दिली. पोलीस कर्मचारी संतोष धोत्रे यांच्यासमोर व पोलीस दूरक्षेत्रात हा गंभीर प्रकार घडला. तालुक्यातील पत्रकारांनी याबाबत पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांची भेट घेऊन गुन्हा दाखल करण्यास भाग पाडले.

# ई - केवायसी करून घेण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**बाबरा :** फुलंब्री तालुक्यातील बाबरा परिसरातील सर्व




गावांमधील पंतप्रधान किसान सन्मान योजनेतील ज्या लाभार्थ्यांची ई केवायसी आणि आधार सिडीग बाकी आहे. त्यांनी लवकरात लवकर ते करून घेण्याची आव्हान कृषी विभागातर्फे करण्यात आले आहे. पीएम किसान सन्मान निधीचे हप्ते अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाले आहेत पण ज्या लाभार्थ्यांनी इ केवायसी आणि आधार शेडिंग केले नाही त्यांना पीएम किसान योजनेची पुढील हप्ते मिळणार नसण्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आलें त्यामुळे ग्रामपंचायत सोसायटी पदाधिकारी तसेच ग्राहक सेवा केंद्र चालक कृषी मित्रांनी गावातील ज्यांचे ई-केवायसी बाकी आहे त्यांचे ही केवायसी करून घेण्याचे कृषी सहायक प्रितेश आजमेरा यांनी सांगितले आहे.



# CSMSS दंत महाविद्यालयास विद्यापीठाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित दंत महाविद्यालयाला महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त महसूल विभागानूसार 'मराठवाडा सर्वोत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कार विद्यापीठ वर्धापनदिनी दि. १० जुन रोजी नाशिक येथे केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अरुणा वनीकर ( अध्यक्षा, पदवीपूर्व वैद्यकीय शिक्षण मंडळ, राष्ट्रीय विज्ञान आयोग, नवी दिल्ली ), डॉ. अश्विनी जोशी ( विशेष आमंत्रित सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग ), महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू ले. जन. ( नि. ) डॉ. माधुरी कानिटकर, प्रा. डॉ. दिलीप म्हैसेकर ( संचालक ,वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय ), म.आ. वि. वि. माजी कुलगुरू डॉ. मृदुला फडके, डॉ. नीलिमा क्षीरसागर, डॉ. अरुण जामकर, प्रति कुलगुरू डॉ. मिलिंद निकुंभ, कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू आदी मान्यवर उपस्थित होते.या सर्वोत्कृष्ट पुरस्कारासाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून निरनिराळे निकष लावण्यात आले होते. त्यात 'नॅक' मूल्यांकनावर आधारित पदवी, पदव्युत्तर विद्यार्थी प्रवेश क्षमता, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांचा वार्षिक निकाल, विद्यार्थी कल्याण विभागामार्फत घेण्यात आलेले विविध उपक्रम, विद्यार्थ्यांसाठी लागणाऱ्या पायाभूत व शैक्षणिक सुविधा, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, अभ्यासोत्तर उपक्रम, शिक्षक यांची उत्कृष्ट कामगिरी, संशोधन, भारत सरकारकडून मिळालेले वेगवेगळे पेटंट, आय. एस. ओ. मानांकन, केंद्रीय 'Eat Right Campus' प्रमाणपत्र या सर्व बाबी आणि निकषांचा विचार होऊन 'मराठवाडा सर्वोत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कार प्रदान करण्यात आला. दंत महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या विश्वासार्ह सार्थ सेवेला मिळालेली ही पोचपावती असून भविष्यात अधिकाधिक चांगल्या सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. रणजीत मुळे यांनी दिली. शैक्षणिक गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य देऊन आर्थिक सुदृढता आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सुविधा अधिक दर्जेदार करून विश्वासार्ह ओळख निर्माण केली असून 'मराठवाडा सर्वोत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कारामुळे आपल्या सर्वांची जबाबदारी अधिक वाढली असून सांघिक प्रयत्नातून ती निश्चितच पूर्ण करू. असा विश्वास संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख यांनी दिली. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या शैक्षणिक स्तरावर महाविद्यालयाची डॉ. यशश्री देशमुख यांनी दोन वेळेस सुवर्णपदक पटकावले. अस्मिता शिंदे, वर्षाराणी नागरगोजे, गीतांजली भोसले, मोसमी सय्यदा या विद्यार्थिनी विद्यापीठाच्या शैक्षणिक क्रमवारीत उच्च स्थान पटकावले आहे. तसेच महाविद्यालयाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. ज्योती मगरे यांना त्यांनी केलेल्या संशोधनासाठी भारत सरकारकडून २०१९ ला पेटंट प्रदान केले आहे. दंत महाविद्यालय सन १९९१ यावर्षी सिडको येथे ५० विदयार्थी क्षमतेने सुरु होऊन २००१ ते २००२ मध्ये दंत महाविद्यालय, कांचनवाडी येथे भव्य परिसरामध्ये स्थलांतरित झाले. २००३ मध्ये विदयार्थी क्षमता ५० वरून १०० ची मान्यता शासनांकडून मिळाली आहे. २००७ मध्ये तीन विषयात पदव्यूत्तर अभ्यासक्रम सुरु झाले. २०१२ मध्ये त्यात आणखी ०३ विषयाची भर पडली, सध्या सहा विषयात पदव्यूत्तर अभ्यासक्रम सुरु आहे. २०१८-१९ ला पी. एचडी अभ्यासक्रम होऊन सहा विषयात सुरु करण्यात आले. महाविद्यालयास शैक्षणिक ऊर्जा व पर्यावरनाचे आय. एस. ओ. मानांकन प्राप्त झालेले असून फेब्रुवारी २०२३ मध्ये दंत महाविद्यालयास शैक्षणिक स्तरावर 'नॅक' अधिस्वीकृती बी प्लस (B+) (CGPA 2.55 ) मूल्यांकन मिळाले आहे. दंत रुग्णालयात येणाऱ्या रूग्णांना कमी दरात तत्पर सेवा दिली जाते. मराठवाड्यातील रुग्ण मोठया प्रमाणात या सेवेचा लाभ घेतात. या पुरस्कारासाठी संस्थेचे अध्यक्ष रणजित मुळे, सचिव पद्माकर मुळे, विश्वस्त समीर मुळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख यांचा बळकट पाठिंबा मिळाला. महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. लता काळे, उप-अधिष्ठाता डॉ. विश्वास कदम, डॉ. ज्योती खेडगीकर, डॉ. संजय सरोदे, डॉ. अमृता बनसोडे, डॉ. श्रद्धा भंडारी व सर्व विभागप्रमुख शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.



**अथक प्रयत्न आणि परिश्रमाचे हे यश :** CSMSS दंत महाविद्यालयास 'मराठवाडा सर्वोत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कारामुळे महाविद्यालयाकडून दिल्या जात असलेल्या गुणवत्तापूर्ण व विश्वासार्ह शैक्षणिक दर्जावर शिक्कामोर्तब झाले आहे, या पुढील काळात रुग्ण आणि विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या सुविधा देण्याचा आमचा प्रयत्न राहील . CSMSS दंत महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या आमच्या सहकाऱ्यांनी केलेल्या अथक प्रयत्न आणि परिश्रमाचे हे यश असल्याचे त्यांनी सांगितले .

**पद्माकरराव मुळे, सचिव, छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था**






# बाजार सावंगी येथे प्रवेशोत्सव साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** ( ता: खुलताबाद ) येथे शाळा प्रवेशोत्सव निमित्ताने शाळा भेट नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात मोठ्या आनंदात उत्साहात व्हावी प्रवेश पात्र मुलांना शाळेत प्रवेश देणे त्यांना शाळेत टिकवून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी तसेच शैक्षणिक उपक्रमांची अंमलबजावणी शालेय स्तरावर व्हावी कारण शाळा आहे बालकांचे भाव विश्व घडविते सामाजिक विकासात आणि राष्ट्राच्या जडणघडणीत शाळेचे अद्वितीय स्थान असल्याने मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान अभियान निपुणची अंमलबजावणी म्हणून संपूर्ण राज्यात बालकांच्या शिक्षणावर काम करणाऱ्या सर्व सहभागधारकांनी एकत्रित येऊन राष्ट्रीय अभियान राबवणे या उद्देशाने येथील जिल्हा परिषद हायस्कूल मध्ये यावर्षीचे नवप्रवेशित विद्यार्थी शाळेतील शिक्षक पालक ग्रामस्थ यांचा शैक्षणिक वर्षाचा पहिला दिवस गुरुवार रोजी साजरा झाला. उत्साह वाढवण्यासाठी प्रवेशोत्सव प्रभात फेरी पाचवी ते आठवीतील विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकांचा संच वाटप वैज्ञानिक रोबोटिक लॅबचे उद्घाटन व वन्यजीव मंडळ देखावा पाहणे आधी उपक्रम उत्साहात पार पडले. यावेळी जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागाचे सहाय्यक जिल्हा संधारण अधिकारी एन जी जाधव तालुका शिक्षण विस्तार अधिकारी शिवाजी भोसले मुख्याध्यापक हरिभाऊ दहिफळे, सरपंच आप्पाराव नलावडे, माजी उपसभापती प्रभाकर शिंदे, जिल्हा भाजप सरचिटणीस ज्ञानेश्वर नलावडे, केंद्रप्रमुख अशोक महालकर, वसंतराव नलावडे, प्रकाश नलावडे ज्योती जाधव शालेय अध्यक्ष आनंदा काटकर विज्ञान शिक्षक खंडागळे रोहिणी निफाडे कैलास काथार सह सर्व शिक्षक पालक विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांची सकाळी आठ वाजता संपूर्ण गावातून स्कूल चले हम अशी प्रभात फेरी काढली शालेय प्रांगणा त विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार होऊन स्वागत झाले. याप्रसंगी अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त करीत शिक्षण क्षेत्रातील गुणात्मक वाटचालीस विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन श्री परदेशी यांनी करून आभार विजय जयस्वाल यांनी मानले.

# दुचाकी घसरली; बहीण ठार, भाऊ गंभीर

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** खुलताबाद रोडवरील वानेगाव फाट्यावर मोटरसायकल घसरून न्यू बालाजी नगर, गारखेडा परिसर छत्रपती संभाजीनगर येथील बहीण जागीच ठार तर तर भाऊ गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात शुक्रवारी घडला. अंजली राजू सोनवणे ( वय १८ ) असे ठार झालेल्या मुलीचे नाव असून रोहन सोनवणे असे गंभीर जखमी झालेल्या भावाचे नाव आहे. अंजली व रोहन सोनवणे हे भाऊ बहीण शालेय प्रमाणपत्र घेऊन घरी छत्रपती संभाजीनगरकडे दुचाकीने परत जात होते. दरम्यान त्याची मोटारसायकल वानेगाव फाट्याजवळ अचानक घसरली. यात अंजली व रोहन यांना जबर मार लागला. फुलंब्री येथील महात्मा फुले रुग्णवाहीका चालक विजय देवमाळी यांनी दोघांना फुलंब्री ग्रामीण रुग्णालयात त्वरित दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून अंजलीला मृत घोषित केले, तर जखमी रोहनवर प्राथमिक उपचार केले. फुलंब्री येथील महात्मा फुले रुग्णवाहिकेदार चालक विजय देवमाळी यांनी दोघांना फुलंब्री ग्रामीण रुग्णालयात त्वरित दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून अंजलीला मृत घोषित केले. तर जखमी रोहनवर प्राथमिक उपचार करून त्याची मोटारसायकल वानेगाव फाट्याजवळ अचानक घसरली. यात अंजली व रोहन यांना जबर मार लागला. फुलंब्री येथील महात्मा फुले रुग्णवाहिकेदार चालक विजय देवमाळी यांनी दोघांना फुलंब्री ग्रामीण रुग्णालयात त्वरित दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून अंजलीला मृत घोषित केले, तर जखमी रोहनवर प्राथमिक उपचार करूनपुढील उपचारासाठी छत्रपति संभाजीनगर येथी रुग्णालयात दाखल केले आहे. पोलिस हेडकॉन्स्टेबल संतोष डोंगरे यांनी पंचनामा केला. या अपघाताची फुलंब्री पोलिस ठाण्यात नोंद केली आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी) • त्वचा व गुप्त रोग • वजन वाढविणे
• आम वात उदर रोग • स्त्रीयांचे आजार • वजन कमी करणे
• दमा व ॲलर्जी (जुनाट) • स्थूलपणा, मूळव्याध • केसांच्या सर्व तक्रारी
• चिकन गुनिया • वंध्यत्व, संतती प्राप्ती • लहान मुलांची
• मनोकयीईक आजार • कॅन्सर सल्ला, मुतखडा • स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या
स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
✲ मासिक पाळी अनियमित असणे
✲ हॉर्मोन्स चे असंतुलन
✲ मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
✲ PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
✲ मासिक पाळी बंद होणे
✲ वारंवार गर्भपात होणे
✲ श्वेत प्रदर (पांढरे जाणे)
पुरूषांना होणाऱ्या समस्या
✲ शुक्राणु कमी असणे
✲ शुक्राणुची गती कमी असणे
✲ शुक्राणु स्खलन
✲ स्वप्न दोष
✲ सेक्स इच्छा कमी होणे इ.
फीस - 300 रू.
संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्सल्टींग उपलब्ध
पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.

# भाजप कार्यकर्त्यांनी एकत्र डब्बा खाल्ला, त्याच्या उलट्या अतुल लोंढेंना का झाल्या ?

## भाजप प्रवक्ता राम कुलकर्णींचा सवाल

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** भाजपाच्या संघटनात्मक कार्याचा भाग म्हणुन देशभरात सद्या कार्यकर्त्यांच्या सोबत एकत्र येवुन टिफीन पार्टी उपक्रम सुरू असताना काँग्रेस प्रवक्ता अतुल लोंढेंनी त्यावर घेतलेला आक्षेप हास्यास्पद म्हणावा लागेल. त्यांच्या आक्षेपाला भाजपाचे राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी धडाकेबाज उत्तर दिलं असुन आम्ही एकत्र येवुन डब्बा पार्टी केली, त्यातुन कार्यकर्ता संवाद केला तर मग अतुल लोंढेंना उलट्या होण्याचं कारण काय ?ज्यांचं आयुष्य सत्तेचा लाभ घेताना केवळ अर्थार्जनासाठी गेलं. ज्यांनी कधी कार्यकर्ता जोडण्याचं कामही केलं नाही त्यांच्या तोंडून आरोपाच्या लोंढ्याशिवाय काय बाहेर पडणार ? असा सवालही कुलकर्णी यांनी केला.



निवडणुका आल्या की भाजपा इवेंटबाजी करतो त्यापैकीच टिफीन पार्टी म्हणजे नाटक असल्याचा आरोप काँग्रेस प्रवक्ता अतुल लोंढेंनी केला होता. त्याला उत्तर देण्यासाठी भाजपाचे प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी काढलेल्या पत्रकात लोंढेंचा खरपुस समाचार घेतला. भाजपा हा पक्ष मुळात सर्वसामान्य जनता आणि कार्यकर्त्यांचा असुन सतत जनसंपर्क ठेवणे, संवाद करणे, लोकांच्या मध्ये जावुन मिसळणे ही आमची संस्कृती आहे. देशभरात टिफीन उपक्रमाला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असुन त्यातुन कार्यकर्ते जोडण्याचं देखील काम होताना दिसतंय. वास्तविक पहाता एकत्र स्नेहभोजन ही परंपरा पुरातन काळापासून सुरू आहे. कारण कुठल्याही निवडणुका नसताना आमचे उपक्रम जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी किंवा तळागाळातल्या माणसापर्यंत जाण्यासाठी सुरु असतात. अतुल लोंढे यांनी आयुष्यात कदाचित असे उपक्रम कधी पाहिले नाहीत. त्यांना टिफीन खाण्याऐवजी सत्तेचा लाभ अर्थार्जन एवढेच नव्हे तर पैसे खाण्याचं अंगवळण पडलेले असेल. खरं तर एखाद्या राजकिय पक्षाच्या संघटनात्मक उपक्रमावर दुसऱ्या पक्षाच्या प्रवक्त्यांनी बोलणं आणि नको ते आरोपाचे लोंढे तोंडुन बाहेर पडणं याला खरं तर बालिश राजकारणी म्हणावे लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नऊ वर्षाची कारकीर्द खऱ्या अर्थाने या देशात अमृत काल असुन शेवटच्या माणसासाठी विकासाचे दरवाजे उघडलेले दिसतात. सबका साथ -सबका विकास ही दुरदृष्टी आजवरच्या इतिहासात काँग्रेसवाल्यांच्या नजरेत कधीच आलेली नव्हती. म्हणून नविन उपक्रम किंवा एखादी सरकारची चांगली योजना लोंढेसारख्या व्यक्तीला कशी चांगली वाटणार ? हा सवाल कुलकर्णी यांनी केला. आम्ही सत्ता केवळ जनतेच्या कल्याणासाठी वापरतो आणि तुम्ही सत्तेचा वापर स्वकल्याणासाठी केलेला इतिहास याच देशातील सामान्य माणुस कधीच विसरू शकत नाही. लोंढेंना आमचा एक सवाल तो म्हणजे आमच्या पक्षाचा उपक्रम, कार्यकर्ते आमचे, बिचाऱ्या कार्यकर्त्यांनी आपआपल्या घरातुन डब्बे आणले, आमच्या पक्षाचे नेते, मंत्री, पदाधिकारी एकत्र बसुन खाऊ लागले तर तुम्हाला उलट्या का होवु लागल्या ? असा सवाल राम कुलकर्णी यांनी लोंढे यांना विचारला.

# पंढरपूरसाठी अमरावतीहून विशेष रेल्वे

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती:** आषाढी एकादशीचे औचित्य साधून देशभरातील हजारो विठ्ठल भाविक पंढपुरात लाडक्या विठुरायाच्या दर्शनासाठी दाखल होतात. पश्चिम विदर्भातील वारकऱ्यांसाठी दोन विशेष गाड्या आणि त्यांच्या प्रत्येकी दोन फेऱ्या अशा आठ गाड्या वारी विशेष म्हणून चालवण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. या गाड्या नवी अमरावती आणि खामगाव येथून पंढरपूर आणि पुन्हा परतीचा प्रवास करतील. पण, या गाड्यांच्या फेऱ्या कमी करण्यात आल्याने भाविकांमध्ये नाराजीचा सूर आहे. अमरावती, अकोला बुलढाणा जिल्ह्यातून या गाड्या भाविकांना घेऊन पंढरपुरात दाखल होणार आहेत. गाडी क्रमांक ०१११९ अमरावती-पंढरपूर ही विशेष गाडी २५ व २८ जूनला नवी अमरावती रेल्वे स्थानकावरून दुपारी २.४० वाजता सुटेल. दुसऱ्या दिवशी २६ आणि २९ जुलैला सकाळी ९.१० वाजता पंढरपूरला पोहोचेल. परतीच्या प्रवासात ०११२० पंढरपूर-अमरावती विशेष गाडी २७ व ३० जूनला सायंकाळी ७.३० वाजता पंढरपुरहून निघून दुसऱ्या दिवशी २८ जून आणि १ जुलैला दुपारी १२.४० वाजता नवी अमरावतीला पोहोचेल. तसेच गाडी क्रमांक ०११२१/०११२२ खामगाव-पंढरपूर-खामगाव चार फेऱ्या करेल.

नवी अमरावतीहून सुटणाऱ्या रेल्वेगाडीला बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, जलंब, नांदुरा, मलकापूर, बोदवड, भुसावळ, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, नांदगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहमदनगर, दौंड, कुर्डुवाडी आणि पंढरपूर हे थांबे आहेत. एक द्वितीय वातानुकूलित, दोन तृतीय वातानुकूलित, १० शयनयान, ७ सामान्य द्वितीय श्रेणी यासह २ लगेज कम गार्डच्या ब्रेक व्हॅन, अशी गाडीची संरचना आहे.

# तहसील अधिकाऱ्यांनी केला खोटा अहवाल सादर

## फुलंब्री तहसील कार्यालयातील जात वैधता प्रमाणपत्राच प्रकरण

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील ग्रामपंचायत सदस्यांनी तहसील कार्यालयात जात वैधता प्रमाणपत्र तहसील कार्यालयात जमा करण्यात आले. परंतु कर्मचारी व अधिकारांच्या काम कुचराई मुळे लोकप्रतिनिधी ग्रामपंचायतीच्या सदस्यांना अपात्रेची वेळ आली आहे. म्हणून या करिता औरंगाबाद विभागिय आयुक्त व औरंगाबाद जिल्हाधिकार्यांना फुलंब्री तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करण्याची मागणी शिवसेना तालुकाप्रमुख दलित आघाडी तथा ग्रामपंचायत सदस्य संजय इंगळे यांनी दि.12 जुन रोजी केली आहे. तर या दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या फुलंब्री तालुक्यातील ग्रामपंचायत सदस्यांनी जात वैधता प्रमाणपत्र वेळेवर सादर केले परंतु फुलंब्री च्या तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी खोटा अहवाल सादर केला असून या चुकीच्या धोरणामुळे ग्रामपंचायत सदस्यांना अपात्र होण्याची वेळ आली आहे. फुलंब्री पंचायत समितीचे गटविकास अधिकाऱ्यांनी खोटा अहवाल सादर केला. तसेच आपल्या कार्यालयात किती जात प्रमाणपत्र अहवाल सादर केले याची माहिती नाही याची चौकशी करावी. महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग मुंबई यांचे प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम बाबत पत्र 11 डिसेंबर 2020 कडुन एप्रिल 2020 ते डिसेंबर 2020 या कालावधीत औरंगाबाद जिल्ह्यातील फुलंब्री येथे ग्रामपंचायत निवडणूक कार्यक्रम संदर्भ क्रमांक 3 अन्वये घोषित करण्यात आलेला होता. निवडणूक कार्यक्रम नुसार दिनांक 15 जानेवारी 2021 रोजी मतदान झालेले आहे. निवडुन आलेले सदस्यांची झालेल्या अपात्र तेच्या कार्यवाहीच्या आदेशानुसार ज्या सदस्यांनी दिलेल्या वेळेच्या आत तहसील कार्यालयात दाखल केलेल्या जात प्रमाणपत्र दिलेले आहे.तरीही संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे ग्रामपंचायतीच्या सदस्य अपात्र झाले , तरीही या संबंधीत अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शिवसेना तालुकाप्रमुख दलित आघाडी चे संजय इंगळे यांनी केले आहे.



# ३६ वर्षांनी शाळकरी वारकरी आले एकत्र

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** पैठणच्या संत एकनाथ महाराजांच्या पालखीने पांडुरंगाच्या भेटीसाठी पंढरीकडे प्रस्थान केले. तर दुसरीकडे याच पैठणमध्ये काही शाळकरी वारकरी आपल्या ज्ञानमंदिरात गुरू दर्शनासाठी एकत्र आले होते. हे चित्र होतं पैठणच्या श्रीनाथ हायस्कूलमधील १९८७ च्या दहावी व १९८९ च्या बारावीतील वर्गमित्रांच्या स्नेहमेळाव्याचं. स्नेह मेळाव्यानिमित्त या वर्गमित्रांची जणू छोटेखानी नाथषष्ठीच भरली होती. पैठण ( जि. छत्रपती संभाजीनगर ) येथील श्रीनाथ हायस्कूलमधील १९८७ च्या दहावी व १९८९ च्या बारावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्याचं. या विद्यार्थ्यांनी २०१५ मध्ये "नाथकट्टा" नावाने आपला ग्रुप तयार केला. या कट्टयात मग दहावी-बारावी नंतर विखुरलेली पाखरं एक-एक परतू लागली. बऱ्याच वर्षांपासून सर्वांनी समोरासमोर भेटावं, यासाठी प्रयत्न सुरू होते. अन् अखेर तारीख, ठिकाण ठरलं. स्थानिक वर्गमित्र प्रा. संतोष गव्हाणे, विलास जाधव यांनी यजमान म्हणून तयारी केली. गुरूजणांना निरोप दिले. अहमनगरहून सुनील नागोरी, श्रीरामपूरमधून मिलिंदकुमार साळवे, परभणीतून राजेंद्र गहाळ व इतरांचा पाठपुरावा सुरूच होता. मुंबईतून वर्षा मुळे, जालन्यातून सीमा पाटीलची स्नेह मेळाव्यासाठी तगमग सुरू होती. अखेर तो दिवस आला. हे माजी विद्यार्थी आपल्या वर्गात जाऊन बसले. प्रारंभी मोजून पाचच जण होते. निराशेचे ढग दाटले होते. नंतर हळहळू संख्या वाढली, तसा उत्साह वाढला. तत्कालीन मुख्याध्यापक-प्राचार्य भास्करराव हजारे स्नेहमेळाव्याच्या अध्यक्षस्थानी होते. क्रीडा शिक्षक बी.एस. गोरे, आसाराम खणसे, विद्यमान मुख्याध्यापक शंकर वाघमोडे, पर्यवेक्षक श्रीधर खराद यांची प्रमुख उपस्थिती होती. या स्नेह मेळाव्यात

डॉ.सुनील शिंदे,प्रा. संतोष गव्हाणे, ज्येष्ठ पत्रकार व सामाजिक कार्यकर्ता मिलिंदकुमार साळवे, उद्योजक विलास जाधव, डॉ.मनिष मालानी, प्रतिष्ठान महाविद्यालय उपप्राचार्य विश्वास गव्हाणे महाराष्ट्रतील ख्यातकीर्त कथाकार राजेंद्र गहाळ,फळ व्यापारी निर्यातदार साहेर बागवान, सुनील नागोरी, महेंद्र काळे, भाऊसाहेब भुकेले, प्रगत शेतकरी भागवत खनपट, रघुनाथ मोटे, दत्तात्रय गायके, शिक्षक, नारायण खरात, , शिवाजी नागरी सह बँक अधिकारी गणपत म्हस्के, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अधिकारी मनोहर लिपाणे, गीता तिवारी, गलधर असे विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवणारे हे वर्गमित्र तब्बल ३६ वर्षानंतर श्रीनाथ हायस्कूलमधील आपल्या त्याच वर्गातील बाकड्यांवर बसले होते. मॉनिटर म्हणून विलास जाधव याने विद्यार्थ्यांची हजेरी घेतली. दहावी, बारावीची तिच शाळा, तोच वर्ग पाहून हे वर्गमित्र भारावले होते. सर्वांनी आपल्या शाळेत, वर्गात फेरफटका मारत जुन्या आठवणींना उजाळा दिला. प्रत्येक जण आपले जुने दिवस, जुने वर्ग मित्र, मैत्रिणींची विचारपूस, तर काहींची आठवण काढत होता.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर

घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# ग्रामीण भागात आजही फादर्स डे ला महत्त्व !!

आधुनिक केसरी न्यूज

बाप हा फणसांसारखा बाहेरून काटेरी आणि आतुन गोड असतो . असे म्हणतात . ही गोष्ट लक्षात घेऊन प्रत्येकांने आपल्या वडिलांसोबतचं नात घट्ट करण्यासाठी प्रयत्नशील असायला हवे . प्रत्येक वर्षी फादर्स डे च्या दिवशी तुम्ही या दिवसाचे योग्य आयोजन केले पाहिजे . तुमच्या आयुष्यांचा प्रत्येक दिवस त्याचा आहे . त्यामुळे चुकुनही त्यांना विसरू नको .
**संतोष रहेरे . .( मा .सरपंच ,अंबानेर, ता .दिंडोरी )**

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** आज फादर्स डे हा दिवस सर्वत्र मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. त्यानिमित्ताने या दिवसांचा इतिहास कसा आहे. त्यावर दृष्टीक्षेप.

प्रत्येकांच्या आयुष्यात आईप्रमाणेच वडिलांचे स्थानही महत्त्वाचे मानले जात असते. एका बाजूला आई बाळाचे संगोपन करण्यासोबत त्याच्यावर संस्कार करते.तर दुसऱ्या बाजुला बाप माणूस आपल्या मुलांना आवश्यक गोष्टी मिळाव्या यासाठी वाटेल ते कष्ट करत आपली जबाबदारी पेलण्यासाठी धडपडत असतो.बापाच्या भावना समजणं फार कठीण गोष्ट आहे. कारण त्याला भावना असल्या तरी तो व्यक्त होत नाही.




भावनांना मुरड घालून मुलांना घडविण्यासाठी आहोरात्र राब राबणाऱ्या बापाचे आभार प्रत्येक मुलाने आणि मुलीने मानायला हवेत त्यासाठीच प्रत्येक वर्षी जुन महिन्यातील तिसऱ्या रविवारी फादर्स डे साजरा केला जातो. यावर्षी १९ जुनला म्हणजे आज साजरा केला जाणार आहे. वडील जे जे करिती ! तया नाम धर्म ठेविती !!या संत वचनाप्रमाणे बाप माणसाप्रती आदर आणि प्रेम व्यक्त करण्यासाठी हाच दिवस का निवडला गेला ? कधीपासून फादर्स डे साजरा केला जातो ? एवढेच नाही तर हा दिवस साजरा करण्याची सुरुवात कोणी केली ?असे अनेक प्रश्न एखाद्याला पडु शकतात.

फादर्स डे ची सुरुवात १९१० मध्ये वॉँशिग्टनमधुन झाली. असे मानले जाते. येथील एका महिलेने सोनोरा स्मार्ट डॉँड पहिल्यांदा फादर्स डे सेलिब्रेट केला होता. सुनोराही आईशिवाय बापाच्या छत्र छायेखाली वाढली. वडिलांनी तिला आणि तिच्या भावाला आईची कमी भासु दिली नाही. त्यातून फादर्स डे ची संकल्पना व्यक्त केली गेली. यातुन तिने १९ जुन १९१० रोजी फादर्स डे साजरा केला.तेव्हा पासूनच ख-या अर्थाने हा दिवस मोठ्या प्रमाणावर साजरा केला जात आहे. त्यानंतर १९१६ मध्ये अमेरिकन राष्ट्राध्यक्ष वुडरो विल्सन यांनी ही फादर्स डे अनोख्या पध्दतीने साजरा केला. तेव्हा या दिवसांला फादर्स डे ची ख-या अर्थाने योग्य ती मान्यता मिळाली.१९६६ मध्ये राष्ट्राध्यक्ष लिंडन जाँनसन यांनी जुन महिन्यांच्या तिसऱ्या रविवारी हा फादर्स डे म्हणून साजरा करावा ही घोषणा केली. तेव्हा पासून जगभरात जुन महिन्यांच्या तिसऱ्या रविवारी फादर्स डे साजरा केला जातो.

आपल्या मुलाला घडविण्यासाठी वडिलांचा मोठा वाटा असतो. पण आपण कधी त्यांना धन्यवाद म्हणत नाही. आपल्या बाप माणसांबद्दल मनातील भावना व्यक्त करून त्यांच्या प्रती भावना व्यक्त केली तर नक्कीच त्यांच्या चेहऱ्यावर तुम्हाला एक वेगळे समाधान दिसून येईल. आई वडिलांच्या उपकारांची परतफेड कधीच करता येत नाही. पण तुम्ही त्याच्या कष्टाचं चीज झालंय हे दाखविण्यासाठी त्यांच्यावरील प्रेमाची भावना दाखवून दिली तर त्यांना अत्याआनंद होईल.तसेच वडिलांच्या आवडीच्या वस्तू, खाद्य पदार्थ त्यांना दिले तर आपण त्यातून मुक्त होऊ.व वडिलांच्या डोळ्यात आनंद अश्रु पाहु शकतो.



## हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी केला रविकांत तुपकर यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सेनगाव :** हिंगोलीतील शेतकऱ्यांनी रविकांत तुपकर यांचा सत्कार करण्यात आला शेतकऱ्यांना आंदोलनामुळे हक्काचा पिकविमा मिळाला. त्यामुळे पेरणीसाठी शेतकऱ्यांना मोठा आधार झाला. आज सकाळी नेहमीप्रमाणे लोकांना भेटण्यासाठी बुलढाण्यातील स्वाभिमानी हेल्पलाईन सेंटरला आले आणि अचानक हेल्पलाईन सेंटर समोर शेतकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे गर्दी करत फटाक्यांची अतिषबाजी व पुष्पवृष्टी करुन रविकांत तुपकर यांचा सत्कार केला. खरंतर हा शेतकऱ्यांच्या एकजुटीचा विजय असून शेतकऱ्यांनी तुपकर साहेबावर उधळलेल्या विश्वासरुपी फुलांमधली एकही पाकळी वाया जाणार नाही, हा त्यांचा शब्द आहे. शेतकऱ्यांचं हेच प्रेम आमच्या सारख्या कार्यकर्त्यांना लढायला बळ देत यावेळी पतंगे.सखाराम गजानन कावरखे,नामदेव पतंगे.सखाराम भाकरे.गजानन जाधव.दशरथ मुळे, सतिष डांगे, शिवाजी खिल्लारी, संतोष माहोरकर,माधवराव देशमुख, गजानन सावके ,चेतन सावके, बाळू चोंढीकर व इतर शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## आंबेडकरी तरुणाच्या हत्याकांडाच्या निषेधार्थ मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्रामध्ये मागील काही वर्षापासून आंबेडकरी समाजातील विशेष करुन बौध्द तरुण-तरुणींना जातीय द्वेषभावनेतून कधी भिम जयंती का काढली, रिंग टयुन का वाजवली, शेतीच्या वादातून तसेच इतर कारणावरुन आंबेडकरी तरुणींवर जबरदस्तीने बलात्कार करुन खुन करणे, केवळ जातीयद्वेष भावनेतून त्यांना टार्गेट करुन त्यांचे हत्याकांड करणे, असले प्रकार सातत्याने घडत आहे. पुरोगामी राज्यात या असल्या अमानवी घटना सातत्याने आतापर्यंत महाराष्ट्रात मागील काही वर्षापासून अशा २०० ते २५० घटना घडल्या आहेत. यातील आरोपींना कठोर शासन न झाल्याने जातीयवादी पिलावळीची किंवा गांवगुंडाचे मनोधैर्य वाढले असून त्यांचेकडून महाराष्ट्रातील विविध विभागातील गावामध्ये मे व जून महिन्यामध्ये ७ ते ८ अत्याचार व हत्याकांडाच्या घटना घडल्या असल्याने त्याबाबत आंबेडकरी समाजामध्ये तिव्र असंतोष आहे. शासन, प्रशासन आंबेडकरी समाजास सरंक्षण देण्यास पुर्णतः अपयशी ठरले आहे. आपले सरंक्षण आपणच करण्याची वेळ आपल्यावर आलेली आहे. तसेच, जातीयवाद्याकडून सतत हल्ले होत असून त्याचा विरोध करण्यासाठी मोठया संख्येने रस्त्यावर उतरुन या जातीयवाद्यांना व सरकारला सळो की पळो केल्याशिवाय गत्यंतर नाही. तसेच, गेंडयाची कातडी अंगावर पांघरुन, झोपेचे सोंग घेतलेला सरकारला जागे करण्यासाठी आंबेडकरवादी संघर्ष समीतीच्या वतीने १९/०६/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा. भडकल गेट ते विभागीय आयुक्त कार्यालयावर क्रांती मार्च काढण्यात येणार आहे. तरी सदरील कार्यक्रमामध्ये मोठया संख्येने सामील होवून जातीयवाद्यांना पावबंद करण्यासाठी शासनाविरोधात आपला आवाज बुलंद करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अशी माहिती पत्रकार परिषदेमध्ये समितीचे अध्यक्ष श्रावणदादा गायकवाड यांनी दिली आहे. यावेळी संजय ठोकळ, किशोर गडकर, मनिष नरवडे, वसंतराज वक्ते, मोहनलाल गोरमे, संतोष मोकळे, अशोक गरुड, महेश तांबे, पवन पवार, उत्तम जाधव, नायबराव दाभाडे, मुकूंद दाभाडे, ज्ञानेश्वर खंदारे, शांतीलाल लसगरे, किसन फुलमाळी, संजय जाटवे, मधुकर ठोंबरे, किशोर जाधव, दिलीप चाबुकस्वार, सचिन गायकवाड, मनोज कासारे, संदिप अहिरे, दिनेश चांदणे, आनंद चांदणे, मोतीलाल त्रिभुवन, रावसाहेब बावस्कर, राजु काळे, आर. के. खंदारे, भिमराव बडे, राजु होशिळ, संजय साळवे, ॲड. रविंद्र साळवे, ॲड. निशांत मानसिंगका, सुदाम दांडगे, शेषराव दांडगे, साळवे, देविदास कोळेकर रतनकुमार साळवे आदी उपस्थित होते.



## अर्जंट फ्लॅट विकणे आहे

नक्षत्रवाडी येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ,

**संपर्क : मो. 7588818406**

## महाराष्ट्र Business Katta







